# अंधाराकडून प्रकाशाकडे



श्री. प्रकाश सुकदेव कोल्हे

# अंधाराकडून प्रकाशाकडे

श्री.प्रकाश सुकदेव कोल्हे

विचक्षण प्रकाशन

# अंधाराकडून प्रकाशाकडे


* लेखक

श्री. प्रकाश सुकदेव कोल्हे

संस्थापक

मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था,
पाथर्डी फाटा, नाशिक.

मो. ९५५२५४२३८१



* प्रकाशक

विचक्षण मीडिया प्रा. लि.,

०१, कल्पतरू, स्वामी समर्थ नगर, करवंद नाका,
शिरपूर जि. धुळे (महा.) ४२५४०५
मो. ७५८८००१७४५

* मुखपृष्ठ सजावट : अनिल तिरमले

* प्रथम आवृत्ती : ५ जून २०१७

* मूल्य : रूपये. १४९ /-

* **ISBN 978-81-933309-1-3**



सर्व हक्क प्रकाशक आणि लेखक यांच्याकडे सुरक्षित

**Copyright © 2017 by Vichakshan Media Pvt. Ltd.**

प्रकाशक आणि लेखक यांच्या लेखी अनुमती शिवाय सदर पुस्तक अंशतः अथवा पूर्णतः कोणत्याही माध्यमाद्वारे (डिजिटल, प्रिंट, ऑडिओ, इ.) प्रकाशनास अथवा साठवण्यास सक्त मनाई आहे.

# ॥ अर्पण ॥



हे सुंदर विश्व दाखविणाऱ्या
माझ्या बाईस...

या जीवन प्रवासात ज्यांनी मला
दिपस्तंभा सारखी प्रकाशाची वाट दाखविली
त्या सर्वांना...

# प्रस्तावना

(राष्ट्रपती सन्मानित 'पद्मश्री')

**मधु मंगेश कर्णिक**

सांस्कृतिक सल्लागार

संचालक

'अंधारातून प्रकाशाकडे' हा श्री. प्रकाश सुखदेव कोल्हे यांचा जीवनकहाणी म्हणजे एका गुणवंतांच्या धडपडीचा एक ध्येयवादी, प्रामाणिक, कष्टाळू आणि उच्च मानवी मूल्यांचा ध्यास घेतलेल्या, तरुणाच्या प्रकाशाच्या दिशेने जाणारा प्रवास. हा प्रवास करताना श्री. प्रकाश कोल्हे यांना जे विलक्षण बरेवाईट अनुभव आले त्यांचा मनोवेधक आलेख. हा आलेख श्री. प्रकाश कोल्हे यांनी अतिशय संवेदनशीलतेने रेखाटला आहे. अतिशय प्रतिकूल कौटुंबिक परिस्थिती. परंतु मातापित्यांचा मुलावरचा विश्वास आणि मुलाची आई-नानांवरची देवावर असावी, तशी भक्ती. या पार्श्वभूमीवर अनेक अनुभवांचे पाथेय सोबत घेऊन प्रकाशने आयुष्याची वाटचाल सुरू केली- त्यामध्ये शिक्षणासाठी करावी लागलेली धडपड, गरिबीमुळे सोसावी लागलेली यातना, अवमान पचवतानाची वेदना; या साऱ्या संचितामधून त्यांच्या मनात जागा झालेला दुर्दम्य आत्मविश्वास. त्याच्या बळावर समोर येणाऱ्या प्रत्येक आव्हानाला हिंमतीने आणि जिद्दीने सहनशीलतेने तोंड देताना मनातील मूल्यभाव कधीही न सोडणे. आयुष्य प्रकाश या तरुणाला व त्याला समर्थपणे साथ देणाऱ्या सौ. ज्योतीला, सहधर्मचारिणीला, हाती घेतलेल्या प्रत्येक कामात लाभलेलं यश. हे सारे वाचताना अनेकदा मी गहिंवरून गेलो. कोणतीही अनुकूल पार्श्वभूमी नसलेल्या श्री. प्रकाश कोल्हे या तरुणाने अल्प वयात गाठलेले धवल यश पाहून विस्मित झालो. सामान्य माणसाची ऊर्जा अहोरात्र हृदयात बाळगून तिच्या प्रकाशात तेजाने उभारलेली डोंगरएवढी

असे पाहताना अभिमानाने रोमांचित होतो. त्यामध्ये सर्वच काही वाईट नाही- प्रकाशाची बोटे पुस्तक लिहिणारी भेटतात व त्या बोटांवर मुक्काम करीत प्रकाश कोल्हे यांच्या खरेखुरे प्रवास पाहताना स्वनिर्मित प्रकाश उपजतांना समाजामध्ये आजही प्रकाशमान करण्याचा ध्यास घेतात- तेव्हां माणसाच्या मूल्यभावाबद्दल विश्वास द्विगुणित होतो. प्रकाश कोल्हे यांनी शून्यातून प्रारंभ करून आज तीन हजार विद्यार्थ्यांना शिक्षण, दृष्टी अर्थात् महत्वाकांक्षी शिक्षणसंस्था उभी केलेली आहे. आणखी त्यांनी निर्मिती केलेल्या जीवनाचा अंतरंग मूलमंत्र म्हणजे "हाती घ्याल ते काम तडीस न्या. जिथे निराशा संपते तिथे आकाश सुरू होते- सिद्धता हे एक मोठे सामर्थ्य आहे. अथक परिश्रम, सुई धागा जोडते आणि तलवार तोडते- तेव्हां तिकडे तलवार नको सुई हो, असा उपदेश करणारी आई- त्या सुईने जोडलेली अखंड मनसे, त्यांनी केलेली अमाप मेहनत आणि या सत्याच्या संचिताच्या श्री. प्रकाश यांनी आत्मविश्वासाने, सकारात्मक ऊर्जेने आणि उच्च मानवी मूल्यांचा स्वीकार करून केलेली अधिक वाटचाल म्हणजे "अंधारातून प्रकाशाकडे" हे आत्मकथा.

हे आत्मकथा अनेकांना समाजाभिमुख बनवील, नवसर्जनाची प्रेरणा देईल असा मला विश्वास वाटतो. श्री. प्रकाश कोल्हे यांची ही प्रकाश-यात्रा सफल, सुफल, यशस्वी होवो. असा माझ्या त्यांना निरंतरच्या शुभेच्छा-

मुंबई ५३
३०, मे, २०१८

# मनोगत

आपल्या समोर अंधाराकडून प्रकाशाकडे हे पुस्तक देतांना आकाशातील अगणिक तारकां इतकाच आनंद होत आहे. आकाशाला गवसणी घालावी अशी इच्छा मानवी मनात प्रेरीत व्हावी हे परिस्थितीच निर्माण करत असते. त्याच इच्छाशक्तीच्याद्वारे माणसात आत्मविश्वास निर्माण होत असतो. हाच आत्मविश्वास या पुस्तकातून प्रत्येक माणसात निर्माण व्हावा हीच अपेक्षा ठेवून पुस्तक लिहिण्याचा मानस पूर्णत्वास गेला आहे. मानवधन विचारांची एक प्रकाशवाट या पुस्तकाच्या यशस्वी वाटचाली नंतर अंधाराकडून प्रकाशाकडे हे पुस्तक वाचकवर्गास एक उर्जास्त्रोत म्हणून यशस्वीतेचा मार्ग निश्चित दाखविण्याकरिता फलदायी ठरेल.

आपण सर्व कोणत्या ना कोणत्या परिस्थितीतून सावरलेला असतो. त्यातून ताऊनसुलाखून निघालेला असतो आणि पून्हा तशीच परिस्थिती आपल्या वाट्याला आली की, आपण अगदी सहजपणे त्यावर मात करू शकतो. अशा या संकटांवर मात करण्याची ताकद आपल्याला कुठून मिळते? तर ती स्वतःवरच्या आत्मविश्वासने. स्वतःमध्ये जर आत्मविश्वास असेल आणि काहितरी नवीन करण्याची जिद्द असेल तर संकटातला महामेरूसुद्धा आपण सहजपणे पार करू शकतो अशाच माझ्या वाट्याला आलेल्या संकटांना, परिस्थितीला तोंड देत मी माझं जीवन जगत आलो आहे. माझ्या आयुष्यातले चढ उतार व खाच, खळगे यामध्ये मी स्वयंभू झालो अशा माझ्या आयुष्याची गाथा, व्यथा आपल्या वाचकांच्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे. पण त्याचबरोबर मनात अनेक शंकाकुशंकांचे वादळ उठले आहे. या पुस्तकातून तुम्हाला काय मिळणार? माणूस कोणतेही कार्य करतांना त्या कार्यातून आपल्याला काय मिळेल या उद्देशाने त्या कार्याकडे पाहत असतो आणि एवढं सगळं करून जर त्यातून काही निष्पन्न झालं नाही तर पदरी निराशा पडते. ही निराशा आपल्या पदरात पडू नये ही

प्रार्थना देवी शारदेकडे करतो. कारण तिने दिलेल्या ज्ञानाने मी अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याचा यशस्वी प्रवास करू शकलो. एखाद्या पूढे जाणाऱ्या वाटसरूने मागून येणाऱ्या वाटसरूसाठी रस्त्यात जर मार्गखूणा केल्या तर दुसऱ्या वाटसरूला इच्छितस्थळी पोहचण्यास जास्त वेळ लागत नाही आणि तो योग्य दिशेने प्रवास करतो. तद्स्वरूप हे पुस्तक वाचकांना दिशादर्शक ठरेल अशी अपेक्षा करतो. मी परिस्थितीने घडलो अथवा घडवल्या गेलो. जे काही असेल त्यात मी स्वतःला सिद्ध करत गेलो आणि स्वतःचं एक स्थान निर्माण केलं. हे पुस्तक जेव्हा वाचक वाचतील तेव्हा त्यांना माझ्यासोबत घडलेल्या घटनांची प्रचिती येईल आणि त्यांना ती कथा आपली वाटेल. एवढी सत्यता या पुस्तकात छापली आले. या पुस्तकाला केवळ चरित्र म्हणून न बघता हे पुस्तक माझ्या आयुष्याचा अध्ययन ग्रंथ होय. कारण यात नमूद केलेल्या प्रसंगाने ज्ञान दिले शिकवण दिली. आणि मला मिळालेले हे ज्ञान ही शिकवण तुमच्यापर्यंत पोहचवत आहे. कितीही संकटे आली, नकारात्मक घटना घडल्या तरी थांबायचे नाही, आपला प्रवास चालू ठेवायचा. तुमची जिद्द, चिकाटी, मेहनत हेच तुम्हाला अंधाराकडून प्रकाशाकडे घेऊन जातील हे सर्व करण्यामागे माझाही स्वार्थ आहे. असं म्हणतात, 'ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते' म्हणून परिस्थितीने मिळालेले हे ज्ञान मी तुम्हाला देत आहे. अपेक्षा हीच की, या पुस्तकाचा तुम्हाला आपले आयुष्य जगतांना, घडवतांना संदर्भ म्हणून या पुस्तकाचा उपयोग झाला तर माझ्या जगण्याचं सार्थक होईल.

शेवटी माणूस आपल्या कौशल्याने जगत असतो. शांतीदूताने शांती म्हटलं म्हणून हिटलर जन्मायचे थोडीच थांबले? की हिटलरने कत्तली केल्या म्हणून सारे जग हिंसक झाले? शेवटी माणूस स्वतः चिंतनशील, विचारशिल प्राणी आहे. त्याला आपले चांगले, वाईट बरोबर कळते आणि स्वतःसाठी चांगले मिळावे यासाठी तो प्रयत्न करत असतो. तोच प्रयत्न माझ्या आयुष्यात घडलेल्या घटनांमध्ये तुम्हाला दिसेल हे प्रयत्न करतांना घ्यावे लागलेले कष्ट अजूनही मला आठवले की डोळ्यांच्या कडा पाणावतात. कदाचीत माझ्या परिस्थिती पेक्षा ही बिकट परिस्थिती इतरांवर असेल. पण या परिस्थितीवर जो मात करतो तो खऱ्या अर्थाने आयुष्याची ही स्पर्धा जिंकलेला असतो. मी ही स्पर्धा केली माझ्या नशिबाची. नशिबी असलेल्या अठराविश्व दारिद्र्याशी या स्पर्धेत माझ्या नशिबी हेच का आले? असं म्हणत माझ्या अपयशाचं खापर मी नशिबावर कधीच फोडलं नाही. मला हे मिळायला हवं होतं किंवा मला हे मिळालं नाही म्हणून हतबल होऊन न

बसता मिळालेल्या कौशल्याच्या आधारावर मी स्वतःसाठी स्थान निर्माण केले.

दुसऱ्याच्या शेतावर सालानं काम करणाऱ्या उन्हा-तान्हात दुसऱ्याची शेती आपुलकीने कसणाऱ्या एका सालकऱ्याच्या मुलाने गवताचे भारे वाहून स्वतःचे शिक्षण पूर्ण करतांना 'कमवा आणि शिका' या तत्वावर आपले आयुष्य घडवत स्वतःच्या 'जडणघडणिचं मर्म' या पुस्तकात नमूद केलं आहे. या पुस्तकात माझं बालपण, प्राथमिक, माध्यमिक शिक्षण, इंजिनिअर होण्यासाठी केलेले प्रयत्न, घरची परिस्थिती त्यातून मिळालेला अनुभव, काही कारणास्तव मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्थेचा झालेला जन्म, माझा संसार या सगळ्यांचा समावेश आहे. अथक परिश्रम करत मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्थेची उंची वाढवली. मला माझे स्वतःचे शिक्षण घेतांना आलेल्या अडचणी व समस्या इतर कोणाच्याही वाट्याला येऊ नये म्हणून संस्था संचलीत ५ शाळेच्या माध्यमातून ३००० विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहे. हे कार्य करत असतांना मानवधन जमा करत करत अनेक थोरमोठ्यांपर्यंत पोहचलो आहे. ज्याला शिक्षण घेणे अवघड होते असा व्यक्ती 'मानवधन विचारांची एक प्रकाशवाट' हे पुस्तक लिहून साहित्य क्षेत्रात स्वतःचं एक स्थान निर्माण करू पाहत आहे. तसेच संगीत क्षेत्रातही मानवधन जीवन मंगल गाणी या गितांची रचना करत संगित क्षेत्रात पाऊल टाकले आहे. संस्थापक हे अढळ स्थान स्वतःसाठी निर्माण करण्याची गुरूकिल्ली मला कशी सापडली हे माझ्या यशाचे गमक कोणताही आडपडदा न ठेवता सढळ हाताने वाचकांना सुपूर्द करत आहे.

मला मिळालेल्या यशाची गुरूकिल्ली ही अहोरात्र काबाड कष्ट करून संस्काराच्या शिदोरीतला व स्वतःच्या ताटातला घास मला भरवणारी माझी जन्मदाती बाईने (आई) घेतलेल्या परिश्रमाचे फळ आहे. त्यामुळे सर्वप्रथम बाईला वंदन करतो गरीब जरी असलो तरी प्रामाणिकपणा व कष्टाळू वृत्तीची शिकवण देणारे देवरूपी नाना परिस्थितीशी झगडत असतांना माझ्या बाजूने साथ देणारे माझे दोन्ही बंधू एकनाथ आणि अनिल. संस्था, संसाराचा गाडा माझ्या सोबत किंबहूना माझ्यापेक्षा लिलया ओढणारी, कामाचा व आणि संसाराचा समतोल राखत माझ्या प्रत्येक कार्यात साथ देणारी माझी सहचारिणी, अर्धांगिनी ज्योती. ज्याला मी माझ्या कार्यामुळे खूप कमी वेळ देऊ शकलो असा माझा मुलगा प्रज्वल आणि आता बाई हयात नसतांना बाईची जागा भरून काढणारी माझी मुलगी प्रांजल ह्यांच्या त्यागामुळे मी आपल्याला हे पुस्तके देऊ शकलो, त्यांचे मी ऋण व्यक्त करणार नाही कारण

यांच्या ऋणात राहून आणि त्यांच्या ऋणांची जाणिव ठेवून मला अधिक कार्य करण्याची शक्ती देवाकडे मागत आहे. माझे हे समाज हीत कार्य अजूनही पूर्णत्वास गेले नाही त्यासाठी येणाऱ्या प्रत्येक रात्रीच्या अंधारानंतर मी पून्हा नव्या प्रकाशात रोज नवीन काही तरी शिकण्यासाठी सज्ज होत असतो उद्याची संम्यक क्रांती घडवण्यासाठी !

हे पुस्तक लिहिण्यासाठी वेळोवेळी थंड हवेची झुळूक ज्याप्रमाणे येऊन स्पर्श करून जाते त्याचप्रमाणे गेली दोन अडीच वर्षापासून या पुस्तक लिखाणासाठी प्रयत्नशिल असणारे व वेळोवेळी मैत्रीचा सुसंवाद साधत अंतर्मनाचा ठाव घेत मानवधन व मानवधनाचे विचार समजून घेऊन अंधाराकडून प्रकाशाकडे जाणाऱ्या या पुस्तकाच्या लिखाणात विशेष योगदान देणारे मानवसेवक श्री. रोहित पगारे यांचा हा आठवणींचा अमूल्य ठेवा माझ्या जीवनप्रवासाचा एक सोबती ठरला.

अस्सल हिऱ्याची ओळख एखादा जोहरीच करू शकतो. तशीच शब्दांची पारख हा ज्ञानप्राप्तीचा अधिष्ठान असलेला पारखीच करू शकतो. असे अधिष्ठान प्राप्त असलेले ज्ञानीगुणी लेखक, साहित्यीक मधू मंगेश कर्णिक यांनी माझ्या या अंधाऱ्या जीवनाचा प्रकाशाकडे जाणारा प्रवास वाचला व आपली आशिर्वादरूपी प्रस्तावना या पुस्तकाला दिली त्याबद्दल मी त्यांचा खूप खूप आभारी आहे. हे ऋण व्यक्त करतांना ज्यांनी मला ह्या माझ्या जीवनप्रवासाला साथ दिली त्या सर्वांचे मी ऋण व्यक्त करतो.

श्री.प्रकाश सुकदेव कोल्हे

# परिचय

नाव : श्री. प्रकाश सुकदेव कोल्हे
शिक्षण : DIE, AMIE
व्यवसाय : नोकरी / सेवाकार्य
पत्ता : प्लॉट नं. ५७, 'सुखद', अयोध्या कॉलनी,
पाथर्डी फाटा, नाशिक

## पदभार :

१) संस्थापक - मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था, नाशिक
२) संपादक - मानवधन शालेय वृत्तपत्र
३) संपादक - बालविद्या साहित्य संगम
४) लेखक - मानवधन विचारांची एक प्रकाश वाट.....
५) संगीतकार - मानवधन जीवन मंगल गाणी
६) सचिव - स्वप्नपुर्ती सामाजिक संस्था
७) कार्याध्यक्ष - महाराष्ट्र राज्य आंतरराष्ट्रीय मानवाधिकार
८) शहर आयुक्त नाशिक - हिंदूस्थान स्काऊट्स् एवं गाईडस् महाराष्ट्र राज्य
९) सदस्य - महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स
१०) सदस्य - अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नाशिक
११) सदस्य - विचक्षण मासिक संपादकीय मंडळ
१२) सदस्य - सार्वजनिक वाचनालय, नाशिक
१३) सदस्य - नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाइंड
१४) सदस्य - मराठी विज्ञान परीषद
१५) सदस्य - लिड इंडिया २०20
१६) सदस्य - ISTE, AMIE
१७) सेक्रेटरी - रोटरी क्लब व्हायब्रंट नाशिक

## सामाजिक व शैक्षणिक कार्य :

१) धनलक्ष्मी बालविद्यामंदिर व प्राथमिक शाळा, पाथर्डी फाटा, नाशिक
२) धनलक्ष्मी माध्यमिक विद्यालय, पाथर्डी फाटा, नाशिक
३) धनलक्ष्मी ज्युनिअर कॉलेज, पाथर्डी फाटा, नाशिक
४) प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूल, पाथर्डी फाटा, नाशिक
५) प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडियम स्कूल, जाधव संकूल, नाशिक
६) ब्राईट इंग्लिश मिडियम स्कूल, वाडिवऱ्हे, ता. इगतपुरी, जि. नाशिक
७) मानवधन वाचनालय व अभ्यासिका केंद्र, चांदोरी, ता. निफाड, जि. नाशिक
८) सुखद सहवास बालक आश्रम व वृद्धाश्रम, वाडिवऱ्हे, ता. इगतपुरी, जि. नाशिक

## प्राप्त पुरस्कार :

१) ज्ञानरत्न पुरस्कार
२) डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षण गौरव पुरस्कार
३) समाज गौरव पुरस्कार
४) व्यावसायिक सेवा पुरस्कार
५) ॲप्रिसिएशन ॲवार्ड
६) आदर्श शिक्षक पुरस्कार
७) रक्तदान शिबिरामध्ये उत्कृष्ट सहभाग म्हणून पुरस्कार
८) महाराष्ट्र गुणिजन रत्नगौरव पुरस्कार
९) राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार
१०) भारत ज्योती प्राईड ऑफ नेशन एक्सलन्स ॲवार्ड
११) एनर्जी कन्झंरवेशन ॲवार्ड
१२) महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा यांच्याकडून कार्य गौरव
१३) महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण संस्था मुंबई यांच्याकडून गौरव
१४) स्मार्ट शिलेदार पुरस्कार (सकाळ समुह)
१५) उपक्रमशिल शिक्षक पुरस्कार

# अनुक्रमणिका


१. तो इतिहास असा..........................................०१
२. हे विश्व बघितल..........................................०५
३. सामर्थ्याचा धडा..........................................०८
४. कष्टातच आपलं भाग्य असत..........................................१०
५. हे विश्वची माझे घर..........................................१४
६. बालमनावरील संस्कार..........................................१९
७. शाळेत शिकतांना..........................................२१
८. शिक्षणातून समृद्धीकडे..........................................२४
९. जीवन बदलणारी सहप्रवासी सायकल..........................................२७
१०. असे का?..........................................३०
११. शाळेच्या प्रांगणात..........................................३२
१२. संस्थापक ते संस्थापक एक प्रवास..........................................३५
१३. परिस्थितीवर मात करताना..........................................३७
१४. घड्याळाची काटे पुढे सरकली..........................................४१
१५. माझी काय चूक?..........................................४४
१६. लग्न लावायचं ठरवलं..........................................४६
१७. इंजिनिअर होताना!..........................................५०
१८. थांबलोच नाही..........................................५३
१९. मोठ्या माणसांचा शोध..........................................५५
२०. आयुष्याच्या वेगळ्या वाटेवर..........................................५७
२१. नोकरी करताना..........................................६१
२२. संसाराचा नवा प्रवास..........................................६४
२३. वेध शैक्षणिक कार्याचा..........................................६८
२४. मानवधन संस्थेचा जन्म..........................................७१
२५. शाळा सुरू झाली..........................................७४
२६. शाळेची जागा उभी केली..........................................७९
२७. न संपणारं दुःख..........................................८२
२८. आईसाठी..........................................८७
२९. एका दिवसात शाळा..........................................८९
३०. संकटातही आनंदच..........................................९१
३१. देवही माझ्या सोबत..........................................९५

# तो इतिहास असा

आपले आयुष्य हे वाहणाऱ्या नदीच्या प्रवाह समान असतं, ते सतत प्रवाही असतं, सातत्याने वाहत असतं. बांध जरी घातला तरी बांध ओलांडून ते प्रवाहीत होण्याचा प्रयत्न करत असतं. अती दुष्काळाने आटतं पण आपल्या अस्तीत्वाच्या खुणा दाखवत डबक्या डबक्यात साचून राहतं, धरणीकंपाने कदाचित मार्ग बदलतो पण प्रवाहाच्या खाणा खुणा ह्या चिरकाल टिकून राहतात. तसचं काहीसं मानवाच्या आठवणींच असतं. विविध परिस्थितीत ते स्मरण पटलावरुन काही काळासाठी पुसल्या जातात पण त्याच्या खाणाखुणा अस्पष्ट का होईना पण त्या असतात. तसचं काहीसं माझं झालेलं आहे. माझ्या स्मृतितल्या आठवणी ह्या थोड्याशा पुसल्या गेल्या पण नष्ट झाल्या नाही. सुकलेल्या नदीतले सागर गोटे, खाच खळगे, ज्याप्रमाणे नदीचं अस्तित्व सांगतं. तशाच या आठवणी माझ्या जीवनातील अविभाज्य भाग आहेत. माझ्या जीवनातील ह्या मोरपिशी आठवणी तुमच्या समोर मांडतांना एक प्रश्न कायम उभा असतो. मी माझं हे जीवन आपल्या समोर का सांगावे? हा प्रश्न सतत माझ्या हातातील लेखनी अडवते. विचार मात्र समुद्राच्या लाटे सारखे वारंवार आदळत असतात. समुद्र विशाल, अथांग असतो त्याप्रमाणे माझे जीवन एवढे विशाल आणि अथांग आहे का? ज्याच्या प्रवाहात तुम्ही येथेचं डुंबाल खोल तळाशी जावून यशाच रहस्य जाणून घ्याल हे मला काही सुद्धा माहित नाही. तरी सुद्धा मी माझ्या आयुष्याचे चढ-उतार शब्दांच्या संगतीने आपल्या समोर मांडत आहे. हे मांडत असताना अथवा लिहित असतांना कुणाला ही पडावा असा प्रश्न मलाही पडला आहे. नेमकी सुरुवात कुठून व कशी करावी हा! हे सगळं मी आपल्या वाचकांना का सांगाव यातून तुम्हाला काय मिळणार? मला हे काहीही माहित नाही. कदाचित आपल्याला हे वाचताना सर्व सामान्य वाटेल पण सर्वसामान्य माणूस ही काहीतरी असामान्य करु शकतो हे यातून नक्कीच जाणवेलं.

प्रत्येकाला स्वतःचा इतिहास असतो फरक एवढाच असतो की, काही लोक त्या इतिहासाचा आपल्या भविष्यासाठी उपयोग करुन घेता तर काही लोक आपल्या इतिहासाला दुषणं देत आपलं भविष्य खराब करतात.

कदाचित मी पहिल्या व्यक्ती मधला असावा. कारण आमच्या कुटुंबाचा जो काही इतिहास आहे त्यातून मी स्वतःला घडवत गेलो. जे होवून गेलं त्याचा विचार करत बसलो नाही पण जे काही करायचं होतं त्याचा मात्र विचार केला म्हणूनच माझ्या या विचारांचा, माझ्या कृतीचा इतिहास नमूद करावासा वाटतो.

आमचा कुटुंबाचा इतिहासात कुठे नोंदवून ठेवलेला नाही. पण गावातील जी जुनी झालेली खोडं आहेत त्या खोडांनी, वृद्धांनी माझ्या कुळा विषयी सांगितलेला इतिहास मी भूतकाळ म्हणून ऐकत आलेलो आहे. तो कितपत खरा किंवा खोटा आहे या बाबतीत मी अनभिज्ञ आहे.

तो इतिहास असा!

माझे आजोबा चांदवड तालुका येथील विटावे गावचे स्वातंत्र्य पूर्व काळातील पोलिस पाटील होते. चार चौकी घर, मोठ आंगण, जमीन जुमला असलेल्या पोलिस पाटलांच्या घरात लक्ष्मी पाणीच भरत होती. आजोबांचा गावात एक प्रकारचा दबदबा होता, गावकऱ्यांमध्ये आदरयुक्त भीती होती. या संमिश्र भावनेने गाव त्यांच्याशी वागत असतं. आजोबा जेंव्हा रस्त्याने चालत तेंव्हा आपसूक इतरांच्या मानाखाली जात. गावातील स्त्रीया पायातील वाहाना काढून डोक्यावरचा पदर सावरत रस्त्याच्या आडोश्याला उभ्या राहात. गावातील पंचायत न्याय निवाड्याचे ते प्रमुख न्यायाधिश होते. त्यांनी दिलेला निर्णय अंतिम असे. त्यांच्या पुढे बोलण्याची, त्यांनी दिलेला निर्णय नाकारण्याची कुणातही हिंम्मत नव्हती आणि त्यावेळेस तशी पद्धत ही नव्हती. अशा कडक शिस्तीचे ते पोलिस पाटील होते आणि त्यांच घरही तशाच शिस्तीचं पण त्या घराची लक्ष्मी त्यांची पत्नी म्हणजे माझी आजी मोठी घरंदाज बाई होती. नवऱ्याच्या शब्दापुढे कधी गेली नाही, नवऱ्या समोर डोक्यावरचा पदर कधी ढळला नाही, कधी मोठ्या आवाजात बोलली नाही, आपली बिकट वाट कधी मोडली नाही. अत्यंत साधी भोळी अशी माझी आजी होती असं मला जुनी मंडळी सांगतात.

माझ्या आजी आजोबांना २ मुलं, २ मुली असा भरल्या गोकुळा सारखा त्यांचा संसार होता. या बाळगोपाळात माझे वडील सर्वात गरीब स्वभावाचे, सुकदेव त्यांच नाव. तो काळ स्वातंत्र्यापूर्वीचा होता. त्यावेळी लहान वयात मुलांची लग्न लावून दिली जात. त्यामुळे घरातील सर्वांचीच लग्न झालेली,

आमच्या वडिलांच लग्न सुद्धा आमच्या मातोश्री बरोबर झालेलं होतं.

आमच्या मातोश्री ह्या त्यांच्या आईला एकुलत्या एक होत्या. माझी आई दगुबाई ह्यांच्या वडिलांची दोन कुटुं ब होती. घराला वारस हवा म्हणून त्यांनी दुसरा विवाह केला होता. त्यातील पहिल्या कुटुंबाची ही मुलगी, त्यांच्याही घरात लक्ष्मीचा नित्यवास असायचा. अशा भरल्या घरातली ही मुलगी दगुबाई हीचा विवाह पोलिस पाटील यांचे पुत्र सुकदेव यांच्याशी संपन्न झाला होता.

सुरुवातीची संसाराची काही दिवस व्यवस्थित गेले. पण का कुणास ठाऊक या सर्व घरावर जणू गाढवाचा नांगर फिरवला गेला. पोलिस पाटील आपल्या गुर्मीत  हळूहळू सर्व गमावून बसले. आपल्या मोठ्या मुलाच्या कोर्ट कचेरीत जमीन गमावून बसले. पोलिस पाटीलांचे काम करत असताना त्यांना अगदी सहज सर्व मिळत असल्याने जणू काम न करता बसून खाण्याचा स्वभाव त्यांच्या कुटूंबात रूजला असावा. या सर्वांपेक्षा सुकदेव आणि त्यांची पत्नी काही वेगळे होते. ते दोघे दुसऱ्यांच्या शेतात कामावर जात असत. शेतात काम करुन आणलेल्या पैशात घरातली इतर मंडळी खाऊन पिऊन सुखी व्हायची पण आपल्या भविष्याची चिंता त्यांना भेडसावत नव्हती. माझ्या दोन आत्याही माझ्या आई वडिलांचा छळ करायच्या.

खरं पाहता हे जरी एखाद्या सिनेमाच्या कथेप्रमाणे वाटत असलं तरी त्या जुन्या लोकांनी सांगितलेल्या स्मृतीकथा आहेत हे मात्र विसरुन चालणार नाही. कारण हा सगळा इतिहास माझ्या जन्मा अगोदरचा. माझ्या आई वडिलांना लवकर मुलबाळं काही होत नव्हतं म्हणून कदाचित घरात दोघांचा छळ करायचा असं सर्व कुटुंबाने ठरवलं असावं असा माझा अंदाज आहे. सांगी वांगीच्या गोष्टी म्हणतात तसं काहीसं... म्हणतात पुराणातील वांगी पुराणात तसचं काहीसं, वाटतं हे सगळं खरं असेल का? पोटच्या पोराशी त्याचे जन्म दाते, त्यांचे भावंडे असे वागू शकता? असे अनेक प्रश्न माझ्या समोर उभे राहतात पण इतिहास हा माणसाला शिकवण्यासाठी असतो. खंथ करण्यासाठी नाही. म्हणून त्या गोष्टी कधी माझ्या विचारात आल्या नाही आणि मी त्याच खंथ करत बसलो नाही. प्रत्येक गोष्टीला कुठे ना कुठे सीमा असते आणि सीमा ओलांडल्या की माणूस आपल्या क्षमतेच्या पलिकडील निर्णय घेतो. काही निर्णय फसतात काही यशस्वी होतात अगदी असाच निर्णय ह्या सगळ्या जाचाला कंटाळून माझ्या आई वडिलांना घ्यावा

लागला. त्यांनी घर सोडलं ते कायमचं. एक अथक परिश्रमाच्या वाटेचे वाटसरु  झाले. घर सोडलं ते पुन्हा तीथे कधीही पाऊल न ठेवण्यासाठी. ते घर सोडलं आणि ती सर्व मंडळी आता भूतकाळात जमा झाली आहे. काही अजुनही जीवंत आहेत, काही काळाच्या पडद्याआड गेली आहेत. आज सर्व गोष्टींना एक काळ लोटला आहे. त्यांचा संबंध केवळ नावा पूरता उरला आहे. मला प्रेमाने बांधून ठेवणारा धागा असा आमच्यात नव्हताच मुळी. ते लोक आपल्याशी असे वागले म्हणून त्यांना शिव्या शाप द्यायचे असे कधीच झाले नाही. मुळात मातीशी खेळणारी त्यात वाढणारी आपण माणसं आहोत या मातीतच जाणार मग कशाला एका मातीने दुसऱ्या मातीला दुषण द्यावी.

यात नवल वाटतं ते माझ्या आई-वडीलांच. त्यांनी खूप हाल आपेष्ट्या सोसल्या, खूप त्रास काढला पण माझ्या वडीलांनी कधी आम्हा भावंडा समोर त्यांच्या घरच्या विषयी अपशब्द काढला नाही, माझ्या आईने आपल्या वाट्याला आलेल्या या भोगाचे खापर त्या मंडळीवर फोडलं नाही. ‘दोघंही पदरी पडलं पवित्र झालं’ या उक्तीप्रमाणे जगत राहिले आणि आम्हाला जगवत त्या जगणाऱ्या आणि जगवणाऱ्या माझ्या खऱ्या दैवतांना साष्टांग दंडवत.

***

# हे विश्व बघितलं

कुणाच्या उदरी कुणी जन्म घ्यावा हे ठरलेलं नसतं. तुरूंगातल्या देवकीच्या पोटी कृष्णाने जन्म घेतलाच ना! पांडवांचा शत्रू कर्ण याने पांडवांची आई कुंती हीच्याच पोटी जन्म घेतला होता. जन्म कुठे, कसा झाला याला महत्त्व नाही. आपण जन्माला येवून ह्या जन्माचं काय सार्थक करतो याला महत्त्व असतं.

कोट्याधीश जगतात जीवाणू

जगती अन् मरती

जशी ती गवताची पाती...

ह्या कुसूमाग्रजांच्या कवितेतल्या ओळी प्रमाणे त्या कोट्याधीशातले आपण एक असतो. मानवाचे कर्म त्याच्या जगण्याला अर्थ प्राप्त करुन देत असतात. एकदा का माणसाला त्याचं जन्माला येण्याच कारण समजलं की तो अनेक संकटाना तोंड देवून आपला जन्म सार्थकी लावत असतो. कदाचित मलाही माझ्या जन्माला येण्याचा उद्देश समजला असं वाटतं.

सासरच्यांचा जांच माझ्या आईला होत होता. वडीलांनाही त्या त्रासाला थोड्या प्रमाणात सामोरं जाव लागत होत. माझी आई दगुबाई व वडील सुकदेव यांना लवकर काही संतान प्राप्ती होत नव्हती. म्हणून दगुबाई आणि सुकदेव यांनी देवाला नवस केला, त्या शुद्ध पवित्र मनाने प्रार्थनेच फळ त्यांना लवकरच मिळालं. आईच्या उदरात मी वाढू लागलो. पहिल्या बाळांतपणासाठी आई माहेरी म्हणजे माझ्या आजोळी गेली होती. आजीने माझ्या आईचं पहिलंवहिलं बाळांतपण पार पाडलं होतं.

तो काळ १९७२ चा होता. सर्वत्र दुष्काळाच सावट होतं. माणूस पाण्यावाचून वणवण करत होता. माणसाच्या तोंडचं पाणी पळालं होतं, नदीची पात्र कोरडी ठाक पडली होती. धरणीमाय कोरडी रखरखीत वांझ होवून पडली होती. ती अपेक्षेने आभाळाकडे डोळे लावून बसली होती. कधीतरी वरूण राजा प्रसन्न होईल आपल्यावर कृपादृष्टी दाखविल. पण तसं काही होत नव्हतं अशा उन्हाने तापलेल्या वातावरणात साळसाणे गावी एका घरात अचानक प्रसव वेदनांची किंकाळी अर्भकाच्या रडण्याने थांबली. तो दिवस ४ जून १९७४ होता. मध्यानीचा सूर्य माथ्यावरुन अगदी थोडासा ढळला होता आणि पौर्णिमेचा चंद्र सुद्धा आकाशात आपलं अस्तित्व दाखवत होता. सूर्य व चंद्र

या दोन्हींच्या साक्षीने ४ जूनला माझा जन्म झाला. दिवस प्रखर प्रकाशानं झळाळत होता आणि रात्री चंद्र आपलं मंद, शितल आपल चांदणं शिंपडत होता. तसा दोन्ही ग्रह, उपग्रहांनी मला जणू आशिर्वाद देवून या भूतलावर पाठवलं असं मला वाटतं. माझा जन्म जरी ४ जून चा दुपारी १२.२५ चा असला तरी तो मी ५ जून मानतो. कारण जगाला ऊर्जा देणारा सूर्यनारायणच रात्रीच्या अंधाराला कापत माझ्या आयुष्यात आपल्या सोनेरी किरणांची उधळन करत ५ जूनलाच आला होता.

आई आनंदानेशहारुन गेली होती. कारण लग्नानंतर ५ वर्षांनी माझा जन्म झाला होता. मला हातात घेवून प्रसववेदनेनं त्रासलेल शरीर जणू आनंद लहरीवर तरंगत होतं. आता तीला तिचं सुख, दुःख सांगणारा तीचा एक अंश तीच्या जवळ होता. कोणत्याही स्त्रिच भावविश्व फार सीमीत असतं. नवरा, सासर, माहेर आणि मुलं यांच्या पूरतच मर्यादित असतं. माझं माहेर होतं, सासर होतं, पती होता. नव्हता तो मुलगा आणि आता तोही मिळाला होता. तिचं विश्व पूर्ण झालं होतं. तीचं स्त्रीपण परिपूर्ण झालं होतं.

माझा जन्म झाला तसं निसर्गानेही आपलं रूप पालटलं उन्हाच्या झळा वहता-वहता अचानक मंद वारा वाहू लागला. अंगाची दाहकता लोप पावू लागली, सर्वत्र वातावरणात गारवा जाणवू लागला, लखलखणाऱ्या सूर्याला काळ्याश्याम मेघांनी घेराव घातला आणि बघता बघता सर्वांना हव्याहव्याशा पावसाला सुरुवात झाली.

मला असं वाटतं निसर्ग खूप खेळीया आहे. तो आपल्याशी पाठशिवणीचा खेळ खेळत असतो. त्याला बरसायला कारण हवं होतं, या भूतलावर त्याच्या सोबत खेळायला, बागडायला असा सोबती मिळत नव्हता. म्हणून तो अडून होता. पण माझ्या रूपाने त्याला सखा मिळाला आणि माझ्या जन्माच्या आनंदाने तो धो धो बरसला.

सांगण्याचं तात्पर्य एवढंच की, माझा जन्म झाला आणि १९७२ चा दुष्काळ संपुष्टात आला आणि मानवी जन-जीवन समृद्धीच्या मार्गाला लागलं.

माझं बारसं झालं की  नाही मला माहित नाही. माझं नाव कुणी ठेवलं हे सुद्धा मला सांगता येणार नाही. पण माझं नाव ठेवणारी ही साक्षात सटवाई असावी असं मी ठामपणे सांगू शकतो. कारण माझा जन्म हा वटसावित्री

पौर्णिमेचा, तेंव्हा रात्री सुद्धा सर्वत्र निळा, शांत चंद्र प्रकाश होता. दिवसा दुष्काळाच्या प्रखरतेने प्रज्वलीत असलेला सूर्य त्याचाही लख्ख प्रकाश सर्व मानवजातीला मिळत होता. तोच संदर्भ बहूदा लक्षात घेवून माझं नाव 'प्रकाश' असं ठेवलं गेल असावं. ह्या प्रकाशने सर्वांच्या आयुष्यात प्रकाश द्यावा, अनेकांची घर समृद्धीने उजळावी सर्वत्र आनंदाची उधळण करावी ज्ञानाचा प्रकाश सर्वत्र द्यावा म्हणून माझं नाव प्रकाश असं ठेवलं गेलं. म्हणून मी म्हणतो प्रत्येकाचा जन्म कुठे व्हावा ह्या पेक्षा आपण जन्माला येवून किती जणांच्या आयुष्यात प्रकाश देवू शकतो हे महत्त्वाचं म्हणून आपल्या नावाप्रमाणे वागा.

प्रकाशाची साथ जीवानातील खरी वाट दाखवणारी ठरावी अशी देवा चरणी प्रार्थना.

***

# सामर्थ्याचा धडा

आई वडीलांनी घर सोडलं ते कायमच पण घरातून निघताना अंगावरच्या कपड्यानिशी निघाले, कदाचित फुकटचं आपल्याला काही नको असं त्यांना वाटत असावं. मी तीन महिन्यांचा होतो भुकेच्या संवेदनाही निटशा न समजण्याच तसं वय कसलं अर्भकच होतो. खर तरं कायदेशीर ते वाटा मागू शकत होते तसं त्यांनी केलं नाही. का केलं नाही हे काही सांगता येणार मात्र कदाचित दोहांमधे असलेली स्वाभिमानी वृत्ती, ही वृत्ती त्यांच्या आत्म्याच्या मुळाशी घट्ट बसून राहिली असावी. घर सोडण्याचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला होता. कुठे जाणर होते ते, कोणत्या दिशेला जाणार होते, आणि कुणाच्या भारवशावर जाणार होते. घरातून त्यांनी काहीच घेतल नव्हतं. त्यांच्या सोबत होता त्यांचा आत्मविश्वास, स्वाभिमान, आणि प्रकाश.

दोघांनी घर सोडलं आता करायचं काय म्हणून प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला आणि ज्या मातीत ते खेळले तीच माती त्यांच्या मदतीला धावून आली. कामाची मागणी केली असता एका शेतकऱ्याने त्यांना शेतावर सालाने माझ्या आई वडीलांना दिल गेलं, थोडा बहूत आसरा मिळाला होता. त्याच शेतात त्या दोघांनी एक झोपडी उभारली. दोघांच्या संसाराचा ताजमहल काट्या कुट्यांनी बांधायला सुरुवात केली. पातळाच्या पदरात गुंडाळलेला मी, मला यातलं काही सुद्धा जाणवत नव्हतं, कळत नव्हतं, समजत नव्हतं. त्यांना आधार होता तो एकमेकांचा आणि मला आधार होता त्या दोघांचा.

उघड्यावरती चालवलेला संसार आभाळाचं छत होतं. डोंगर दऱ्याच्या भिंती होत्या आणि आईसारखी मायेची उब देणारी ही धरणी माय होती. बघता बघता दोघांच छोटसं खोपटं उभं राहिलं. ऊन, वारा, थंडी पावसा पासून संरक्षण होणार होतं पण पोटाचं काय? हा मोठा आणि वैश्विक सत्य असलेला प्रश्न त्या दोघांसमोर उभा ठाकला. मी तीन महीन्यांचा अंगावरचं दुध पिणारा पण जीथे आड्यात नाही तिथे पोहऱ्यात कुठून येणार म्हणून माझ्या वडीलांनी मालकाच्या गयावया करून काही पैसे उसने आणले आणि लागणारा थोडा बहुत वाण सामान घेऊन आले पण हे सगळं बनवणार कशावर चला काड्या कुट्या गोळा करून चुल पेटेलही पण हे सगळं शिजवणार कशात. हा प्रश्न समोर होता.

माझी आई तशी प्रेमळ स्वभावाची मितभाषी होती आणि कुणाशी चटकन मिसळून घेणारी होती. कदाचित तिच्या ह्या स्वभावाचा फायदा त्यावेळेस

झाला असावा. शेजारीच शेतात सालानं राहणाऱ्या आमच्या शेजारच्या कडून आईनं तवा आणला. तवा आणला पण कनिक मळायाचं कशात तेव्हा पून्हा त्यांच्याकडून आईने काठूट आणली. बघता बघता त्या चुलीवर मागून आणलेल्या तव्यावर पहिली भाकर बनवली आणि दोघांनी उसने मागून आणलेल्या ताटात दोघांनी एकत्र भाकर खाल्ली. अशाप्रकारे दोघांनी घर सोडल्यानंतर दोघांच्या संसाराला सुरुवात केली. हे सगळं शक्य झाले ते त्यांच्यात असलेल्या जिद्दीमुळे, स्वाभिमानी वृत्तीमुळे.

इथल्या मातीत जन्मलेली सगळीचं कणखर असतात कारण माती भिजली की मऊ होते. उन्हाच्या तडाख्यात दगडासारखी टणक होते. परिस्थितीनूसार ती बदलत असते. म्हणून कदाचित मातीशी नाळ जुळणारी माणसं तशीच असतात. माती सारखी प्रेमाच्या वर्षाने मऊ होणारी आणि परिस्थितीच्या फटकाऱ्याने संकटाना सामोरे जाण्यासाठी कणखर होणारी.

माझ मऊ पण कणखर आईवडिलांच्या सहवासात सामर्थ्यवान झालं व त्या सामर्थ्याच्या बळावर आता मी ऐवढे करु शकलो.

***

# कष्टातच आपलं भाग्य असतं

एखादं रोप आपण लावावं आणि त्या रोपाचा वटवृक्ष व्हावा असं काहीस माझं झालेलं आहे. आपल्याला सासरची माणसं साथ देत नाही म्हणून आईनं कधी आपली नाराजी व्यक्त केली नव्हती. सासरचं घर सोडल्यानंतर पून्हा कधीही त्या घराचा उंबरा आपण चढणार नाही. ही गोष्ट तिच्या मनाला चटका लावणारी असावी असं मला वाटतं. कारण घरातील तिचा वावर, तिच्या हालचाली यातून ते स्पष्ट जाणत होतं. लग्न करुन आपण ज्या घरी आलो, घरात प्रवेश करताना उंबऱ्यात ठेवलेलं माप ओलांडल ते माप ओलांडताना हे घर समृद्धीने भरावे अशी मनोमन तिनं प्रार्थना केली होती. पण कुणाचं प्राप्त नपूसता येत नाही. नाईलाजान घर सोडाव लागलं. सासरच्या माणसांची साथ नव्हती. सोबत नव्हती, आधार होता तो नवऱ्याचा म्हणजेच माझ्या वडिलांचा.

माझे वडिलही आईला "तुझ्यामुळे मी माझ्या घरच्यांना सोडल" असं म्हटल्याचे माझ्या पाहण्यात आलं नाही. माझ्या वडिलांना पाहिलं की मला "भोळासांब सदाशिव शंभो" शंकराचे रुप दिसतं कारण त्यांच मितभाषी पण कमी बोलण हे कुणालाही चटकन हवं हवं वाटत होतं. त्यांचा भोळा भाबडा स्वभाव अंगी असलेली भूतदया हे सगळं मी पदोपदी अनुभवलं आहे.

मोठ्या कष्टानं माझ्या विठ्ठल रुक्मीणीचा संसार चालू होता. आमच्या कुटुंबात जन्माला येणारा आमच्या सगळ्या भावंडांमधील मी पहिला मोठा मुलगा म्हणून वाढत होतो. पोलिस पाटील आजोबांचा सहवास मला लाभला नाही याची खंत मनाला कधी वाटली नाही. कारण आई वडील जरी त्या घरी नव्हते पण ते तर हक्काने मला भेटायला येवू शकत होते. ते किंवा त्या घरातील कुणीही भेटायला आलं असतं तर बाई म्हणजे माझी आई आणि नाना म्हणजे वडील. तुम्ही येवू नका असं कधीही म्हटले नसते. पण तो पोलिस पाटलाचां मिजास असावा त्यांनी कधी साधी माझी भेट घेण्याचा प्रयत्न सुद्धा केला नाही किंवा आपली सून, मुलगा कसे आहेत यांची साधी चौकशी सुद्धा केली नाही. त्या वाचून बाई नानाचं कधी अडलं नाही. बाई नाना कष्ट करत होते. त्या कष्टांना सीमाच नव्हती. कष्टाची सर्व कामे हे दोघं मोठ्या हिम्मतीनं करत होती. दिवसभर काबाडकष्ट करुन सालानं काम करत असलेल्या मळ्यात झोपडी वजा घरात त्यांचा संसार फुलत होता, बहरत होता आणि माझं ही संगोपन ते करत होते. मी ही दिसा मासानं वाढत होतो.

"लहान पण देगा देवा मुंगी साखरेचा रवा" म्हणतात ते उगाच नाही. खरचं लहान पण किती छान असतं नाही. लहान पण अलवार स्वप्नील असतं नाही ? लहान पण म्हणजे आईच्या कुशीतल्या कोषात निजलेल्या सुरवंटा सारखं असतं नंतर त्या सुरवंटाचं फुलपाखरू होतं आणि बालपण भुर्ऽऽ दिशी उडून जातं. मी दिसा मासानं वाढत होतो. मी लहान असताना घरात सांभाळायला कुणी वडीलधारी मंडळी नसल्याने सालानं असलेल्या वाण्याच्या मळ्यात काम करताना बाई आणि नाना माझा सांभाळ करत होते. नांगरताना बैलांच्या जोखडाला झोळी बांधली जायची आणि त्यात मला टाकलं जायचं. बैल चालायला लागले की झोळी आपसुक हालायची. झोळी जरी बैल चालताना हलत असली तरी हाकाऱ्याच्या माझ्या बाई नानांच्या शब्दांचा त्या झोळीला हात होताच.

मी नवसाने झालो. बाई नानांनी मावल्यांना नवस केला होता की, ५ वर्ष जावळ ठेवेन म्हणून माझे केस मोठे होते. माझी बाई कामात असेल तर त्या मळ्यामध्ये येणाऱ्या मोलमजूरीसाठी आलेल्या रोजंदारीवाल्या माणसांनी माझा सांभाळ केला. मला ती माणसं कोण होती, कोणत्या जातीची होती, कोणत्या मातीची होती. मला फक्त एवढचं जाणवत होतं ती माणसं होती हाडा मासाची, भावनांनी, आपुलकीने ओतप्रोत भरलेली. रक्ताच्या नात्यापेक्षा मनाची नाती अधिक घट्ट बांधलेली असतात हेच खरं मला आजोळ नसलं तरी ह्या सर्व मोल मजूरी करणाऱ्या माणसांनी माझं आजोळ भरून काढलं होतं त्यात कुणी माझे आजोबा होते, कुणी आजी होतं तर कुणी आत्या, कुणी मामा, कुणी काका तर कुणी मावशी, कुणी लाडानं जवळ घ्यायचं मला फिरवून आणायचे, माझे केस मोठे असल्यानं कुणी माझ्या वेण्या बांधून देत या सगळ्यांमध्ये मी रमायचो, खेळायचो. ते ही माझ्या सोबत पून्हा एकदा लहान व्हायचे, तशी माझी तब्येत नाजूकच होती.

बाई नाना कष्ट करत होते, घामाने मळा शिंपीत होते आणि मीही त्यांच्या कष्टात भर घालत होता. मी सारखा आजारी पडून त्यांना संकटात टाकत होतो माझ्या आजारपणाला औषध उपचार पैसे नसल्यास ते काय तडजोड करत असतील हे त्यांनाच माहित. पण मला अंधुकसं आठवतय एकदा मी आजारी पडलो, थंडी तापाने अधिक जोर धरला तेव्हा नाना व बाईने पै पै जमा करुन मोठ्या कष्टाने विकत घेतलेला संसाराची भांडीकुंडी सुद्धा मोडावी लागली होती. माझ्यासाठी त्यावेळी तांब्याचा मोठा हंडा बाईंने

मोडल्याचं मला अजूनही आठवतं.

मला बाई व नानांनी कधीच एकट सोडलं नाही. सतत माझ्यासोबत कुणीना कुणी असायचेच. वंशाचा पहिला कुलदिपक म्हणून असेल कदाचित मी हट्टी ही तितकाच होतो किंवा अतिलाडाने शेफारलेला होतो असं म्हंटल तरी चालेल. बाई नानांचा सहवास मला अधिक मिळतच होता. नाना मळ्यात बारे द्यायला जायचे तेंव्हा मला सोबत घेऊन जायचे. बांधावर बसवायचे आणि मळ्यात बारे द्यायचे. सालानं कसायला दिलेल्या शेतमालकाच्या घरी नाना रोज दूध टाकायला जायचे तेंव्हा मला घेऊन जायचे. बाई मळ्यात कामाला जाताना मला घेवून जायची, बाजारात जाताना मी तीच्या कडेवरच असायचो. त्यामुळे माणसांच्या सहवासाची सवय लहानपणापासून मला ही कायमची जडली.

कष्टात उभा केलेल्या बाई नानाच्या संसाराला आणखीन एक फुल फुलंल. मला भाऊ झाला. अडीच तीन वर्षाचा होतो तेव्हा तो झाला. त्याचं नाव एकनाथ. बाई काही प्रमाणात अधिक कामात अडकून गेली. मीही चालता फिरता झालो होतो. थोडा समजता झालो होतो.

माझ्या आयुष्यातला एक प्रसंग मी कधीच विसरु शकणार नाही. बालमनावर कोरल्या गेलेले प्रसंग चिरकाल तसेच असतात. अगदी आतापर्यंत तो प्रसंग तसाच स्मरणात आहे. मी पाच वर्षाचा असेन, आम्ही राहत असलेल्या मळ्या लगत एका बांधाच्या त्या बाजूला एक विहीर होती आणि त्या बाजूला जूनं मोडकळलेल घर होतं. कौल छतावर ओघळून गेली होती. भिंतीच अस्तित्व सांगण्यासाठी काही ठिकाणी माती विटांचा ढिगारा होता. तिथून अचानक लोकांचा गलका ऐकू आला. काय आहे म्हणून उत्सुकते पोटी मीही गेलो. लोकांच्या गर्दीला बाजूला सारत थोडा पुढे जाऊन बघण्याचा प्रयत्न करत होतो. तिथे नाना पण होते त्यांनी मला उचलून घेतलं. त्या ढिगाऱ्यात सापाची जुळण होती आणि त्यांच्या आजूबाजूला बरेच साप होते. हे पाहून सुरुवातीला धडकी भरली पण आपण काहीतरी दिव्य पाहात आहोत असा भास झाला. आजूबाजूचे सर्व लोक तो प्रकार पाहत होते. त्यातले काही मोठ्याने ओरडून नवीन कपडा आणा असं सांगत होते. नवीन कपडा कशाला हे मला कळेना. तेंव्हा थोड्या वेळानं समजलं की सापाच्या जुळण वर नवीन कपडा टाकून तो कपडा घरात ठेवल्यास शुभ असतं. मग मीही धावत सुटलो नवीन कपडा घेण्यासाठी. कारण मला कुठे तरी वाटत

होतं की हे सगळं केल्याने आपण सुखी होऊ. इतर मुलांसारखं चांगल्या मोठ्या घरात राहता येईल. आपला स्वतःचा मळा असेल. बाई नानांना कष्ट करावे लागणार नाही. अशा भावना मनात घेऊन मी नवीन कपडा शोधू लागलो. धावत घरी आलो. आई भावाला मांडीवर घेऊन काहीतरी करत होती. सर्व घर धुंडाळल सर्व बोचकी बाचकी वर खाली करुन पाहिली. बाई विचारत होती.

“दादा काय करतोय”

मी म्हणालो मला नवीन कपडा पाहिजे.

तशी बाई म्हणाली

“दादा आपल्याकडे कपडा नाही रे”

मन उदास झालं तरी आशा मात्र सोडली नव्हती. मी शोधत होतो. ही अवस्था माझ्या एकट्याची नव्हती. ज्याला सुख हवं होतं ते सर्व नवीन कापड शोधत होते पण नवीन कापड कुणालाच मिळाले नाही. बघता बघता ती सापाची जुळणं झाडी झुडपात निघून गेली. पण नवीन कापड काही त्यांच्यावर कुणाला टाकता आलं नाही. सर्व उदास झाले ह्या सगळ्यात मी एक शिकलो. अशा सांगीवांगीच्या गोष्टीच्या मागे लागून आपलं नशीब जोर धरत नाही. त्यासाठी कष्ट करावे लागतात. नवीन जुन्या कापडाच्या धाग्यात आपलं भाग्य नसतं तर हातातल्या कष्टात आपलं भाग्य असतं...

***

# हे विश्वची माझे घर

घरं हा शब्द माझ्या मनात घर करुन राहिला आहे. प्रत्येकाची अपेक्षा असते आपल्याला स्वतःच घर असावं. ऊन, वारा, थंडी, पावसापासून संरक्षण करणारं स्वतःच हक्काच घर. मानवाची प्रगती ही त्याच्या घरावरुन निदर्शनास येते असं मला वाटतं. गरीबाला त्याची झोपडीचे कौलारू घर व्हावं, कौलारू घरात राहण्याला घर दुमजली व्हावं, दुमजली घर असणाऱ्यांना आपलं घर राजवाडा व्हावा, राजवाड्याचा असा महाल व्हावा जीथे सर्वत्र आनंद सौख्य व समृद्धी असेल.

माझ्या आयुष्यात घर म्हणजे एक वेगळंच प्रकरण आहे. हक्काचं घर स्वाभिमानी वृत्तीने सोडून बाई आणि नानांनी स्वतःच्या वेगळ्या संसाराला सुरुवात केली. मी पाच वर्षाचा झालो होतो आणि एकनाथ दोन वर्षाचा. तसं बाईच शिक्षण ही नानांपेक्षा जास्त शिकलेली होती. त्या वेळच्या चौथी इयत्ता पर्यंतच शिक्षण बाईच झालेलं होतं आणि नानांच दुसरी. बाईनं कधी आपलं शिक्षण आपल्या नवऱ्यापेक्षा जास्त आहे हे कधी भासवलं नाही. अत्यंत साधी भोळी दोघजण आपला संसार थाटत होती. नूकताच दिवाळी सण दिवाळं काढून गेला होता. शाळेचे प्रथमसत्र पूर्ण झाल्यानंतर आईनं माझं नाव खेड्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेत नोंदविल होतं. मी शाळेत जाणार हे आई मला समजावून सांगत होती. आतापर्यंत फक्त शाळेत जाणारी मुलच पाहिली होती. आतापर्यंत शाळेत कधीच गेलो नव्हतो. मी शाळेत जाणार म्हणून बाई मला आदल्या दिवशी बाजारातून खापराची पाटी आणि एक अंकलिपी व बालभारतीचे पुस्तक आणले होते. नवीन अंकलिपीचा व पुस्तकाचा वास नाकात भरून राहिला होता. शाळेत जाण्याची स्वप्न सामावून आदल्या रात्री मी झोपलो होतो.

सकाळी उशीरा उठलो. उठून पाहतो तो आई चुलीपुढे बाजरीच्या भाकरी थापत होती. भाकरी थापताना हातातील चुड्याचा ठसा त्या थापून केलेल्या भाकरीवर उमटत होता. त्या रूपात माझी आई साक्षात अन्नपूर्णा वाटत होती. मी डोळे चोळत उठलो.

बाई मला म्हणाली,

"उठलास दादा, आटप लवकर शाळेत जायचं ना!"

मी आनंदाने उठलो शाळेत जाण्यासाठी तयारीला लागलो. मी उद्या शाळेत

जाणार म्हणून आदल्या दिवशी आईने माझे कपडे स्वच्छ धुवून वाळत घातले होते. घराच्या बाहेर आंघोळीचा दगड होता. त्यावर बसून उन्ह पाण्याने आंघोळ केली. आईने धुतलेले कपडे घातले. बाई म्हणाली, “दादा ये बस दोन घास खावून घे.”

मी मांडी घालून आई समोर बसलो आईने घाई घाई मला वाढलं. मी आईने थापलेली भाकर मी निहाळू लागलो. आई ही भाकर अशी गोल कशी बनवत असेल. हा प्रश्न मला पडला. माझं रवंथ करत हळू हळू खाणं आईला पटल नाही. ती उठली आणि मला हाताने भरवू लागली. एकनाथला नाना सोबत घेवून शेतात गेले होते. आई मला बजावून सांगत होती, “दादा शाळेत जायचं शाळेत गुरूजी जे सांगतील ते सगळं ऐकायचं., निट लक्ष देऊन सगळं समजून घ्यायचं.”

मी फक्त मानेने होकार दिला. खाऊ घालून झाले. नवसाचं जावळ असल्याने माझे मोठे केस होते आणि त्या केसाची वेणी घालून दिली. वेणी घालत असतांना ती आपल्या स्वप्नांची पेड घालत होती. अस मला जाणवत होतं.

आई माझा हात धरून घराच्या बाहेर निघाली. दाराला कडी घातली आणि मळ्यातून पायी पायी मला शाळेत घेवून जाऊ लागली. रस्त्याने चालताना तिच्या पायाला काट्याकुट्यांची काही पर्वा नव्हती. तिला फक्त मला शाळेत घेऊन जायचं होतं. मला शिकवायचं होतं, मोठं करायचं होतं. माझ्या भविष्याच्या वाटचालीसाठी बाई काट्या कुट्यांच्या वाटेवरून चालत होती.

बाईने मला शाळेपर्यंत पोहचवलं त्यावेळी १ ली ते ४ थी वर्ग एकाच खोलीत भरत असत. फक्त वर्गानूसार रांगा वेगवेगळ्या असायच्या. वर्गात सगळी मुलं रांगेत बसली होती. बाईनं नवीन घेतलेलं पुस्तक पाटी मी एका पिशवीत भरून आणली होती. बसायला एक गोणपाट काखेत होते. बाई मला वर्गात घेऊन आली आणि गुरूजींना म्हणाली, “हा हाय माझा मुलगा प्रकाश. हा शाळेत येईल याच्याकडे लक्ष द्या.”

हे म्हणत असतांना गुरूजींनी माझ्याकडे पाहिलं. प्रथम दर्शनी कुणाही लहान मुलाला हा भोकाड्या म्हणून घाबरवावा असे गुरूजी बघून मलाही भीती वाटली. गुरूजींनी हुकमी स्वरात ऑर्डर सोडली, जा त्या रांगेत बसून

घे. आईने धरलेला माझा हात मी सोडला व जणू माझा हात देवी शारदेच्या हातात दिला. मी घाबरत घाबरत त्या रांगेत जावून बसलो. माझे मोठ्ठे केस आणि हा अवतार बघून मुल माझ्याकडे टकामका बघत होते. बाई घरी निघून गेली.

या सगळ्यात मी जसा मंगळ ग्रहावरून आलेला कुणी असावा असं त्यांना वाटत होतं. एखाद्या जादूगाराने आपल्या बटव्यातून काहीतरी अद्भूत काही काढून दाखवतांना मुलांचे जे भाव असतात तसे भाव मला त्या सगळ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. मी अंगचोरून हातातली पिशवी घेऊन रांगेत सगळ्यात शेवटी बसलो. गुरूजींनी चुळबूळ करणाऱ्या सर्व वर्गावरून एक करडी नजर फिरवली वर्ग शांत झाला. सर्वांनी आपआपल्या पिशवीतून पाट्या काढल्या मी पण त्या मुलांचं अनूकरण केल गुरूजींनी हातात खडू घेतला आणि शिकवायला सुरुवात केली.

मी शाळेत उशीराने प्रथम सत्र संपल्यानंतर दाखल झालो होतो. म्हणजे दिवाळी नंतर तो पर्यंत गुरूजींचा अभ्यास फारच पुढे गेला होता. मी जे शिकणार होतो त्याचा आगापिछा मला काही माहित नव्हता.

गुरूजींचा फळ्यावर लिहू लागले. मुलही पाटीवर गिरवू लागले. लिहून झाल्यानंतर गुरूजींनी ते लिहिले मोठ्यानं म्हणून दाखवलं. त्यांच्या पाठीमागे सगळ्यांनी एका तालासुरात म्हणायला सुरुवात केली. माझी पहिली वेळ साधी अक्षरांची कोणतीही तोंड ओळख नसतांना फळ्यावर लिहिलेले माझ्या तोंडातून बाहेर पडाव कसं? मी फक्त लाजेकाजे तोंड हलवत होतो. एक पाठ दिवसभरातून पूर्ण झाला. मास्तरांनी गृहपाठ दिला. शाळा सुटली आणि मी घरी पोहचलो. मला शिकवलेलं काही समजलेल नव्हतं. “नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे” अशी माझी अवस्था झाली होती. त्यात मास्तरांनी आम्हाला गृहपाठाला ‘घर’ हा शब्द दिला होता. साधी अ आ ई ची ओळख नसणारा मी अक्षर म्हणजे काय हे सुद्धा माहित नसणारा सरळ शब्द काय लिहिणार होतो. हा गृहपाठ माझ्याकडून कसा पूर्ण होणार होता? बसं मनोमन मी ठरवून टाकलं उद्यापासून शाळेत जाणार नाही. मनातल्या मनात शाळेला कायमच टाळं लावून मी घरी पोहोचलो. बाई मळ्यात काम करुन नूकतीच आली होती. घरातील पसारा आवरता आवरता एकनाथाला संभाळत होतो. मला पाहून ती म्हणाली, “आलास दादा कसा गेला रे शाळेचा पहिला दिवस.”

मी घरात प्रवेश करताच एखाद्या यूद्धावरुन विजयी होऊन आल्याच्या अविरभावात प्रवेश केला. शाळेची पिशवी जागेवर ठेवून दिली. बसायची गोणपाट तिच्या बाजूला ठेवली आणि एकनाथाकडे धावलो आईने विचारलेल्या प्रश्नांच कोणतही उत्तर मी दिलं नाही. बाईने पुन्हा विचारलं त्यावेळेस फक्त हुँ। एवढेच म्हणालो. कारण आता मला शाळा हा विषय नको होता. गृहपाठ नसल्यावर रागाने मारक्या रेड्या सारखे बघणारे गुरूजी आणि हातावर छड्यांचा तडाखा देण्यासाठी आसूसलेले त्यांचे हात या सगळ्यांपासून मला कायमचा राम राम घ्यावयचा होता. शाळा आणि मास्तर हे विचार डोक्यात सारखे रेगांळत होते.

बघता बघता अंधारुन आलं. जेवणं झाली, अंथरुण पडली मीही बाईच्या कुशीत शांत झोपण्याचा प्रयत्न करत होतो. पण डोळ्यासमोरुन आणि डोक्यातून शाळा आणि गुरूजी काही जात नव्हते. या कुशीवरुन त्या कुशीवर होता होता रात्री उशिरा पर्यंत झोप लागेना. विचारांच्या तंद्रित केंव्हा झोप लागली हे कळलचं नाही, माझे मन म्हणत होते उद्या सकाळी जेंव्हा आपण उठू तेव्हा शाळा हे एक स्वप्न असेन.

रात्री उशिरा झोपल्यामुळे सकाळी उशिरा जाग आली. बाईचं बऱ्यापैकी आवरुन झालं होतं. स्वयंपाक झाला होता. मी उठलेला पाहून बाई म्हणाली, “दादा आवर लवकर शाळेत जायला उशीर होईल.” हे ऐकल्या बरोबर पोटात भितीचा गोळा उठला. मी शाळेत जाणार नाही! असं बाईला कसं सांगायच? मी अंथरुणात ठिय्या मांडून बसलो. बाई पुन्हा म्हणाली,“आवर उठ”, सगळा धीर एकवटून मी म्हणालो,“मी शाळेत नाही जाणार.”

हे ऐकल्या बरोबर बाईच्या कपाळावर आठ्या पडल्या. कपाळावरचे कुंकू आठ्यामध्ये अर्धा अधिक लपून गेले. मी म्हणलो,“मला भिती वाटते” “कसली?”

“मास्तरांची! ते मारतात.” त्यावर ती प्रेमाने म्हणाली, “अरे मग तुझ्या भल्यासाठीच ना” माझा कंठ दाटून आला होता. “मला ते काय शिकवतात ते काही समजत नाही.” त्यावर अतिशय सुंदर असं उत्तर बाईनं दिल्याचं मला आठवतं.

“अरे दादा गाता गळा, शिकता मळा तसा लिव्हता हात वळा” ते उगाच नाय म्हणत.

पण त्यांनी गृहपाठ दिला 'घर' हा धडा.

"लिहून आणायला लावला." मग लिहायचा ना! मी शाळेत जाणार नाही. या हट्टाला पेटलो मी मोठ मोठ्याने रडू लागलो. धर आपट करु लागलो. मी शाळेत जाणार न्हाय असं मोठ मोठ्यानं बोलत होतो. बाईनं बळजबरीने माझी तयारी करायला लागली. मी काही केल्या ऐकत नव्हतो. त्यावेळेस बाई ने मला मारलही असतं पण मारलं नाही. कदाचित माझ्यावरच्या अधिक प्रेमापोटी असेल किंवा मी नवसाचा होतो म्हणून असेल पण माझ्यावर तिने कधीच हात उगारला नव्हता. तिनं मला आवरत सावरत शांत करत कधी दमदाटी करत माझ्या शाळेची तयारी करुन दिली आणि पुन्हा मला शाळेत घेऊन गेली. माझ रडणं ओरडणं चालूच होतं. तिने मला जुमानलं नव्हतं तिने मला ओढत शाळेचा रस्ता धरला होता. शाळेत जाताना एक नाला लागायचा तिथपर्यंत आम्ही पोहोचलो. बाई मला रस्त्यावर असलेल्या पुलाजवळ आडोश्लाला घेऊन बसली. हातातली गोणपाट जमीनीवर आपटली मला बसवलं पिशवीतून पाटी काढली आणि त्या पाटीवर तिने मला घर शब्द कसा लिहायचा हे शिकवले जणू देवी सरस्वती मला आपल्या मांडीवर बसवून शिकवत होती.

मानवी प्रगतीचं स्वरुप 'घर' या शब्दातून माण्या आयुष्यात गिरवलेलं पहिलं अक्षर 'घर' ठरलं हीच खरी शिक्षणाची सुरूवात. बाई जणू समजून सांगत होती. दोन्ही बाजूस पाटीभर 'घर' या धड्याचा गृहपाठ पूर्ण झाला मला धीर आला अन् ती म्हणाली,"चल आता शाळेत"

मी कोणतेही आढेवेढे न घेता तयार झालो. माझ्या गोणीची घडी घातली काखेत धरली नीट व्यवस्थित पिशवीत ठेवली. आईचा हात पकडला अन् शाळेची वाट धरली. आई नं शिकवलेलं पुसल्या जाऊ नये म्हणून मी पिशवी शरीरापासून लांब धरत जास्त हेलकावे न देता सावकाश नेत होतो. खऱ्या अर्थाने आजपासून माझ्या शिक्षणाला सुरुवात झाली होती. इतरत्र मुल स्वर, व्यंजनांनी सुरुवात करतात पण माझ्या शिक्षणाचा श्री गणेशा माझ्या बाईने 'घर' या शब्दापासून करून दिला होता. हे 'विश्वच माझं घर' हेच यदाकदाचीत साक्षात माझ्या बाईच्या माध्यमातून देवी सरस्वतीने मला सांगितलं. तोच विचार आज अंधाराकडून प्रकाशाकडे जातांना.....

***

# बालमनावरील संस्कार

वाळू मुठीत जेवढी घट्ट धरुन ठेवू तेवढी ती हातातून घसरु लागते अन् शेवटी हातात काहीच राहत नाही. राहते ती फक्त हाताला चिकटलेली वाळू ! तशाच असता आपल्या बालपणीच्या आठवणी मनाला घट्ट चिकटलेल्या असतात, वाढत्या वयाप्रमाणे मुठीतून आपलं बालपण निसटून गेलेल असतं, त्यातील काही मोजक्याच आठवणी माझ्या मनाला घट्ट चिकटून राहिल्या आहेत.

शाळा आणि घर यात मी वाढत होतो. पहिली ते चौथीचं शिक्षण माझं सुरळीत चालू होतं. बाईनं करुन दिलेल्या शिक्षणाच्या श्री गणेशाने मी प्रगती करत होतो. पहिली ते चौथी चे सर्व वर्ग एकाच खोलीत भरत होते. मी अभ्यासात मग्न होऊ लागलो. त्याचा परिणाम असा झाला की, माझ्या इयत्तेच्या पुढच्या इयत्तेचा अभ्यास माझा झाला होता. ४० पर्यंत माझे पाढे तोंडपाठ होते. इयत्ता तिसरीत असताना मी चौथीचे गणितं सोडवत होतो. माझ्या आयुष्यात स्वच्छतेचा पाठ मी शाळेतच शिकलो होतो. मला चांगला आठवतो तो प्रसंग,

मी इयत्ता तिसरी पर्यंत दात घासत नव्हतो, एके दिवशी इयत्ता तिसरीत असताना मास्तरांनी मला वर्गात सर्वांसमोर उभं केलं आणि वर्गातील सर्व मुलांना दात दाखवायला सांगितले. मी शरमेने मान खाली घातली होती. मास्तर ओरडले “दाखव दात!” मी लाजेकाजे भिती पोटी दात दाखवले. माझे पुढचे दात थोडे मोठे होते आणि इयत्ता ३ री पर्यंत दात घासलेले नसल्यामुळे ते अधिकच पिवळे झालेले होते. माझे पिवळे झालेले दात बघून सर्व मुलं मोठमोठ्याने दात दाखवू लागले. गुरूजींनी टेबलावर छडी आपटली, वर्ग शांत बसला. गुरूजी सर्व मुलांसमोर मला नाही नाही ते बोलू लागले. माझ्या मनाला शब्दांची बोचणी लागली होती दिवसभर मुलं माझ्याकडे बघून दात दाखवत होती. मी रागारागात घरी गेलो. चुलीतून कोळसा घेतला आंघोळीच्या दगडावर ठेवून एका छोट्या दगडाने त्या कोळशाची बारीक भुकटी केली. घरात गेलो खडे मीठ होते ते त्या कोळशाच्या भुकटीत टाकलं आणि दगडाने ठेचू लागलो जी मुलं मला दात दाखवत होते त्यांचे चेहेरे मला कोळसा ठेचताना दिसत होते. मी रागाने जोर जोरात दगड आपटत होतो. त्या कोळशापासून आणि मीठापासून मंजन तयार मी केलं आणि रागाने जोर जोरात दात घासू लागलो. नंतर मी नेहमी येता जाता दात घासू लागलो. जो पर्यंत माझे दात पांढरे होत नाही तो पर्यंत मी दात घासत

असत, तेव्हा स्वच्छता ही मानवी आरोग्याला हीतकारक असते हे समजले तेव्हा पासून स्वच्छता हे तत्त्व अंगी रुजवले.

बालपण खूप हवंहवसं वाटत असत. बालपण हे निरपेक्ष असतं त्यातील आनंद सात्विक असतो. प्रत्येकाला आपलं बालपणं म्हणजे कस्तुरी गंधा समान वाटत असतं. तस माझंही बालपण गरिबीच पण आनंदाच होतं. गावरानात हिंडणार मळ्या खळ्यात फिरणारं होतं. खळ्यावरून आठवतोय तो संजय आमच्या मालकाचा मुलगा. आमच्या मालकाचं राजदूत गाडीच शोरूम होतं आणि आमच्या गावात त्यावेळेस दुचाकी गाडी कुणाकडेच नव्हती. त्यावेळी गावात दुचाकी दिसणं म्हणजे आश्चर्य असायचं. त्यावेळी आमच्या मालकाचा मुलगा संजय गावात त्याची फटफटी घेऊन यायचा. त्या फटफटीचा आवाज ऐकला की आम्ही सगळी पोरं आमच्या मळ्याला लागून असलेल्या नदीच्या बांधावर जमत असू. त्यावेळेस ही फटफटी आम्हा मुलांचं एक आश्चर्य असायचं मला फटफटी बोलता यायचं नाही मी आपला बोबड्या शब्दात फटाटी म्हणत मुलांच्या मागे धावत जायचो.

संजयच्या फटाटीचा आवाज लांब वरुन कानावर पडला की, सर्व आरडाओरड करत त्या मागे धावायचे. संजय त्या मुलांचा आनंद आपल्या फटाटीचा वेग वाढवून अधिक करायचा. मळ्याच्या वाकड्या तिकड्या ओबड-धोबड वाटे वरुन त्याची फटाटी फट फट फट आवाज करत धुराळ उडवत वेगाने चालत असायची. नंतर तो मळ्यात धान्य पाखडण्यासाठी सारवून स्वच्छ असलेल्या गोलाकार खळ्यात त्याची फटाटी घेऊन यायचा आणि गोल गोल चकरा मारायचा. जत्रेतल्या मौतका कुवाँ वाले जसे गोल गोल गाडी चालवतात ना! अगदी तशीच. त्याचा वेग वाढत जायचा तसं माझ्या काळजात धस्स व्हायचं. मला भिती वाटायची हा संजय एवढ्या वेगात गोल गोल गाडी फिरवतो आहे, त्याला चक्कर कशी येत नाही याचं नवलही वाटायचं. वीस पंचवीस चकरा झाल्या की, आम्हा सर्व मुलांना टाटा करुन पून्हा धुराळा उडवत मळ्याच्या खिळखिळ्या रस्त्यावरुन निघून जायचा. त्याच्या ह्या गोलाकार चक्रात मीच अडकून पडलो असं मला वाटायचं. गोल आरंभ बिंदूला पून्हा मिळणे तसाच प्रसंग काहीसा आमच्या सोबत झाला आहे.

***

# शाळेत शिकतांना

बालमनावर शाळा सुद्धा अधिक परिणाम करत असते. शाळा म्हणजे मुलांचे अनुभवाचे, आनंदाचे व ज्ञानाचे एक भांडार. या अथांग ज्ञान सागरातून ज्ञानाचा एक थेंब सुद्धा मिळनं मुश्कील आहे, असे म्हणतात ते उगाच नाही! हे ज्ञान मिळवत असताना अनेक प्रसंग असे घडतात ते चिरकाल स्मरणात राहतात. असा स्मरणात राहणारा असा प्रसंग इयत्ता पहिलीच्या वर्गात असताना झाला होता. आम्ही पहिली ते चौथी चे सर्व मुलं एकाच वर्गात बसत असू, वर्गानूसार रांगा जरी वेगवेगळ्या असल्या तरी गुरूजी मात्र एकच होते. आमच्या पहिलीच्या रांगेला गुरूजी एकं-दोनं शिकवत होते. गुरूजी मोठ्या ने एकं-दोनं बोलत होते. आम्ही सर्व पाटीवर ते लिहत होतो. लिहून झाल्यावर गुरूजींनी आम्हा सर्व मुलांच्या पाट्या जवळ येऊन तपासायला घेतल्या. माझी पाटी तपासायची वेळ आली, पाटी हातात घेऊन गुरूजींनी पाटीवर नजर फिरवली आणि तीच नजर रागावलेली होऊन पून्हा माझ्यावर आली. काय झालं हे समजलं नाही तेवढ्यात गुरूजींचा जरबी आवाज आला, "गाढवा ३ असा काढता का?" मी गुरूजींकडे बघून फळ्याकडे बघितलं तर मी ३ अंक पाटीवर न लिहिता ६ लिहिला होता. गुरूजींनी तो पुसला आणि पाटी माझ्या हातात दिली व मला पुन्हा ३ अंक हात धरून गिरवून दाखविला. माझे पाय लटपटायला लागले. हाताला कापरं फुटलं, मी थरथरत्या हाताने पाटी घेतली आणि भित-भित पून्हा तीन लिहू लागलो पण भिती पोटी पून्हा तीनचा सहाच झाला. गुरूजींचा पारा शिगेला पोहचला ते रागाने लालबुंद झाले व डोळे गरगर फिरवत बोटांची चापट कधी पडली ते कळलचं नाही. गाल लाल झाला, गालावर बोटांचे निशाण उमटले श्वासोच्छवास उष्ण झाला. डोळ्यांच्या कडा पाणावल्या, मोठ्या हिम्मतीनं अश्रूंना बांध घातला होता तो बांध सुटला डोळ्यांतून गंगा-जमूना वाहू लागल्या व भिती पोटी सरस्वती ही वाहू लागली. आणि साक्षात त्रिवेणी संगमाचे दर्शन घडले. माझ्या बसण्याची जागा ओली झाली. मुलं बाजूला सरकली गुरूजींनी हातातली पाटी हिसाकावून घेतली आणि पून्हा एक मोठा तीन काढून दिला आणि पून्हा पून्हा गिरवायला लावला. मी रडत रडत खापराच्यापाटीवर तीन गिरवत राहिलो. जो पर्यंत माझी चूक सुधारत नाही तो पर्यंत प्रयत्न करत राहिलो. माझ्या या अज्ञानाच्या अंधाराला प्रयत्नाने प्रकाशाची वाट दाखवत राहिलो. हाच धडा जीवनात पहिलीच्या वर्गात मिळाला. सातत्य आणि प्रयत्नाने अंधाराकडून प्रकाशाकडे जात राहिलो.

मुलांच्या मनात जर एखाद्या गोष्टीची भिती बसली की ती कायमची तिथेच घर करुन राहते. भितीचा हा बागुलबूवा त्याच्यात न्यूनगंड निर्माण करतो. माझं तसं झाली नाही, मी माझी भिती ही माझी कमतरता समजली आणि त्यावर मात करण्याची जी जिद्द माझ्यात निर्माण करत राहिलो. बालवयात न समजणारा, न उमजणारा विषय हा कायमचा न आवडणारा होतो. ३ च्या अंकावरुन  मार खाल्ला म्हणून गणित हा विषय माझ्या नावडतीचा व्हायला हवा होता. पण तसे झाले नाही. याउलट मी त्याविषयाचा जास्तीत जास्त अभ्यास करु लागलो. वेळ मिळेल तेंव्हा गणित, पाढे, अंकउजळवणी यांच्या कुस्ती करत राहिलो आणि शेवटी गणित विषयावर विजय मिळवला. पहिलीच्या वर्गात मी कमी दिवस शाळेत गेलो तरी प्रथम क्रमांकाने पास झालो नव्हे तर चौथीच्या वर्गापर्यंत मी पहिला नंबर सोडला नाही. नंतर तीसरीच्या वर्गात असतांना ४० पर्यंत पाढे पाठ केले होते. पाढे पाठांतर हा सुद्धा माझ्यासाठी मोठ्या गंमतीचा विषय आहे. २ री त असताना मनात ठरवून टाकलं होतं आपण गणितात हुशार होणार म्हणून पाढ्यांच्या मागे हात धुवून लागलो. एक पाढ्यांची अंकलिपी ही सतत माझ्या सोबत असायची. जेंव्हा वेळ मिळेल, जिथे वेळ मिळेल तिथे मी पाढे पाठांतर करत असे. माझ्या पाढे पाठांतराला जर कुणाचा वाटा असे विचारले तर मी आवर्जून आमच्या गायीचा वाटा सर्वाधीक आहे असेच सांगेल. कारण गाय चारायला नेण्याची जबाबदारी माझी होती. कारण अनिल माझा भाऊ अजून लहान होता. त्यामुळे घरातली बरीचशी कामे मला करावी लागत. मग मी गाय चारायला घेऊन जाताना एका हाता तीच्या गळ्यातील, एका हातात दावं आणि दुसऱ्या हातात अंकलिपी घेऊन तिला पाटाला चरायला घेऊन जायचो. पाटाच्या उताराला हिरवंगार गवत असायचं व मी हातात दावं धरुन पाटावरील दगडाचा आधार घेत गाय चारत बसायचो. गाय आपली उतारावर चरायची मग मी मोठ-मोठ्याने अंकलिपीतील पाढे पाठ करायचो. पाढे पाठ करत असताना गाय मर्यादेपेक्षा पुढे जाण्याच्या प्रयत्नात गळ्यातील दावाला झटका द्यायची. माझी पाढे पाठांतराची तंद्री भंग व्हायची दावं खेचत पून्हा पहिल्या पासून पाढे पाठांतर सुरु व्हायचं. ही क्रिया वारंवार व्हायची आणि पाढे पाठांतर जास्तीत जास्त होत हाते.

खरं पाहता आपल्याला आपल्या अंधाऱ्या प्रवासात कुणी तरी सोबती हवा असतो म्हणजे अंधाराकडून प्रकाशाचा प्रवास सोपा होतो. पण भितीच्या अंधाराकडून प्रकाशा पर्यंतच्या प्रवासात आमची गाय माझी सोबती झाली

होती. जणू ती दावं खेचून मला सांगत होती, तुझा प्रवास खूप लांबचा आहे. इथे थांबून चालणार नाही. एवढ्यावरच भागणार नाही. तुला चालावं लागेल. किती ही बिकट असली वाट, वाटेवरती असले जरी काटे आणि खाच खळगे, पायाला होत असतील असंख्य वेदना, या सगळ्यावर मात करत तुला प्रवासी व्हायचंय ते यशाचं, या प्रगती पथावर आराम नसतो, विश्राम नसतो आणि नसतो कधी पूर्ण विराम, तिथे असतो फक्त प्रवास, प्रकाशाचे सानिध्य मिळेपर्यंतचा प्रवास. अंधाराकडून प्रकाशाकडे हा अवघड पण आनंददायी प्रवास मी करत राहिलो.

***

# शिक्षणातून समृद्धीकडे

शाळेत न जाण्यासाठी लहानपणी अडून बसणारा मी आता नियमीतपणे शाळेत जाऊ लागलो होतो. शाळा म्हणजे आता आनंद आणि ज्ञान देणारं एक विद्यामंदीर वाटू लागलं. देवी शारदाही माझ्यावर प्रसन्न होती असं मला वाटत होतं. कारण इयत्ता तिसरीत असतांना मी चौथीचे गुणाकार, भागाकाराचे गणितं सोडवू लागलो. गुरूजी सुद्धा मला चौथीच्या मुलांना गणित शिकवायला लावायचे. इयत्ता तिसरीचा मुलगा चौथीच्या मुलांना गणित शिकवतो हे पाहून इतर मुलं माझ्याशी आदरानं वागू लागली होती. माझ्याशी मैत्री करु लागली. केवळ गणितचं नव्हे तर इतर विषयही माझे हळूहळू पक्के होत गेले. अभ्यासाच्या गोडीनं मला जगण्यातला आनंद दिला. इयत्ता चौथीच्या वर्गात गेल्यावर शालेय मंत्रीमंडळात आदराने व सन्मानाने शिक्षणमंत्री सर्वानूमते बनविण्यात आले.

ज्ञानाने, वाचनाने, माणूस समृद्ध होतो त्याला जगाचं ज्ञान मिळतं, माणसं कळतात, माणसांचे भावनिक चढ-उतार कळतात. या सर्वांसोबत वाचनाने मला नवीन कपडे दिले. त्याचं काय झालं मी नियमीत शाळेत जायचो शिक्षणाची आवड होती आणि तिसरीला असताना चौथीच्या मुलांना गणित शिकवणारा हुशार मुलगा म्हणून गावात माझी ख्याती निर्माण झाली होती.

आमच्या गावात टेकड्यावर छब्बू मामाच्या घरी श्रावणात पोथी वाचनाचा कार्यक्रम असायचा. एके दिवशी घरी निरोप आला मला छब्बू मामाने बोलवलं. मी छब्बू मामाकडे गेलो तेंव्हा नवनाथाचा ग्रंथ वाचनाची तयारी सुरू होती. घरातील व गावातील मंडळी हळू हळू जमू लागली होती. तेवढ्यात छब्बू मामांनी मला आवाज दिला!

'प्रकाश!'

मी पुढे गेलो, आणि ते मला म्हणाले, 'हे बघं यावर्षी पोथी तुला वाचायची आहे.' हा ग्रंथ संस्कृत शब्दांनी भरलेला असल्याने मी थोडासा घाबरलो. एवढ्या लोकांच्या समुहात मी पहिल्यांदा वाचन करणार होतो. वर्गात मुलांना धडा वाचून दाखवायची सवय होती. वयाने थोरांमोठ्यांसमोर अस्सं प्रकट वाचन करायची ही पहिलींच वेळ होती. आपलं ज्ञान आणि कौशल्य दाखवण्याची संधी मला गमवायची नव्हती. मी होकार भरला. वाचनाला सुरुवात झाली. अभ्यासाची आवड आणि ज्ञान पिपासू वृत्तीमुळे माझं वाचन

शाळेतील इतर मुलांन पेक्षा चांगलं होतं. मी अस्खलीत पणे पोथी वाचन करु लागलो. माझ्या वाचनानं सर्व जण मंत्रमुग्ध झाले. एवढ्या लहान वयात एवढ चांगल वाचन करणारा गावातील मी एकमेव मुलगा होतो. माझ्या पोथी वाचनाने छब्बू मामा सुद्धा भारावून गेले. पोथी वाचन पूर्ण झालं. सगळ्यांनी माझ्यावर कौतूकसुमनं उधळली. छब्बू मामाने मला जवळ बोलावलं माझं कोड कौतुक केलं आणि माझ्या हातावर नवीन कपड्याचा जोड ठेवला आणि म्हणाले,"प्रकाश आपल्या ज्ञानाच्या कार्याने सर्वांना प्रकाश दे!"

मला माझ्या ज्ञानाने, माझ्या जिद्द आणि चिकाटीने मिळालेला तो पहिला सन्मान होता. ह्या सन्मानाने माझं फाटकं तुटक स्वरुप बदललं होतं. मला खूप आनंद झाला आमच्या गरिबीत नवीन कपडे लवकर मिळणं मोठं मुश्किल होतं. पण मी माझ्या अभ्यासाच्या जोरावर स्वतःचं उघडं अंग झाकू शकतो एवढा आत्मविश्वास संपादन केला होता.

नंतर हळूहळू माझ्या पोथी वाचनाची बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली आमचं गाव देव भोळं, गरीबीने त्यांना ग्रासलेले त्यामुळे त्यांना त्यांच्या या दुःखातून तारणारा एकमेव होता तो म्हणजे देव. त्या पिता परमेश्वाराची जो तो आपापल्या परीने उपासना करत होते. गावातील आया-बाया स्त्री शक्ती स्वरुपनी देवीची पूजा अर्चा करत महालक्ष्मी व संतोषी मातेचे व्रते, १६ शुक्रवार, १६ सोमवार, अशा व्रतांनी गाव सतत गजबजलेलं असायचं. तेंव्हा गावात पोथी वाचनाची ही जबाबदारी माझ्यावर येऊन पडत असे. मीही आनंदाने त्यांच्या पोथी वाचनाच्या आमंत्रणाचा स्विकार करत होतो. त्या मागे दोन कारण असावी असं मला वाटतं. एक देवाच्या कार्याला नाही म्हणून नये आणि दुसरं म्हणजे पोथी वाचल्यानंतर मिळणारे बक्षिस.

मी गावातल्या अनेक घरांमध्ये पोथी वाचायला जाऊ लागलो. उद्यापनांना पोथी वाचन, मिळणार बक्षिस, खायला मिळणारा खाऊ याची रेलचेल होऊ लागली होती. त्यातच एके दिवशी गावात जात असताना आपल्या पडवीच्या दाराला टेकून बसलेल्या एका म्हाताऱ्या बाईने आवाज दिला. मी वळून पाहिलं आणि काय आजी म्हणून विचारलं. मला हाताने इकडे ये असा इशारा केला. मी आपला उड्या मारत मारत आजी जवळ गेलो. आजीने हातातलं पत्र मला दाखवल आणि वाचून दाखव अशी विनंती केली. मी पत्र वाचायला हातात घेतलं त्यात त्या आजींचा मुंबईला राहणारा भाऊ निधन पावल्याची बातमी होती. मी ती वाचून दाखवली सुरकतलेल्या म्हाताऱ्या

चेहऱ्यावर दुःख पसरलं, डोळ्यांच्या कडा पाणावल्या, मी पत्र वाचत होतो आजीच्या डोळयतून अश्रू ओघळत होते. मलाही आता पत्र पुढे वाचन जड जात होते. मी जड अंतःकरणाने पत्र वाचत होतो. आजी तोंडाला पदर लावून हमसून हमसून रडत होती. आजीने रडत रडत भाऊ कधी वारला याची तारिख विचारली. मी तारिख सांगितली. पत्र मिळायच्या १५ दिवसांपूर्वी त्यांचा भाऊ वारला होता. त्यांचा भाऊ वारुन आज १५ दिवस झाले होते. त्यांच्या दशक्रिया विधीचा कार्यक्रम सुद्धा होवून गेला होता. आजीला दुःख अनावर झालं. आपल्या भावाच्या दशक्रियेला सुद्धा जाता आलं नाही याचं त्यांना खूप दुःख होत होतं. मी त्या पत्राची घडी केली. रडत असलेल्या आजीच्या बाजूला ठेवली. माझाही कंठ भरुन आला. मी खालच्या मानेने उठलो आणि जड अंतकरणाने रस्त्याला लागलो. एकीकडे पोथी वाचल्यावर खायला मिळणारं गोडधोड, नवीन कपडे, आणि दुसरीकडे पत्र वाचल्यावर आजीच्या डोळ्यातून ओघळणारे अश्रू होते. यातील सर्वात महत्त्वाचं काय आहे याची तूलना मनात चालू झाली. आणि एक अनामिक भावना मनाला स्पर्श करुन गेली. आपल्याला मिळणाऱ्या ज्ञानाने जो पर्यंत आपण दुसऱ्याचे अश्रू पुसू शकत नाही, तोपर्यंत ज्ञानाला किंमत नाही. दुःखी दुरीतांच्या अंधारमय जीवनाला प्रकाशाची वाट दाखवणं ह्यातच मिळालेल्या ज्ञानाचं सार्थक आहे.

***

# जीवन बदलणारी सहप्रवासी सायकल

काळ हा एखाद्या चक्राप्रमाणे असतो. तो फिरत असतो पुढे चालत असतो, कुणासाठी थांबत नाही. थांबण ही त्याची वृत्ती नाही आणि कितीही प्रयत्न केला तर काळ कुणालाही थांबवता येणार नाही. आयुष्यात अनेक प्रसंग कोणत्यानं कोणत्या वळणावर येऊन धडकतात आणि मग त्याचे ऋणानूबंध अधिक घट्ट होत जातात. एखादा व्यक्ति किंवा वस्तुशी निगडीत ऋणानूबंध निर्माण झाले की ते तुटता तुटत नाही, मग सजीवांशी जुळलेले असो अथवा निर्जीवांशी. ते कायम तसेच टिकून राहतात. लहान मुले आवडणाऱ्या खेळणी सोबत खेळवण्यात ते अधिक मग्न होत असतात. असाच ऋणानूबंध माझाही तयार झाला तो आमच्या सायकलशी.

घरची परिस्थिती बेताचीच होती. अठराविश्व दारिद्र्याशी झगडत कुठे सुखाची सावली मिळते का, या शोधात बाई-नानांचा संसार थोडासा स्थिरावला होता. दुसऱ्याच्या मळ्यात सालानं काम करत आपला उदरर्निवाहानं बाई-नाना करत. जनावरांसाठी गवताचे भारे बाजारात विकून मिळणारा पैसा आपल्या संसारासाठी वापरत होते. एकेदिवशी लासलगावचा बाजार आटोपून बाई-नाना आणि मी घराच्या दिशेने निघालो होतो. बाईच्या डोक्यावर तिच्या मानेला न पेलवणारे गवताचे ओझे होते. ते ओझं सावरत बाई झपझप पावलं टाकत चालली होती. मी नानांच्या मागे त्यांच्या चालण्याच्या गती सोबत मी धावत होतो. आम्ही तिघं पाटाच्या पुलापर्यंत आलो. त्या पुलावर दोन गावकरी गप्पा मारत उभे होते. नानांचा आणि त्यांचा राम राम झाला. परिचयाचे असल्या कारणाने बाई आणि नाना त्यांच्याशी बोलू लागले. बाईनं डोक्यावर जड झालेला गवताचा भारा खाली ठेवला. एकमेकांची आप्तेष्टांची चौकशी झाल्यानंतर बोलण्याच्या ओघात त्या दोन इस्मांनी नानांना सायकल दाखवली आणि ही सायकल विकायची आहे कुणी गिऱ्हाईक असेल तर सांगा. नानांनी बाईनी सायकलची किंमत विचारली. ९० रु. त्या सायकलची किंमत आहे असं त्यांनी सांगितलं. बाई आणि नाना एकमेकांडे पाहू लागले. ९० रु. म्हणजे त्या वेळेस एक लाखा सारखे होते. दारिद्र्याने कंगाल खिशाला ९० रु. हा न पेलवणारा खर्च होता पण नाना सायकल घ्यायच्या जिद्दला पेटले. इसार म्हणून नानांनी त्या माणसाच्या हातावर एक रुपया ठेवला. गवताच्या भाऱ्याला हात घातला भारा उचलला आणि बाईच्या डोक्यावर दिला. आम्ही तिघे घराच्या दिशेने निघालो. बाई आणि नाना आता ९० रु. कसे जमवायचे याचा विचार करु लागले आणि

मी मात्र सायकल म्हणजे असं काय विशेष याचा विचार करु लागलो.

नानांनी आणि बाईने साचवलेली जमा पुंजी गोळा केली कमी पडले ते उसनवारीने मागून आणले आणि दुसऱ्या दिवशी नाना सायकल घेऊन घरी आले. बाईने घरी आणलेल्या त्या सेकंड हँड सायकलची पुजा स्वतःच्या हाताने केली. मला त्या सायकलचं खरं पाहता काही एक कौतूक वाटत नव्हतं. बाई आणि नाना खूप खूश होते पण माझं काय? बाईंच्या डोक्यावरचा गवताचा भारा नानाला जाणवला असावा म्हणून तर सायकल घेतली पण यात मला काय मिळणार होतं? मी आपला रिकाम्या हातीच होतो.

माझे हात रिकामे म्हणून मी काही रडत नव्हतो किंवा उदास होतो असं नाही. पण अपरुप मात्र नव्हतं. मग बोलत बोलत नानांनी मला उचलंल आणि त्या सायकलच्या दांडीवर बसवलं. माझी नजर हँडलवर गेली. हँडलवर टाकीच्या घावाने काही तरी कोरलं होतं. मी जवळ जाऊन वाचू लागलो. त्यावर लिहिलेल्या अक्षराची ओळख पटली. त्या सायकलवर माझं नाव लिहिलं होतं. माझं पूर्ण नाव "प्रकाश सुकदेव कोल्हे" हे वाचल्यानंतर मला खूप आनंद झाला ही सायकल माझी होती. ज्या वस्तूवर व्यक्तीचं नाव असतं ती वस्तू त्या व्यक्तीची असते हा साधा नियम न शिकवता सगळ्यांना माहित असतो आणि तो मलाही माहित होता. अपरुप न वाटणाऱ्या सायकलच आता मला बाई नानांपेक्षा जास्त अपरुप वाटत होतं असं वाटत होतं. ह्या सायकलवर टांग टाकावी आणि साऱ्या गावाला दाखवाव की बघा ही माझी सायकल आहे. या सायकलवर माझं नाव आहे! माझा आनंद गगनात मावेना. माझं नाव वाचल्यानंतर सायकल आणि माझ्यात एक अनामिक नातं तयार झालं होतं कारण ती माझी होती.

त्या सायकलने आम्हाला खूप साथ दिली. तिच्या क्षमतेपेक्षा जास्त गवताचा भारा तिच्यावर लादून आम्ही तिला लासलगावच्या बाजारात घेऊन जायचो. कधी पॅंडल तुटला तर त्या तुटलेल्या पँडलवर ती सायकल चालवत जायचो. कधी तिला लवकर तेल-पाणी झालं नाही तरी ती ही आमच्या सोबत आमच्या काबाडकष्टी जगण्याचा हिस्सा होवून गेली. निर्जीव असली म्हणून काय झालं पण आमच्या कष्टात तिचा पण वाटा होता... आनंदात तिच्यावर फिरायलाही गेलो आणि भर उन्हात गवताचा भारा लादून गवत विकायलाही गेलो. ती जणू आता माझी सोबती झाली

पण काळ कधी कुणासाठी थांबत नसतो. यातच मी एकदा खूप आजारी पडलो मला दवाखान्यात घेऊन जायला बाई नानांकडे पैसे नव्हते. तापाने जोर धरला. काय करावं काही सुचेना तेंव्हा इच्छा नसतानाही नानांनी ती सायकल विकली आणि मिळालेल्या पैशातून माझ्यावर वैद्यकीय उपचार झाले. मी बरा झालो पण मनाला काही बरं वाटेना. कारण ज्या सायकलवर माझं नाव होतं ती सायकल आता आमच्याकडे नव्हती. काम करताना किंवा बाजारात जातांना राहून राहून तिची आठवण यायची. असे बरेच दिवस गेले. नानांना पुन्हा सायकलची गरज वाटू लागली. कारण दूध टाकायला जाताना सायकल आवश्यक होती. नानांनी पून्हा सायकल घ्यायाचं ठरवलं. पैशाची जमवाजमव केली. सेकंड हँड सायकलच्या शोधात असताना तिच सायकल पून्हा खरेदीसाठी नानांकडे आली नानांनी कसलाही विचार न करता ती सायकल विकत घेतली. घरी आणली! ज्या वस्तूवर ज्या व्यक्तीचं नाव असतं ती वस्तू त्या व्यक्तीची असते ह्या नियमाप्रमाणे फिरुन ती सायकल पुन्हा माझ्याकडे आली. पून्हा आमच्या कष्टात सहभागी होण्यासाठी कष्टाला सीमा नव्हती आणि येणाऱ्या अडचणींचा हिशोब नव्हता. अडचणी निर्माण व्हायच्या आणि आर्थिक हिशोबात पैशाची चणचण असायची. पून्हा वस्तू विकली जायाची. अशाच कोणत्या ना कोणत्या कठीण प्रसंगी ती सायकल तीनदा विकली गेली आणि पून्हा तीनदा ती परत आमच्याकडे आली. मग घरच्यांनी सर्वानूमते एक निर्णय घेऊन टाकला आता ही सायकल पून्हा विकायची नाही. ह्या निर्जीव सायकलींचा जीव आमच्या सर्वांमध्ये होता असं म्हणायला काही एक हरकत नाही.

सजीवांची निर्जिवाशी तयार झालेलं हे नातं याला नाव नाही. कुणालाही शुल्लक वाटणारी ही घटना आमच्यासाठी आमच्या छोट्या कुटुंबासाठी खूप महत्त्वाची वाटते. तीनदा विकलेली सायकल पून्हा पून्हा आमच्याकडे येते हे तिचं चक्र सुरु होतं. सायकलपासून वाहन घ्यायला सुरुवात केली. त्यानंतर मोटर सायकल त्यानंतर चार चाकी वाहनांत अलीशान वाहनाचा वापर करताना सायकलवरील कष्टाचे दिवस स्मृतीपटलातून पुसल्या जात नाहीत. आजही मी ती सायकल जपून ठेवली आहे. प्रत्येक सणाला तिची पूजा करतो कारण तिच्या चाकाच्या गतीने मला अंधाराकडून प्रकाशाकडे नेले हे मात्र निश्चितच !

***

# असे का?

आपण जन्माला आलो म्हणजे एक प्रकारे आपण या जन समुहात प्रवेश घेतला. शाळेतला प्रवेश हे ही माझ्या आयुष्यातला एक महत्त्वाचा टप्पा होता. प्रत्येक क्षण आणि घटना आपल्याला काहीतरी शिकवत असते. अनूभव हा सर्वात मोठा गुरु असतो हे उगाच म्हणत नाही. आईने जर माझे नाव प्राथमिक शाळेत घातले नसते मला शाळेत दाखल केले नसते तर आज मी हा असा घडलो नसतो. प्राथमिक शिक्षणाचे धडे गिरवता गिरवता मी जगण्याचे असंख्य धडे गिरवले. पक्षांना कुणी घरटं बांधायला शिकवत नाही तरी सुद्धा सुगरणीचा खोपा आपलं लक्ष्य वेधून घेतो. तस काहीसं प्रत्येकाच असतं. शिक्षण हे बूद्धिला चालना देण्यासाठी असतं शेवटी सर्वांना स्वतःच्या कल्पकतेनेच आयुष्य जगावं लागतं. प्राथमिक शिक्षण आता पूर्ण झालं होतं. शाळेत पहिली ते चौथी पर्यंत पहिला नंबर कधीच सोडला नव्हता. चौथी इयत्ता चांगल्या गुणांनी पास झालो होतो. आता हायस्कूलला प्रवेश घ्यायची वेळ आली.

नानांनी प्राथमिक शाळेचा दाखला घेतला आणि मला घेऊन खेड्यातील शाळेतून गावातील हायस्कूलच्या शाळेत घेऊन गेले. गावाची ही शाळा मी पहिल्यांदा पाहत होतो. त्या मोठ्या वर्ग खोल्या, वातावरण ह्या सगळ्या गोष्टी डोळ्यांनी टिपतं होतो. नानांनी तिथल्या कार्यालयात जाऊन माझ्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात केली. नानांना लिहिता वाचता येत नव्हतं. जे समजत नव्हत ते मी सांगत होतो. लिहून देत होतो. अशा प्रकारे नानांनी माझा हायस्कूल प्रवेश घेतला. त्यानंतर नाना-बाईला माझ्या कोणत्याच कार्यालयातील कामकाजाला किंवा पुढील शिक्षणाच्या प्रवेशाला मी सोबत नेलं नाही, कारण नानांनी नकळत दाखवलेल्या प्रवेश प्रक्रियेने मी अनूभव घेतला होता. प्रवेश कसा घेतला जातो याचे ज्ञान आता आत्मसात केले होते.

इयत्ता ५ वी त प्रवेश घेतला शाळा सुरु झाली. सुरुवातीला गावाकडील मुलं खेड्यातील मुलगा म्हणून माझ्याकडे तुच्छतेने बघत असायची. पहिली घटक चाचणी झाली. त्या चाचणीत इंग्रजी आणि गणित मिळून ३ विषयात पैकीच्या पैकी गुण मिळाले होते. मी चांगल्या गुणांनी ती परीक्षा उत्तीर्ण झालो होतो. मला चांगले गुण कसे काय मिळाले याचे कोडे गावाकडील मुलांना सुटेना. म्हणून त्यांनी शाळेच्या मधल्या सुट्टीत गावाकडील मुलांनी घेराव घातला आणि आरेरावीच्या सुरात मला विचारलं, “का रे तुला एवढे चांगले मार्क कसे काय मिळाले?”

मी म्हटलं,"अभ्यास करुन!"

"नाही तु कॉपी केली! असा तो मला ठासून विचारत होता पण कॉपी म्हणजे काय हे समजेना. माझ्या आकलना पलीकडे होतं ते सारं. कॉपी काय असते हेच मला माहित नव्हतं. मी त्यालान राहून विचारले. कॉपी म्हणजे काय? तो हसला आणि म्हणाला पाहून पाहून तु उत्तरं लिहिली. मला कळेना काय चाललंय माझा कंठ दाटून आला. तो पुढे बोलू लागला एका छोट्या खेड्यातील आडाणी बापाचा हा मुलगा एवढा कसा काय गुण मिळवेल? मला रडू आवरेना मी अत्यंत प्रामाणिकपणे कष्टाने अभ्यास करुन पेपर लिहिले होते. त्यात कॉपी हा मला माहित नसलेला प्रकार मी कधीच केला नाही. त्याचा आरोप माझ्यावर होत होता. मी रडू लागलो तेवढ्यात शाळेत पुढच्या तासासाठी शिक्षक वर्गात आले माझं रडण्याचं कारण विचारलं. मी सांगितलं ही मुलं मला खेड्यातून आलेला तुला पैकीच्या पैकी गुण मिळतील कसे तु कॉपीच केली असे म्हणत आहेत. त्यावर त्या सरांनी त्या मुलांना समज दिली आणि पून्हा अस करणार नाही याची ताकिद ही दिली."

खरच खेड्यातील मुलं हुशार नसतात का? त्यांना स्वतःची बुद्धि नसते का...? का म्हणून गावाच्या मुलांनकडे अस्त्स तुच्छतेने पाहिलं जातं. असे का? ही परिस्थिती तेंव्हाही होती आणि अजूनही आहे. हा कुपमंडीत दृष्टीकोन बदलायला हवा. ज्ञान ग्रहणाला जागा, परिस्थिती या सर्व गोष्टी गौण असतात. या सर्व गोष्टीवर मात करत जो प्रगती पथावर जातो तोच ह्या प्रकाश वाटेचा प्रवासी होतो. आणि एकदा का लख्खं प्रकाशात आलो कि खरं खोटं लगेचच सिद्ध होतं.

***

# शाळेच्या प्रांगणात

माझं सुख, माझं सुख

हंड्या झुंबर टांगल,

माझं दुःख माझं दुःख

तळघरात कोंडल

असं म्हणणाऱ्या कवयत्री बहीणाबाई ह्यांच्या कवितेच्या ओळी मानवी जगण्याला समर्पक वाटतात. माणूस आपलं क्षणीक सुख लोकांना दिसावं यासाठी त्याच त्या सुखाचा उदो उदो करत असतो. पण त्याचं दुःख मात्र मनाच्या कप्प्यात कायम दडलेलं असतं. आज मी कितीही मोठा झालो, सुखात असलो, तरी अपमानाची सल माझ्या मनाच्या कप्प्यात तशीच आहे. इयत्ता सातवीला असताना मला 'अ' तुकडी मध्ये बसायच होतं. 'अ' तुकडी म्हणजे हुशार मुलांची तुकडी. 'अ' तुकडीतील मुला मुलींना शिक्षक वेगळ्या पद्धतीने शिकवतात, त्यांच्याकडे बारकाईने लक्ष देतात. 'अ' तुकडी हुशारांची 'ब' तुकडी थोड्या कमी हुशार मुलांची व 'ढ' तुकडी ढ मुलांची असा माझा समज होता. आपण हुशार आहोत अभ्यास व्यवस्थित करतो, आपल्या बाबतीत शिक्षकांची कोणतीच तक्रार नाही, आपल्याला 'अ' तुकडीत अगदी सहज प्रवेश मिळेल पण तसे झाले नाही. मला 'अ' तुकडीत प्रवेश दिला नाही. नाही माझं नाव 'ब' तुकडीत टाकलं गेलं. मी आमच्या गावातील गुरूजींकडे गेलो आणि म्हणालो, "मला 'अ' तुकडीत बसायचं आहे."

"का?"

तो वर्ग चांगला आहे. अस्सं उत्तर देताच मास्तर म्हणाले नाही तीथे जागा नाही तुला 'अ' तुकडीत बसता येणार नाही. मी थोड्या हट्टी स्वरात बोललो, मला 'अ' तुकडीतच बसायचं बस्सं त्यावर मास्तर रागात बोलले,"का? त्या वर्गात मुली आहेत म्हणून." संशय सुर लावत हा प्रश्न विचारला होता. यावर काय उत्तर द्यावे ते मला समजेना. मी गप्प झालो काही न बोलता माझ्या 'ब' तुकडीत जाऊन बसलो. 'ब' तुकडीत त्याच मास्तरांच्या मुलाचं नाव होतं. काही दिवस तो मुलगा माझ्या सोबत 'ब' तुकडीत बसला. नंतर, अचानक त्याचं नाव 'अ' तुकडीत गेलं. मास्तरांनी स्वतःच्या शिफारशीतून आपल्या मुलाला 'अ' तुकडीत बसवलं होतं. त्या घटनेने माझ्या मनाला खूप यातना झाल्या. मास्तरांना सर्व मुलं सारखीच असतात. वर्गातील प्रत्येक

विद्यार्थ्यांचं न कळत शिक्षकांनी पालकत्व स्विकारलेलं असतं. मुलांनमध्ये कोणताच भेदभाव केला जात नाही. पण माझ्या बाबतीत मात्र भेदभाव झाला होता. मला मास्तरांनी जो प्रश्न विचारला तोच प्रश्न स्वतःच्या मुलाला का नाही विचारला. 'अ' तुकडीत जर मला बसायला जागा नव्हती तर मग त्यांच्या मुलाला कशी काय जागा मिळाली. अशा असंख्य प्रश्नांनी मनात शिरकाव केला आणि माझ्या मनावर या अपमानांची जखम केली.

असे छोटे, मोठे अनेक प्रसंग जे मला हिनवू शकतील, माझ्यावर हसू शकतील, अपमानीत करु शकतील, माझ्या सोबत घडत गेले.

मी लासलगांव इंग्रजी विद्यालयात शिकत होतो. इयत्ता सहावीत असतांना आमचा गणवेश बदलला होता. म्हणजे खाकी पॅन्ट, वरुन आम्ही हिरव्या रंगाच्या पॅन्टीवर आलो होतो. बाई-नानांच्या मागे लागून मी हिरवी पॅन्ट मिळवली होती. घरची परिस्थिती तशी बेताचीच, आम्हा सर्वांना काम करावं लागत होतं. कुणाच अंगावर निटसा कपडा नव्हता. अंगावर जे कपडे असतील त्या कपड्यांवर मळ्यात काम करावं लागतं. माझ्या अंगावर काम करताना शाळेचाच गणवेश असायचा. रोज शाळा सुटली की मळ्यात बाई नानांच्या मदतीला जायचं काम आवरलं की घरी जायचं अंगावरचा गणवेश काढायचा, धुवायचा आणि पून्हा सकाळी तोच गणवेश घालून शाळेत जायचं. हा माझा नित्याचा दिनक्रम होता. रोजच्या कष्टाने खराब झालेले कपडे रात्री रगडून रगडून धुवायचे. चांगले पिळून वाळत घालायचे. या रोजच्या रगडून धुलाईन शाळेची हिरव्या रंगाची पॅन्ट बसायच्या ठिकाणी इरायला लागली होती. एके दिवशी मळ्यात काम करत असताना पॅन्टीने दगा दिला. नको तिथे पॅन्ट फाटली. काय करावं याचा विचार करत बसलो. अचानक शाळेचा जूना गणवेश आठवला. फाटलेल्या कपड्यातून दिसणारं उघड अंग झाकत घराच्या दिशेने धाव घेतली. घरी पोहचल्यावर शाळेचा जूना गणवेश शोधून काढला. त्यातली खाकी पॅन्ट घेतली. विळ्याने तिचा एक भाग फाडला व सुई दोऱ्यानी त्या खाकी पॅन्टच ठिगळ शाळेच्या नवीन हिरव्या रंगाच्या पॅन्टीला ठिगळ लावलं. माझी पॅन्ट तयार झाली.

दुसऱ्या दिवशी ही ठिगळ लावलेली पॅन्ट घालून शाळेत गेलो. परिपाठाला उभे राहिल्या नंतर माझ्या मागे उभे राहिलेले मुलं माझ्या पॅन्टकडे बघून हसत होते. शाळेतील परिपाठ झाल्यानंतर मुलांचा गणवेश चेक करायचा असा आमच्या P.T. च्या सरांकडे दररोज विद्यार्थ्यांचा गणवेश तपासायची जबाबदारी होती. मी उभा असलेल्या माझ्या रांगेतील एका मुलाने सांगितले

सर ह्याचा गणवेश अपूर्ण आहे असे वेगळ्या शैलीत  सरांनी माझ्याकडे बघितलं आणि त्याला म्हणाले कुठे अपूर्ण? सगळं तर व्यवस्थित आहे. तेंव्हा त्या मुलाने माझ्या पॅन्टचं ठिगळ बघून इतर मुलांनी सुद्धा हशा पिकवला. मी खजिल झालो. खाली मान घालून उभा होतो. माझी अवस्था पाहून सरांना माझ्या परिस्थितीची जाणीव झाली. हसणाऱ्या मुलांना दरडावत सरांनी समज दिली आणि मला वर्गात जायला लावलं. तेंव्हा मला कळालं की, लोक आपल्या परिस्थितीच त्यांच्या करमणूकीसाठी भांडवल करत असता. पण या सगळ्या परिस्थितीवर मात करत आपल्या स्वतःच अस्तित्वासाठी मी अंधाराकडून प्रकाशाकडे प्रवास करत राहिलो. माझ्याकडे नाही, माझ्याकडून होणार नाही, या विचारात मी कधीच अडकून बसत नाही. जे नाही ते स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर मिळवत गेलो आणि मिळवत राहिलो. प्रयत्न आणि कष्टाने मी अंधारात स्वतःचा प्रकाश निर्माण करत राहिलो.

***

# संस्थापक ते संस्थापक एक प्रवास

गंधालीतला सुगंध कधीच दडून राहत नाही. तो दरवळतो आणि सर्वांना मंत्रमुग्ध करतो. लहानपणी परिस म्हणजे काय जेंव्हा मला समजलं तेंव्हा परिस खरचं असतो का हा प्रश्न मला नेहमी पडायचा. बालपणी कल्पनांचे मनोरे वर वर चढत जातात. माझ्याही कल्पनांचे मनोरे वर चढत होते. पण ते बालपण स्वतःच्या विश्वात रमणारं असत. माझं बालपण स्वतःच्या विश्वात रमणार तर होतचं पण कष्टाच सुद्धा होतं. आई वडील दुसऱ्याच्या शेतात सालानं काम करत आपलं आयुष्य जगत होते. मी ही घरातला मोठा मुलगा म्हणून त्यांना मदत करत होतो आणि घरातील मंडळी मला घरातलं मोठा मुलगा म्हणून मानही देत होते. बाई नाना सालनं काम करत असताना इतर मिळेल ती कामे ही करत होते. त्यामुळे बाई नानांना कामातून कधी सुट्टी मिळत नव्हती. गावात एखादं कार्य असेल तर आमच्या कुटुंबातील मी मोठ्या सारखं त्या ठिकाणी हजेरी लावत असे. एकदा गावात असचं एकाचं लग्न होते. हे लग्न गावातील प्रतिष्ठित अशा व्यक्तीच्या घरातील असल्याने गावात लग्नाचा चांगलाच गाजावाजा होता. त्यावेळेस लग्नातील प्रत प्रतिष्ठा ही लग्नात वापरल्या जाणाऱ्या संसाधनावर अधिष्ठीत असे. म्हणजे वऱ्हाड मंडळी लग्नाला कशातून जातात यावर आधारित असे. म्हणजे बैल गाडीतून अन् बस मधून जाणार वऱ्हाड या तूलनेवर लग्न घराची प्रतिष्ठा ठरवली जात असे. गावातील ते लग्न प्रतिष्ठित कुटुंबाचं होतं. घरातील एक सदस्य म्हणून मी त्या लग्नाला हजेरी लावणार होतो. लग्नाला जाण्यासाठी मी तयार झालो. वऱ्हाडी मंडळी लग्नाला जाण्यासाठी वाहनामध्ये बसू लागली. मी वऱ्हाडी मंडळीला लग्नाच्या ठिकाणी घेऊन जाण्यासाठी गाड्या हजर होत्या. ट्रक, ट्रॅक्टर, बस ही वाहनं वाहतूकीसाठी सज्ज होती. जातांना मी वऱ्हाडाच्या ट्रकमध्ये बसलो. समारंभाचा आत गेलो आणि मनोमन ठरवलं घरी जाताना आपण बसचा आनंद घ्यावा. म्हणून लग्न लागल्या बरोबर सर्व अटपून मी पहिल्या नंबर ने बस मध्ये जागा धरली. कंडक्टरच्या बाजूला असलेल्या सीटवर जाऊन बसलो आणि खिडकीतून लोकांच्या हालचाली बघत होतो. तेवढ्यात काही वऱ्हाडी मंडळींच्या सोबत सलग तीन वेळेस संघात निवडून आलेले जनसेवक व मा. आमदार तसेच आमच्या शाळेचे संस्थापक दत्ताजी पाटील (दादा) येताना दिसले. ते बसच्या दिशेने येत होते. त्यांनी बस मध्ये प्रवेश केला मी त्यांना बसायला जागा देण्यासाठी मी सीट वरुन उठून मागे जाऊन लागलो.

तेवढ्यात दत्ताजी पाटील म्हणजे दादानी मला बोलवलं आणि मला त्यांच्या बाजूला बसवलं हळू हळू वऱ्हाडी मंडळी गाडीत बसू लागली. बसगाडी भरली आणि घराच्या दिशेने निघाली. दादांसारखी मोठी व्यक्ती आपल्या बाजूला बसलेली आहे म्हणून मी थोडा अंग चोरुन बसलो होतो. गाडी आपल्या गतीने घराच्या रस्त्यावर धावत होती. दादांनी माझ्याकडे पाहिलं, आपला उजवा हात माझ्या मांडीवर ठेवला आणि मग माझ्याशी बोलायला सुरुवात केली. माझी विचार पूस करु लागले. हा संवाद साधतांना त्यांचा स्पर्श मला होत होता. मी त्यांच्या प्रश्नांची विनम्रतेने उत्तरं देत होतो. पण त्यांच्या संवादांनी आणि स्पर्शाने मला एक ऊर्जा मिळाली आणि थोरा मोठ्याच्या आधाराचा स्पर्श जाणवला. त्यांच्या सानिध्यातला हा प्रवास कधी संपूच नये असे वाटत होतं.

हा प्रवास नक्की घराच्या दिशेने होता की, माझ्या अंधाऱ्या आयुष्यातून प्रकाशाच्या दिशेने होता. हे मला आज नक्कीच कळलं. आजही त्यांच्याकडे मी आदर्शवत म्हणून बघतोय व दादा ते दादा तसेच संस्थापक ते संस्थापक हा प्रवास एका वाटेवरचा मला जाणतोय. त्यांचा स्पर्श व त्यांच्या हात आजही एक आशिर्वाद व कार्य कर्तृत्वाची माझी शक्ती निर्माण करणाराच वाटतोय. का परिस स्पर्श अंधाराकडून प्रकाशाकडे घेऊन गेला हे मला आज स्पष्टच जाणवतंय.

***

# परिस्थितीवर मात करताना

"ऊस डोंगापरी रस नव्हे डोंगा, काय भुललासी वरल्या सोंगा" ह्या तुकारामांच्या अभंगातील ओळी प्रमाणे माणूस वर वरच्या गोष्टीवर भाळत असतो. पण माणसाच्या आतल्या गुणांचा कधीही विचार करत नाही. त्याच्यात असलेल्या चांगल्या गुणांपेक्षा त्यांने किती उंच वस्त्र परिधान केले, तो कुठे राहतो, त्याच्याकडे काय काय सुख वस्तू आहेत. यावरुन त्याची पारख करत असतो. या क्षणिक वरकरणी गोष्टींने जनमाणसात मला सतत लाजवले पण त्यावर मात करत, मार्ग काढत मी माझ्या जगण्याचा प्रवास चालू ठेवला. त्यावर विचार करण्यात माझी शक्ती कधीच वाया घालवली नाही. या नकारात्मक विचारांचा सकारात्मक पद्धतीने विचार केला. मला अजूनही इयत्ता नववीच्या वर्गातील प्रसंग आठवतो.

इयत्ता नववीला असतांना आम्हाला एन.सी.सी. हा विषय होता. एन.सी. सी. साठी लागणारा गणवेश आम्हांला शाळेतून मिळायचा आणि वर्ष संपलं की ते गणवेश आम्हाला परत करावे लागतं. मी एन.सी.सी. ला असल्यामुळे दर शनिवारी किंवा राष्ट्रीय उत्सवाला आमची एन.सी.सी. ची परेड ही ठरलेली असायची. १५ ऑगस्ट, २६ जानेवारीला आम्ही. एन.सी.सी. ची पोरं एका गणवेशात, एका रांगेत, शिस्तीत परेड करताना बघण्यासाठी गावची सर्व मंडळी समारंभाला उपस्थित असायचे. आमची परेड वाद्यांच्या ताला सुरात सुरु झाली की शाळेची विद्यार्थी टाळ्या वाजवून आम्हाला प्रोत्साहित करत. एकदा असाच शाळेत काहीतरी कार्यक्रम होता. आम्हाला सगळ्यांना आदल्या दिवशी कॅप्टनने कार्यक्रमाची कल्पना दिली आणि एन.सी.सी परेड होणार हे ही सांगितलं त्यासाठी उद्या येताना सर्वांनी व्यवस्थित उपस्थित रहावं असही सांगितलं. ही सूचना मिळताच मी घरी गेल्यावर एन.सी. सी चा गणवेश भिजत घातला. संध्याकाळी धुवून वाळत घालून सकाळी इस्त्री करुन मस्तपैकी शाळेत परेडला जावं ही मनीषा मनात धरत मी मळ्यात कामात गुंग झालो. संध्याकाळी उशीरा पर्यंत मळ्यातील काम आटोपलं. घरी गेलो, शाळेचा अभ्यास केला, जेवण आटोपल्यावर एन.सी. सी चा गणवेश धुवून वाळत घातला. थंडीचे दिवस होते. अंथरुणातल्या उबेने झोप लवकर लागली आणि उद्याच्या दिवसाची स्वप्न घराच्या बाहेर दोरी वर वाळत घातली.

सकाळी उठलो आणि शाळेच्या कार्यक्रमाला जाण्यासाठी तयारी करु

लागलो. आंघोळ वगैरे आटपून गणवेश घेण्यासाठी बाहेर गेलो तर गणवेश ओलाच होता. काय कराव काही सूचेना. कार्यक्रम आता एक तासात सुरु होणार, वेळेत गेलं पाहिजे. पोटात भितीचा गोळा उठला, काय करावं सुचेना. घाई घाईत भावाला आवाज दिला तो धावत आला काय काय करायच ते सुचेना. तेवढ्यात कुणीतरी कल्पना सांगितली, शेकोटीच्या शेकावर कपडे वाळवा. भावाने फटाफट शेकोटी पेटवली. आम्ही दोघांनी शेकावर कपडे धरुन उभे राहिलो. अचानक शेकोटीने भडका घेतला आणि माझी एन.सी.सी. ची पॅन्ट पुढच्या बाजूला जळाली. दुष्काळात तेरावा महिना आला पून्हा घाई घाई सुई दोरा रोवला. पॅन्टला ठिगळ लावलं. पण ते ठिगळ अगदी स्पष्टपणे दिसत होतं. त्याला काहीच इलाज नव्हता. कपडे काही शेकोटीच्या शेकावर सुकले नाही. मग पितळी तांब्या घेतला. त्यात शेकोटीचा अहार घातला. त्या धगधगत्या अहाराने तो तांब्या गरम झाला. हाताला चटके बसले. त्या गरम झालेल्या भांड्याचे चटके घेत घेत मी एन.सी.सी.च्या गणवेशाला इस्त्री करत होतो. कशीतरी इस्त्री करुन ते कपडे सुकवले. कपड्यांना इस्त्री केली आणि एन.सी.सी.चा गणवेश घालून शाळेत कार्यक्रमाला गेलो. मला उशीर झालेला पाहून कॅप्टनने माझ्यावर डोळे वटारले आणि पायाच्या नखा पासून ते डोक्याच्या केसापर्यंत मला निहाळू लागला. त्याच्या नजरेतून पॅन्टीला लावलेला ठिगळ काही सुटलं नाही.

तानलेले डोळे अधिक तानत मला माझी जागा बदलायला लावली. मी जागा बदलली व पॅन्टीवरच ठिगळ कुणाला दिसू नये अशा सावधगिरीने मी त्या कार्यक्रमाची परेड पूर्ण केली. त्यावेळी एन.सी.सी.च्या परेडचा आम्हा मुलांना भत्ता मिळत असे. त्यावर्षी मला एन.सी.सी.परेडचा ९० रु. भत्ता मिळाला. त्यात मी सर्वप्रथम जर काही घेतलं असेल तर इस्त्री घेतली. कारणाने अनेक विविध परिस्थितीला तोंड देत स्वतःला सिद्ध करत राहिलो. अनेक चांगल्या वाईट अनूभवाने स्वतःला तयार करत राहिलो. आयुष्य जगण्याचं हे शिव धनुष्य मी कधीही खाली ठेवलं नाही. ते लिलया पेलवत स्वतःत आत्मभान निर्माण करत राहिलो. स्वतःचा मार्ग धुंडाळत राहिलो.

या अंधाराकडून प्रकाशाकडे चालणाऱ्या प्रवासात मला अनेक जणांनी साथ दिली. त्यात किसन सानप गुरूजी हे ही महत्त्वाचे आहे. अनेक परिश्रमाने गवताचे भारे वाहत आमचं आयुष्य जगणारे आम्ही कष्टकरी माणसं आमच्या आयुष्यात कष्टाला कोणताच तुटवडा नव्हता. 'कष्ट करा

आणि पोटभरा,' ह्या पद्धतीने आम्ही जगत होतो. आमचे हे कष्टाचे आयुष्य बाई नानां संसारला कुणाची साथ नाही. एकटेच हा सगळा भार वाहत होते. आमची बाई, मनमिळाऊ स्वभावाची, तिच्या अशा स्वभावामुळे तीने अनेक माणसं आपलीशी केली केली होती. त्यातील सानप गुरूजी बाई नानांचे कष्ट सानप गुरूजींनी खूप जवळून पाहिले होते. ह्या सानप गुरूजींनीं बाईला आपली बहीण मानले होते. सानप गुरूजी बाई नानाच्या संसाराला अधुन मधून थोडा बहुत हातभार लावत असे. माझी कामकरुन अभ्यास करण्याची चिकाटी पाहून ते मला बोलले प्रकाश दहावी पास झाला की मी तुला घड्याळ घेईल आणि त्यांनी त्यांचा शब्द खराही केला. मी दहावीच्या बोर्डाच्या परिक्षेत चांगल्या गुणांनी पास झालो तेंव्हा त्यांनी एच.एम.टी. कंपनीचं पहिलं मनगटी घड्याळ मला बक्षिस म्हणून दिलं. ते घेतांना मला मनाला खूप समाधान वाटलं. आपल्या ह्या मेहनतीचं कुणाला तरी महत्त्व कळत होतं आणि माझ्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी कुणीतरी होतं. त्यांनी मला शिक्षणासाठी खूप प्रोत्साहन दिलं आणि हातावर माझं पहिलं वहिलं घड्याळ दिलं. घड्याळ म्हटलं म्हणजे एक प्रसंग माझ्या कायम स्मरणात राहिला तो म्हणजे जनता एक्सप्रेसने म्हणजेच रेल्वेने बाईला व मला नाशिकला लग्नाला जायचं होतं. मग लग्नाला जातांना आपण रेल्वेने जाऊ असा निर्णय झाला. दुसऱ्या दिवशी पहाटेची पाचची गाडी पकडायची होती. म्हणून आदल्या दिवशी संध्याकाळी आम्ही सर्वजण लवकर लवकर जेवण वगैरे आटपून झोपलो. मी खूप खूश होतो. कारण आमच्या आयुष्यातला रेल्वे प्रवासाचा हा पहिलाच प्रसंग होता. रेल्वेचा प्रवास कसा असेल याची स्वप्न रंगवता रंगवता झोपायच राहूनच गेलं आणि अचानक बाई नाना उठून घरात आवरायला लागले. आम्ही भावंड बाई नानांच्या गडबडीने खाडकन जागे झालो. आणि आम्ही त्यांना मदत करु लागलो. मी नाशिकला जाण्यासाठी तयार झालो. नानांनी घराचं दार उघडलं बाहेर सर्वत्र अंधार होता. हातात पिशव्या घेऊन आम्ही निघालो. चंद्राच्या प्रकाशात अनूभवी वाटेने आम्ही स्टेशनच्या रस्त्याला लागलो. रात किड्यांची किरकिर चालू होती. गारवारा अंगाला झोंबत होता. त्यात आम्ही सायकल असूनही तिघे असल्यामुळे पायीच स्टेशन गाठलं आणि तिथे गेल्यावर स्टेशनच्या घड्याळ्यावर नजर गेली तेंव्हा घडाळ्यात अवघे १२.४० वाजले होते. हा गोंधळ केवळ आमच्या घरात घड्याळ नव्हतं म्हणून झाला. नाशिकला जाणारी जनता एक्सप्रेस सकाळी पाचला. होती. आम्ही १२.४० ते ५ वाजेपर्यंत स्टेशनवर थांबून होतो.

व मी या प्रसंगातून अंधाराकडून प्रकाशाकडे येणारा सूर्य माझ्या उघड्या डोळ्यांनी पाहत होतो व रेल्वेच्या प्रवासाचा आनंद घेत होतो.

***

# घड्याळाची काटे पुढे सरकली

सोनं जेवढं तापवलं तेवढं ते उजळून निघतं तसं माणूस कष्टाने आणि अनुभवाने जेवढा तापून निघतो तेवढं त्याच नशीब उजळून निघतं. गुडलक, नशीब वेगैरे हे सगळे मनाला दिलासा देणारे शब्द. एखादी गोष्ट झाली नाही किंवा ती साध्य झाली नाही की माणूस नशीबाला दोष देतो. किंबहूना त्या गोष्टीची अयशस्वीरित्या जबाबदारी नशीबाच्या माथी मारुन मोकळा होतो. पण नशिब ही फक्त सांगण्याची गोष्ट झाली. नशिबापेक्षा प्रयत्न आणि चिकाटी हे मोठे असतात. प्रयत्नाला वयाची ताकदीची मर्यादा कधीच नसते. जिद्द जर असेल तर लहान वयात गोवर्धना सारखा महामेरू सुद्धा तुम्ही करंगळीवर उचलू शकता. असेच जिद्द काम आम्ही केल्याच मला चांगल आठवतं.

मी काम करुन स्वतःचं घर चालवणे, स्वतःच्या गरजा पूर्ण करणे असे आमचे जगणे एखादी गोष्ट हवी असेल तर सहज कधीच मिळाली नाही. त्यासाठी श्रम करावे लागत. त्या श्रमाला कोणतीच मर्यादा नव्हती. मी पाचवीच्या वर्गापासून बाजारात बाई सोबत भाजी विकायला जात असे. आमच्या लासलगावाचा आठवडे बाजार हा दर रविवारी भरत असे. तेव्हा अनेक लोक बाजारात खरेदीसाठी येत. कुणाला भांडी घ्यायची असेल, कुणाला कपडे तर कुणाला भाजी अशा अनेक कारणाने लोक बाजारात येत. बाई मळ्यात पिकवलेला भाजीपाला घेऊन बाजारात विकायची. मग मीही तीच्या सोबत बाजारात जायचो. मी तीचं व्यवहार ज्ञान समजून घ्यायचो. ६ वीच्या वर्गात असताना नानांनी बैलगाडीसाठी भरुन मुळे विकायला आणले होते. मुळे उतरवून नाना बैलगाडी परत मळ्यात घेऊन गेले. एवढे मुळे विकायचे कसे हा मोठा प्रश्न होता. पण त्याही पेक्षा हे जर उरले तर परत घेवून जायचं कसं? हा ही प्रश्नच होता. आईकडे व्यवहार ज्ञान, संभाषण कौशल्य, हे गुण असल्याने तीने अवघ्या सकाळ पासून ते संध्याकाळ पर्यंत सगळे मुळे विकले तीच्या या कामगिरीबद्दल तीथे असलेल्या इतर भाजी विक्रेत्यांनी तीला चहा पाजला होता.

मी आठवीत असताना तात्यांच्या द्राक्षबागेतील द्राक्ष खुडून झाले होते. द्राक्षांच्या वेलींना आता फक्त नको असलेले द्राक्ष शिल्लक होते. त्या द्राक्षांचा काही एक उपयोग नव्हता. मी तात्यांना म्हणालो, ''तात्या मी हे द्राक्ष घेऊ का'' आरे बाबा ते काही खान्याजोगा नाही, त्याचा काही एक उपयोग

नाही. तात्यांनी मला  सांगितलं. तरी सुद्धा मी विकायला घेवून गेलो. एकूण ६ क्विंटल जवळपास सडलेली द्राक्ष मी बाजारात घेवून गेलो. आई सोबत दोन वर्षांपासून बाजारात जाऊन तीने वापरलेलं व्यवहार कौशल्य मी पाहिलं होतं. आता मला त्याचा वापर करायची वेळ आली होती. बाजारात द्राक्ष विकण्यासाठी मी बसलो. मला कुणालाही  फसवायचं नव्हतं, खोट बोलयचं नव्हतं. मी ग्राहकांच्या शोध घेत होतो. अखेर माझा सच्चापणे माझ्या कामाला यश मिळाले. ६ क्विंटल द्राक्षाला गिऱ्हाईक मिळत गेले. मी लहान असूनही हात विक्रीने अशी द्राक्ष विकून एक विक्रम केला. माझ्या आईने शिकवलेले व्यवहार ज्ञान आज माझ्या कामी आले होते. त्यातून मिळालेले सर्व पैसे मी तात्यांना म्हणजेच आमच्या मालकांना दिले. तात्यांनी खूशहोऊन त्यावेळेस ५ रु. चा भेळ भत्ता मला आंतरीन घेऊन दिला. तो खातांना मला माझ्या आईच्या व्यवहाराज्ञानाचा अभिमान वाटत होता.

९ वी च्या वर्गात असताना असेच एकदा तात्यांशी म्हणजे आम्ही ज्यांच्या शेतात सालानं काम करत होतो त्यांना आम्ही तात्या म्हणायचो. त्यांच्याशी गप्पा मारतामारता द्राक्षाचा खरड छाटणीचा विषय निघाला. तात्या म्हणाले, ''द्राक्षबागेची खरड छाटणी करायची आहे. बाबानों ती काय सोपी गोष्ट नाही. आणि बागसुद्धा अडीच एकरचा आहे. हे काही साधं काम नाही.'' मी आत्मविश्वासाने त्यांना पटवून दिलं की, आम्ही तिघेजन मिळून हे काम करु. ते नाही नाही म्हणत होते. पण हे काम हातातून जाऊ नये आणि आपल्याला मिळणारा पैसा सुद्धा मिळणार नाही. यासाठी मी प्रयत्न करत होतो. अखेर त्यांनी होकार भरला आणि आम्ही तिघे भावंड कामाला लागलो. खरड छाटणी हे काही सोपे काम नव्हे. द्राक्षाच्या वेलीची खोडाची छाटणी ही छाटणी कात्रीने करावी लागते त्यासाठी ताकद लावावी लागते. आम्ही हिंमतीने आणि जिद्दीने छाटणीला सुरुवात केली होती. सुरुवातीला उत्साहाने छाटणी करु लागलो. दिवस उगवण्याच्या आत कामाला सुरुवात केली. सकाळी कामाला जोम होता. जसजसा माथ्यावरचा सूर्य वर चढत होता तसतसा उत्साह कमी झाला. समोर अडीच एकराची बाग होती, हातात कैची होती पण काम करुन करुन शरीराची ताकद संपत आली होती. होती ती फक्त जिद्द आणि आत्मविश्वासाची साथ. छाटणी करता करता हाताला फोड आले, कैची हातात धरता येईना. हाताला कपडा गुंडाळला आणि छाटणी करु लागलो. काही केल्या काम थांबवायचे नाही असा निश्चय केला. हाती 'घ्याल ते तडीस न्या' ह्या शिकवणी प्रमाणे मी हाती घेतलेले काम पूर्ण

करण्याचा प्रयत्न करु लागलो. बघता बघता सूर्य माथ्यावरुन ढळला. काम किती झालं हे बघण्यासाठी मागे वळून बघितलं बरच काम झालं होतं. पुढे राहीलेलं काम होतं, थोडं होतं ते आजच्या आजच पूर्ण करायचं असं मनाशी ठरवलं आणि पून्हा कामाला सुरुवात केली. बघता बघता काम पूर्ण झालं. हातातली कैची बाजूला ठेवली. गुंडाळलेला कपडा काढला. हाताचे फोडफुटून त्यातून रक्त येत होतं. वेदना होत होत्या पण काम पूर्ण केल्याचं समाधान होतं. संध्याकाळी तात्यांनी आमच्या कामावर खूश होऊन लासलगावचा भेळ भत्ता खायला आणला होता. त्यांना सुद्धा आम्ही केलेल्या कामाचे कौतुक होते आणि आम्ही भावंडांनी हे काम पूर्ण केलं याच आश्‍चर्य वाटत होतं. त्यांनी आणलेला भेळभत्ता आम्ही भावंडांनी खाल्ला. आमच्या कष्टाचा मोबदला म्हणून तात्यांनी आम्हाला १०० रूपये देऊ केले. त्या पैशातून सर्वप्रथम मी घरासाठी भिंतीवरचं घड्याळ घेतलं. कारण घड्याळ नसल्यामुळे आम्हाला वेळ काळ कळत नव्हता. वेळेचं नियोजन करता येत नव्हतं. ते घड्याळ जेंव्हा घराच्या भिंतीला लागलं तेंव्हा एक आत्मीक समाधान वाटलं. आपण केलेल्या कष्टाचं चिज झालं. हे सर्व शक्य झालं ते बाई-नानांनी दिलेल्या शिकवणीमुळे, त्यांनी आमच्यात रुजवलेल्या आत्मविश्‍वासामुळे आणि ‘हाती घ्याल ते तडीस न्या’ ह्या विचारामुळे व त्याच्या कष्टाळू वृत्तीमुळेच घड्याळाची काटे पूढे सरकू लागली ती काटे वेळ मोजू लागली असे मला वाटत नाही ते मला भविष्याचा वेध घेण्यासाठी सतत टिकटिक विचार करायला लावत होती आणि आज सत्तावीस वर्षे होऊनही ते घड्याळ सुस्थितीत आहे. माझ्या कार्याला सतत वेळ दाखविण्याचे नव्हे तर जिद्द, चिकाटी, मेहनत व आत्मविश्‍वास वाढविण्याचे कार्य आजही ते करत आहे.

***

# माझी काय चूक?

चूक ही माणसाच्याच हातून होते, जो काम करतो तोच चुकतो, तो माणुस असतो. पण चूक नसताना त्याचा भुर्दंड भरणे हे काही योग्य नाही. थोरामोठ्यांनी आपल्या चरित्रात आपल्या हातातून झालेल्या चुकांची कबुली दिली आहे. मी माझ्या ह्या पुस्तकात मी न केलेल्या चूकीची कबुली देत आहे. ह्या प्रसंगाने मी खूप काही शिकलो असं म्हणायला हरकत नाही.

मी इयत्ता आठवीच्या वर्गात शिकत होतो. आम्ही तिघे भाऊ सायकलवर शाळेत जात होतो मी सायकल चालवत होतो आणि माझे दोन भाऊ मागे बसले होते. जाता जाता रस्त्याला चढ लागला म्हणून भावंडाना खाली उतरवलं आणि सायकल ढकलत, ढकलत रस्त्याने चाललो होतो. तेवढ्यात मागून माझा एक मित्र आला व एक जोराची थाप पाठीवर मारली आणि म्हणाला गोमाशी पाठीवर बसली होती. ती थाप इतकी जोरात होती की मला झांज आली. काय करावे सूचेना. त्याने जाणून बुजून मला मारले होते. पाठीवर काही नव्हतं. हे मला माहित होतं पण तो फटका खूप जोरात बसला होता. काय करावं सूचेना. पण त्याला त्या फटक्याच उत्तर दिलं पाहिजे. म्हणून मी त्याच्या मागे त्याला फटका मारण्यासाठी पळत होतो. तो हसत हसत पूढे जोरात पळत होता. मला चकवा देण्यासाठी सायकल वाकड्या वाटेने चालवत होता आणि मी त्याला मारण्यासाठी त्याच्यामागे पळत होतो. तो पळता पळता पूढे जावून एका तारेचे कंपाऊड न बघता पळत होता. त्या कंपाऊडने त्याच्या गळ्याला मोठी जखम झाली. रक्त वाहू लागलं. तो रडू लागला. गळ्यातून रक्त त्याच्या सर्वांगावर ओघळत होतं. आम्ही भावंडे भांबाऊन गेलो. काय करावे काही सूचेना. भितीने पोटात गोळा आला. माझ्या इतर मित्रांनी व आम्ही त्याला रक्त थांबावे म्हणून कपड्यांनी धरून दवाखान्याकडे गेलो परंतू आम्ही इतके घाबरून गेलो होतो की आम्ही तिघे भावंडांनी तेथून निघून पळ काढला. पळत पळत मामाचा गावाला पेरणी करण्यासाठी वडील गेले होते. त्याच्याकडे मळ्यात धाव घेतली. त्या मुलाला कुणी मदत केली का? तो आता कसा घरी जाईल? याचा कोणताही विचार त्या वेळेस भिती पोटी मनात आला नाही. त्यावेळेस आम्हाला फक्त त्या परिस्थितीतून त्या ठिकाणांवरुन बाहेर जायचं होतं आणि आम्ही पळत पळत मळा गाठला. मळ्यात नाना पेरणीचं काम करत होते. धावत धावत जावून नानांना घडलेला सर्व प्रकार सांगितला. नाना तसे शांत स्वभावाचे

होते. त्यांनी आमचं सगळं बोलणं ऐकून घेतलं आणि बघू काय होतं म्हणून पून्हा धीर देत कामाला लागले. धापा टाकत आम्ही मळ्यात थांबून राहिलो. संध्याकाळी नानांसोबत मामाच्या गावाऊन संध्याकाळी घरी गेलो. घरी गेल्यानंतर त्या मुलाचे घरची मंडळी व काही माणसे आमच्या घरी आले होते. त्या सर्वांना पाहून माझी धांदल उडाली आता सर्व आपल्याला मारणार, रागावतील, कंठ दाटून आला, डोळे पाणावले. काय करावं सूचेना. लोकांचा गलका वाढत चालला होता. बाई नाना त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करत होते. पण काही केल्या समोरची मंडळी ऐकायला तयार नव्हती. शेवटी सर्वानूमते त्या मुलाचा वैद्यकीय खर्च बाई नानांनी द्यावा, हा निर्णय घेण्यात आला. हे सर्व का झालं, या सर्व प्रकारात माझी काय चूक होती, आम्ही गरीब होतो म्हणून अन्याय सहन करायचा का आपली परिस्थिती पाहून लोक आपल्याला अन्यायाच्या टाचेखाली चिरडतात हे त्यावेळेस समजलं. पण मी तर माझ्यावर झालेल्या अन्यायाला विरोध करत होतो. त्याचा परिणाम असा व्हावा. शेवटी अन्याय हा अन्यायच असतो तो कोणावरही होवो. मग यावर विरोध करण्याला माझी काय चूक?

***

# लग्न लावायचं ठरवलं

असंख्य गोड, कडू अनुभवाने मी समृद्ध होत गेलो. प्रत्येक क्षण हा आपल्याला काही तरी शिकवत असतो. फक्त माणसाला त्या घटनेतल्या प्रसंगातलं मर्म समजलं पाहिजे. आपल्याला मिळालेल्या आपल्या आयुष्यातला प्रत्येक क्षण हा अत्यंत महत्त्वाचा असतो. त्याचं गांभिर्य समजून जगलं पाहिजे. परिस्थितीचे अनेक फटके खाऊन आम्ही जगत होतो. आलेल्या संकटाना, परिस्थितीला तोंड देत होतो. यात खूप अडचणी आल्या पण अडचणींवर मात करत जो जगतो आणि स्वतःचं अस्तित्व टिकवून ठेवतो तो खरा माणूस असतो. अन्यथा त्याचं जगणं व्यर्थ असतं. आपलं जगणं हे इतरांना आदर्शवत वाटावं असं जर वाटत असेल तर अडचणीवर मात करण्यासाठी वापरलं जाणारं श्रमाचं शस्त्र कधीही खाली ठेवू नका.

आयुष्याच्या अनेक चढ-उतारावरून मी माझं प्राथमिक शिक्षण पूर्ण केलं. इयत्ता दहावीला चांगल्या गुणांनी पास झालो. ११ वीला व्होकेशनल कोर्सला ॲडमिशन घेतलं. इलेक्ट्रॉनिकल विषयाशी संबंधित तो कोर्स होता. बारावी परिक्षा संपल्यानंतर सुटीच्या दरम्यान मी एक ट्रान्सफार्मर रिवांईडींगच्या कंपनीत कामाला लागलो. त्यावेळी मला पगार ही चांगला होता. महिन्याला ७०० रु. पगार मला मिळत होता. तसं पाहिलं तर नानांना वर्षाकाठी सालानं काम करुन ३३०० रु. मिळत होते. आणि माझ्या पगाराचा आणि नानांना मिळणाऱ्या सालाची वार्षिक तूलना केली तर नानांच्या तिपटीने जास्त पगार मला मिळत होता. मिळणाऱ्या पगारात मी घरात लागणाऱ्या वस्तू, वाण सामान हळू हळू घेत होतो. त्यामुळे घरचे खूश होते. घरातील करता मुलगा कामाला लागला, घरात पैसा येऊ लागला, घर हळू हळू सांभाळू लागला. बस्सं! आणखिन काय हवं असतं आई बापाला. ते त्यांना मिळालं होतं. मला अपेक्षित शिक्षण घेण्या अगोदरच मला नोकरी मिळाली होती. बाई नाना सुखावले होते. आता त्यांना त्यांच्या दुसऱ्या एका जबाबदारींतून मुक्त व्हायचं होतं. ते म्हणजे माझं लग्न. मी संसाराला लागावं आणि त्यांना त्यांच्या ह्या जबाबदारीतून मुक्त करावं अशी त्यांची अपेक्षा होती. पण मला मात्र शिकायचं होतं. आमच्या संपूर्ण गावात एकच इंजिनिअर होता, तो मोठ्या बागायतदाराचा मुलगा होता. त्याचा मोठा बंगला होता. मला त्याच्या सारखं इंजिनिअर होऊन मोठं व्हायचं होतं. बाई नानांना मला सुख

दायचं होतं. श्रीमंतीच आयुष्य जगायचं होतं. बालपणापासून बाई नानांचे कष्ट पाहत वाढलो. करता येईल तेवढी त्यांना मदत करत कष्टाचं आयुष्य त्यांना बघू द्यायचं नव्हतं. पण बाईनानांच्या अपेक्षा माझ्याकडून वेगळ्या असल्या कारणाने आमच्यात वाद होऊ लागलं. बाई नाना सांगायचे शिक्षण थांबव आहे ती नोकरी धरुन ठेव आणि लग्न कर. माझ्या चुलत मामाची मुलगी करायची हा विषय साखरपुड्यापर्यंत पुढे जात होता. माझ्या या गोष्टीला पूर्ण विरोध होता. मला शिकायचं आहे इंजिनिअर व्हायचं आहे. हे मी त्यांना वारंवार पटवून सांगत होतो. पण ते ऐकायला तयार नव्हते. त्यांनी स्थळ पाहायला देखील सुरुवात केली. या कारणावरुन आमच्यातील वाद वाढत गेला आणि मी मात्र म्हणणं खरं करण्यासाठी गांधीजींच्या मार्गाचा अवलंब केला. मी घरातील अन्नाचा त्याग केला, मी घरात न थांबता मळ्यात भणंगा सारखा उपाशी, तपाशी फिरु लागलो. मळ्यातील काकडी, गाजर, मुळे यावर माझी गुजरांन करु लगलो. बाई नानांशी, घरच्यांशी अबोला धरला. माझी ही अवस्था शेजारी पाजारील लोक बघत होते. काही हसत होते, काही किव करत होते.

काही लोकांनी बाई-नानांची समजूत काढली. बाई नानांना समजून सांगितलं, मुलगा पुढे शिकायचे म्हणतो तर शिकूद्या, फार झाले तर अजून दहा वर्ष साल घाला पण त्याला शिकू द्या. असं म्हणू लागली. शेवटी बाई नानांनी माझ्या हट्टा पुढे हात टेकले आणि पुढच्या शिक्षणाला परवानगी दिली. पून्हा सर्वसुरळीत सुरु झालं. मला जे हवं होतं ते मला सहजा सहजी कधीच मिळालं नाही. त्यासाठी मला झटावं लागले, झगडावं लागल, भांडाव लागलं. तसं पाहता सहजा सहजी मिळणाऱ्या गोष्टीची किंमत राहत नाही. जी गोष्ट मिळण्यासाठी आपल्याला संघर्ष करावा लागतो. ती गोष्ट आपल्यासाठी अमूल्य असते आणि संघर्षातूनच नवनिर्मिती होते. सुरुवातीला बाई-नानांनी माझ्या शिक्षणाला विरोध केला पण तीसऱ्या वर्षाला जेंव्हा प्रवेश घेतांना मला पैसे कमी पडले तेंव्हा बाईने तीचं मंगळसुत्र सुद्धा मोडलं होतं. घरातील मंडळी जर आपल्या बाजूने असतील तर आपण संकटांचा समुद्रसुद्धा हसत हसत पार करु शकतो. याचं उत्तम उदाहरण माझ्यासाठी माझे बाई नाना आहेत.

११ वी पास झाल्यानंतर १२ वी बोर्डाच्या तयारीला लागलो. दिवसा मळ्यातील कामे आणि रात्री वेळ मिळेल तसा अभ्यास करायचो. कारण

मी मनाशी पक्की खूनगाठ बांधली होती मी इंजिनिअर होणारचं त्या दिशेने माझा प्रवास सुरु होता. मी अभ्यासात कोणतीच तडजोड केली नाही. आजचा अभ्यास आणि काम उद्यावर ढकललं नाही. मन लावून जिद्दीने आणि चिकाटीने अभ्यास केला आणि १२ वी ची परिक्षा दिली. माझा अभ्यास आणि चिकाटी पाहून शिक्षकही माझ्यावर खूश होते.

दहावीची परिक्षा झाल्यानंतर एकदा मळ्यात काम करत असतांना मागून आवाज आला. तर माझ्या वर्गात शिकत असलेल्या मुलाचे वडिल माझ्याच शाळेत शिक्षक होते. त्यांनी बोलविणे केले होते ते मला हसत हसत म्हणाले, "अरे तुझा केंद्रात पहिला नंबर आला. मी ही विचार करु लागलो अजून निकाल लागलायला एक महिना बाकी आहे. हे अस्सं का म्हणताय." नंतर ते मोठ मोठ्याने ते हसत होते. पून्हा त्यांनी दहा पंधरा दिवसांनी असंच केलं. मला कळेना नंतर मला समजलं त्यांचा मुलगा माझ्याच वर्गात शिकत होता आणि त्याने दहावीसाठी बाहेर ट्यूशनपण लावली होती. त्यामुळे त्यांना पूर्ण विश्वास होता त्यांचा मुलगा चांगल्या गुणांनी पास होईल आणि मला जेवढं दहावीच्या वर्गात शिकवलं जायचं त्यावर अभ्यास करायचो. त्यांना वाटायचं हा सालकऱ्याचा पोरगा नूसताच पास होईल, किंवा नापास होईल. आपण आपल्या मुलाला ट्यूशन लावली. त्यामुळे आपला मुलगा त्याच्यापेक्षा हुशार आणि चांगले गुण मिळवेल. म्हणून मला हिनवण्यासाठी ते मला येता जाता बोलत असत. मला याचा राग यायचा, वाईट वाटायचं. पण सांगणार कुणाला. श्रीमंतीच्या माजाखाली मी चेपून जात होतो. मोठेपणा हा पैशात असतो की आचरणात याचा विचार करायचो. ह्या सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करत मी माझं काम चालू ठेवलं. बघता बघता दिवस निघून गेले. निकालची तारिख जवळ येऊ लागली. माझी धडकी वाढू लागली. मला पेपर चांगले गेले होते खरे पण मी माझा अभ्यास स्वतः केला होता. कोणत्याही विषयाची ट्यूशन लावली नव्हती की कुणी मला शिकवायला नव्हतं. जे होतं ते मला स्वतःला करायचं होतं आणि मी केलेल्या परिश्रमाचा निकाल लागणार होता. बघता बघता निकालाचा दिवस उजाडला. डोळ्यातून अश्रू वाहू लागले. मी केंद्रात पहिला ओलो नाही मात्र चांगल्या गुणांनी पास मात्र निक्कीच झालो. मला खूप आनंद झाला मला हिनवणाऱ्याला ते माझ्या कामातून मिळालेलं उत्तर होतं. माझ्या परिवारासाठी ही अभिमानाची बाब होती. माझा आनंद गगनात मावत नव्हता. मी यशस्वीतेने एक पाऊल पुढे चढलो होतो. आता खऱ्या अर्थाने माझ्या स्वप्नांना उडण्यासाठी आभाळ मिळणार होतं आणि

मी माझ्या अंधाऱ्या जगण्यातून प्रकाशाच्या वाटेने जाणार होतो, जे ठरवलं ते करणार होतो. मी इंजिनिअरिंगला जाणार होतो. कारण मी ठरवलं होतं मी इंजिनिअर होणारचं.

***

# इंजिनिअर होताना?

माझा स्वभावच मुळात हट्टी आहे. एकदा ठरवलं की मी ते करुनच शांत बसतो. त्याला तुम्ही काहीही म्हणा. माझ्या या स्वभावाला औषध नाही. "हाती घ्याल ते तडीस न्या" ह्या तत्वानेच मी कार्य हाती घेतो ते तडीस नेल्याशिवाय शांत राहत नाही. जे पाहिजे ते मिळवतोच. परिस्थितीने मला खूप शिकवलं आणि शिकता शिकता घडत गेलो. माझं आयुष्य म्हणजे अडचणी आणि संकटांच भांडार होतं. त्यात कधी कधी सुखाचे क्षण यायचे पण वाऱ्यासारखे भुर्रऽऽ उडून जायचे. दहावीच्या वर्गात प्रथम व बारावीला कॉलेजमध्ये तिन्ही सेमिस्टरमध्ये पहिला आलो व केंद्रात पहिला आलो नाही पण केंद्रात तिसरा क्रमांक जरूर पटकावला. आणि १२ वी नंतर हट्टाने पूढच्या शिक्षणाच्या प्रवासाला लागलो. प्रवास म्हटलं म्हणजे एका जागेवरुन दुसऱ्या जागेवर स्थलांतरीत होणं. मी ही स्थलांतरीत झालो. प्राथमिक मधून माध्यमिक मध्ये, माध्यमिकचं उच्च माध्यमिक आणि आता तंत्रविद्या शिक्षणासाठी महाविद्यालयात.

मी आपल्या नेहमीच्या सवयी प्रमाणे लढव्या वृत्तीने महाविद्यालयात प्रवेश केला, उंच्ची वस्त्र परिधान केलेले श्रीमंत घरातील मुलं इंजिनिअरींगच्या प्रवेशासाठी आली होती. सगळे हसत खेळत एकमेकांना टाळ्या देत गप्पा करत होते. मी जरा बिंचकल्या सारखा झालो. त्या मुलांमध्ये शिकायचं म्हणजे जरा अवघडच होतं. त्यांचं आणि माझं कस जूळणार. या मुलांपैकी काहींचे वडील कारखानदार, बागायतदार, आणि मी एक सालकऱ्याचा पोरगा. ही दोघांमध्ये असलेली ही दरी खूप मोठी होती. एकाच्या ताटात तुप होतं तर मला साधं ताट सुद्धा नव्हतं. ही दरी पार होणं अवघड होतं. मी मग विचार केला आपल्याला या मुलांशी काय काम, आपल्याला तर अभ्यास करायचाय ना! असा विचार करत स्वतःचा आत्मविश्वास वाढवत, कॉलेजच्या माहिती पुस्तिका आणि अर्ज विक्रीच्या खिडकी पर्यंत गेलो. आत बसलेल्या माणसाला अर्ज मागितला त्याने खिडकीच्या बाहेर हात काढत अर्जाचे ५० रु. दे, असं सांगितलं. मी खिशात हात घातला. फक्त १ रु. चं नाणं हाताला लागलं. मी आलो पैसे घेवून असं सांगत खिडकी सोडली. इंजिनिअरींग प्रवेश अर्ज नूसता ५० रु. चा होता आणि त्याची शैक्षणिक वार्षिक फी ६५००, नानांच्या वार्षिक उत्पन्नाच्या दुप्पट. हे गणित न जूळणारं! जुळवून जुळवून कसं जुळणार. जुळलं तर टाळा कसा होणार ह्या विचाराने मन खट्टू झालं. माझ्या इंजिनिअर होण्याच्या स्वप्नांची राख होते असं मला वाटलं. काय करावं या विचारानं डोकं नूसतं भानावून गेलं.

मी चूकीचा निर्णय तर नाही घेतला ना? आपली ऐपत नसतांना आपण इंजिनिअर कसे होणार, आपण लहान तोंडी मोठा घास घेतो असं वाटलं. विचार करत बसलो असतांना तेवढ्यात माझं सर येतांना दिसले. मी उठून उभा राहिलो. सरांनी हसत मुखानं मी केंद्रात आलो म्हणून माझं अभिनंदन केलं आणि आता पूढे काय करणार याची विचारना केली. काय उत्तर द्यावं हे कळेना आपल्याला इंजिनिअर व्हायचं हे त्यांना धीर गंभीर होऊन मी सांगितलं. माझ्या निर्णयाचं स्वागत करत त्यांनी माझं निरिक्षण केलं माझा काळवंडलेला आणि उदासवाणा चेहेरा त्यांनी पाहिला आणि काय झालं? असं विचारलं. मी दाटून आलेल्या कंठाने त्यांना माझी सर्व हकीकत सांगितली. त्यांनी पाठीवर हात ठेवत मला उद्या भेटायला ये असं सांगितलं. बघू काय होतं का? म्हणत ते निघून गेले. मी आपल्या इंजिनिअर होण्याच्या स्वप्नांचा चुराडा तर होत नाही या विचाराने संपूर्ण दिवस कसा तरी काढला. अन्न, पाणी गोड लागत नव्हतं. घरचे ही माझ्या सोबत विचार करु लागले. एवढ्या मोठ्या रक्कमेची जमवा-जमव कशी करायची? रात्र अंथरुनात कासावीस होवून काढली. नशिबाला दोष देत देत रात्रभर अंथरुनावर तळमळलो झोप काही लागली नाही.

सकाळी उठलो मळ्यातील थोडी कामे केली. कुणाशी बोलण्याची इच्छाही नव्हती. काल सर भेटले त्यांनी भेटायला बोलावलं होतं हे आठवलं हातातलं काम तसचं ठेवल आणि त्यांना भेटण्यासाठी गेलो. मला पाहत त्यांनी हसत मुखाने स्वागत करत बसायला सांगितलं. मी बसलो आणि माझ्याशी चर्चा करु लागले. मी ही त्यांना माझ्या भविष्यातील कल्पना सांगितल्या आणि बोलता बोलता ते कपाटा जवळ गेले. कपाट उघडलं आणि कपाटातून पैसे काढून माझ्या हातावर ठेवले. १६५० रु. देत ते मला म्हणाले, “हे बघ प्रकाश हे पैसे घे आणि इंजिनिअरींगला प्रवेश घेऊन टाक.” मी मान वर करुन सरांकडे पाहिले. माझ्या डोळ्यांत आसवं दाटली. सर पूढे म्हणाले, “हे बघं, हे मी तुला तुझी किव आली म्हणून मदत नाही करत. तर अभ्यासाविषयी तुझी ओढ, परिश्रम आणि शिकण्याची जिद्द पाहून हे सर्वकरतो आहे.” मी मानेने नकार भरत होतो आणि पुढे काही बोलणार तोच सर बोलले, “मला काही एक ऐकायचं नाही. तू इंजिनिअर होणारच प्रकाश!” असं म्हणत त्यांनी पाठीवर हात ठेवला. तो स्पर्श त्या वेळेस मला एखाद्या देव दुताच्या स्पर्शासारखा जाणवला. विद्यार्थी आणि शिक्षक या पलीकडे कोणतही नातं नसतांना सरांनी असं कराव, आपल्या घर खर्चाचे

साठवलेले पैसे मला द्यावे. का? खरचं याच उत्तर अजूनही मला मिळालेलं नाही. पण महत्त्वाकांक्षा जर असेल तर देवालाही तुमच्यासाठी खाली यावं लागते. जसे माझे सर माझ्यासाठी देव होवून आले होते.

त्यांनी मला केलेल्या मदतीची फेड जरी मी पैसे देवून केली असेल पण त्यांच्या उपकाराची फेड मी कधीच करु शकत नाही. त्यांच्या ऋणात मी आजीवन बांधिल आहे.

आता कुठे जीव भांड्यात पडला होता. माझ्या स्वप्नांना पून्हा नव्याने उभारी आली होती. मी दुसऱ्या दिवशी कॉलेजला गेलो, फॉर्म घेतला. फॉर्म भरला, १६०० रु. भरले आणि पूढे टप्प्या टप्प्याने पैसे भरतो असं सांगत प्रवेश निश्चित केला. पण, अजूनही मला कॉलेजचे पैसे भरायचे बाकी होते. त्यावर एकच उपाय होता तो म्हणजे काम. वडीलांना सालानं मिळणाऱ्या पैशापेक्षा जास्त पैसा आता कमवायचा होता आणि त्यासाठी जास्त काम करावं लागणार होतं. जेवढं काम करु तेवढा पैसा जमा होईल यानूसार कामाला लागलो. मला माझ्या परिवाराने सुद्धा त्यावेळेस पूर्ण साथ दिली. जो जे काम मिळेल ते काम करु लागला. माझा भाऊ एकनाथ, अनिल, मी आम्ही तिघे कामाला लागलो. काय कधी कुणाच्या मळ्यात छाटणीला जा, पाणी भरायला जा, कापनीला जा जे मिळेल ते काम केलं. बाई-नाना सुद्धा अथक परिश्रम घेत होते. परिश्रम, अधिक काम, करत करत सगळ्यांच्या मदतीने मी माझ्या कॉलेजची फी पूर्ण केली. त्यावेळेस जर मला माझ्या परिवाराने साथ दिली नसती तर आज मी इंजिनिअर झालो नसतो. माझ्या ह्या अंधाराकडून प्रकाशाच्या प्रवासात माझ्या घरचे हे माझ्यासाठी दिपस्तंभ सारखे कार्य करत राहिले. व सालकऱ्याचा मुलगाही इंजिनअर होऊ शकतो. इतकी ऊर्जा आजपर्यंत मला दिली.

***

# थांबलोच नाही

आयुष्यात अनेक प्रसंग येतात. त्या प्रसंगाला आपल्याला सामोरं जावं लागतं त्यासाठी आपल्यात असलेल्या कौशल्याचा वापर करावा लागतो. अशाच कौशल्याच्या आधारावर मी येणाऱ्या प्रत्येक समस्येतून मार्ग काढत होतो. काबाडकष्ट करत इंजिनिअरींगचा अभ्यास चालू होता. शिक्षण घेत असताना येणाऱ्या खर्चावर कशी मात करायची याचा विचार सतत डोक्यात घोळत रहायचा. मग एक युक्ती सूचली सुयोग कॉलेज टाईम लकी स्कीम दर सप्ताह मुलांकडून २ रु गोळा करायचे. लकी ड्रॉ काढायचा आणि आवश्यक असलेली वस्तू विजेत्याला द्यायची. बघता बघता १०० पेक्षा जास्त मुलं माझ्या या उपक्रमात सामील झाले आणि पहिल्या लकी ड्रॉमध्ये २००० रूपयात मी १२०० रु.ची सायकल गिफ्ट म्हणून दिली. आणि त्यातून मला काही पैसे सुद्धा मिळाले. अशा अनेक वस्तू मी त्या लकी ड्रॉ मध्ये वाटल्या आणि त्यातून मिळणाऱ्या पैशावर मी माझा कॉलेजचा प्रोजेक्टचा व शैक्षणिक खर्च भागविला.

एकदा द्वितीय वर्षाला असताना आमच्या कॉलेज मध्ये शिक्षकांचा संप झाला होता. वर्गात एकूण ७२ मुलं होते. त्यातल्या एकाने कॉलेज सोडलं होतं आता फक्त ७१ मुलं होती. शिक्षकांच्या संपामुळे शिक्षक काही वर्गावर शिकवायला येत नव्हते. पेपर जवळ जवळ आले होते. सर्व ७० च्या ७० मुलांनी क्लास लावला. पण मी काही क्लास लावू शकत नव्हतो. कारण कॉलेजची फी भरता भरता मुलं म्हणायची अरे क्लास लावून घे नाही तर नापास होशील. पण परिस्थितीमुळे काही क्लास लावू शकत नव्हतो. ७० मुलांपैकी एका मुलाने क्लास लावला नाही. हे क्लासच्या सरांना कळालं. कोण आहे तो? विचारना केल्यानंतर मुलांनी माझं नाव सांगितलं. याच दरम्यान माझा मित्र गोकूळ याचे वडील लासलगावला प्राध्यापक होते त्यांनी माझी हुशारी जाणली होती. म्हणून त्यांनी त्यांच्या घरी येऊन मित्रासोबत अभ्यास करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. मलाही एक श्रीमंत घरात राहण्याचं भाग्य लाभलं याचदरम्यान मी माझा मित्रासोबत अभ्यास करतांना त्याचा नापास झालेला अवघड विषयी मी त्याला स्वतः अभ्यास करून शिकविला व माझ्या मित्रांच्या घरात असलेले ज्ञानसंपदा मला जवळून अनुभवली व आत्मसातही केली. याच विषयाचा क्लास लावणारी मंडळी मला अनेकदा भिती घालत होती. परंतू मला क्लास लावणें शक्य होणार नव्हते. अनं असेच एके दिवशी आमच्या गावापासून मी कॉलेजला जाण्यासाठी बसमध्ये बसलो. त्याच बसमध्ये क्लासचे सरही चढले. त्यांनी

मला इशारा करुन बोलावून घेतलं. मी जवळ गेलो. त्यांनी मला क्लास न लावण्याचं कारण विचारलं. मी सर्व सांगितली ते ऐकल्यानंतर ते मला म्हणाले सर्व ठीक आहे, नको देऊ पैसे क्लासला तर ये... मी म्हणालो नाही सर घरी मळ्यातली कामं असतात, हातावर पोट भरणारी आम्ही माणसं मी जर क्लासला वेळ दिला तर घरातील काम करणारा एक हात कमी होईल. मला नाही जमणार म्हणालो तर सर म्हणाले, "अरे वेड्या नापस होशील खूप अवघड विषय आहे तो." मी म्हणालो मी करेल अभ्यास त्यांच्या कपाळावर आठ्या आल्या मी जाऊन माझ्या जागेवर बसलो. कॉलेज सुटल्यावर मला मळ्यात कामाला जावं लागे, गवताचे भारे विकायला बाजारातजाणे या सारखे अनेक कामं माझ्या मागे लागलेली असायची. ही सर्व कामे झाल्यानंतर मी रात्री अभ्यासाला बसायचो. मी रात्री उशीरापर्यंत अभ्यास करुन झाल्यानंतर पून्हा सकाळपासून आपल्या नित्याच्या कामाला सुरुवात व्हायची. मित्र बोलायचे क्लास लाव नापास होशील. पण मी माझ्या क्लास न लावण्याच्या मतावर ठाम होतो. बघता बघता पेपर द्यायची वेळ आली. परीक्षा पूर्ण झाली. आता फक्त काम करता करता निकालाची वाट पाहणं एवढंच काम उरलं होतं. मी आपलं काम करत राहिलो. दिवस पूढे जात राहिले. बघता बघता निकालाचा दिवस उजाडला. मनात कालवा कालवं सुरु होतं. काय लागला असेल निकाल पास तर झालो असेल ना? मुलं चांगले सांगत होते. क्लास लाव, क्लास लाव. मी कुणाचंच ऐकलं नाही. आता काय झालं काय माहित. हा विचार करत असताना हातात निकाल येवून पडला घाबरत घाबरत निकाल वरुन नजर फिरवली. मला धक्काच बसला. ज्या विषयाला घाबरत मुलांनी क्लास लावला होता त्याच विषयात मला इतर मुलांपेक्षा सर्वाधिक गुण मिळाले होते आणि विशेष म्हणजे त्या विषयाच्या ओरल पण चांगली झाली होती. खूश होऊन ओरल घेणाऱ्या मॅडमांनी मला किती गुण पाहिजे असं विचारलं होतं. तेव्हा त्यांनी ५० पैकी ४९ एवढे गुण दिले होते. हे सगळं शक्य झालं ते केवळ स्वतःवरच्या आत्मविश्वासाने, स्वतःवर जर विश्वास असेल तर आपण अंधारात स्वतःचा प्रकाश स्वतः निर्माण करु शकतो. प्रत्येक संकटावर मार्ग काढता येतो हेच मी शिकत होतो. रडण्यापेक्षा परिश्रम घेतल्यास संकटेही पळवून लावू शकतो हेच मी शिकलो. यातूनच आत्मविश्वास वाढला व संकटे झेलण्याची बळगटेही प्राप्त झाले. संकटामुळे मी कधीच थांबलोच नाही. त्यामुळे अंधारातून प्रकाशाकडे मार्गक्रमन करणे मला सोपे झाले.

***

# मोठ्या माणसांचा शोध

प्रत्येकाला आवरत आपल्या इच्छा, अपेक्षा पूर्ण व्हाव्या त्यासाठी आपण अनेक गोष्टी करतो. तारुण्यात आपण मोठं व्हावं, मानसन्मानाने जगता यावं त्यासाठी आपण देवाला नवसं करतो मलाही आठवत मी असाच नवस केला पण हा नवस काही माझ्यासाठी नव्हता तर गावासाठी होता, आमदारासाठी होता. गावची शोभा ही त्या गावात कोणता प्रतिष्ठित माणूस राहतो यावर असते. मलाही वाटत होतं आपल्या गावाला मदत करणारा आणि गावाच्या समस्या जाणून घेणारा आमदार हा आपल्याच गावचा असावा म्हणून मी देवाला नवस केला होता. हे देवा यावेळी आमच्या गावचा माणूस आमदार म्हणून निवडून येऊ दे आणि माझा नवस फळाला आला. आमच्या गावातला माणूस आमदार म्हणून निवडून आला. सगळ्या गावाला आनंद झाला. मी देवाला कबूल केलं होतं आमचा जर आमदार आला तर ११ नारळं वाहील. मी बोललो खरं ११ नारळ, पण एक नारळाचे सुद्धा पैसे माझ्याकडे नव्हते. झाली का पंचायत. आता काय करावं तेच कळेना? हे स्वतःहून ओढावून घेतलेलं लचांड कसं निस्तारायचं तेच कळत नव्हतं.

पण यात आनंद होता देवाने माझं ऐकलं याचा. माझी इच्छा पूर्ण झाली होती. पण नारळाचं काय? देवाचा नवस आपण बरोबर फेडू असं म्हणत आनंदाने आम्ही आमदारांचं घर गाठलं. मी आणि माझा मित्र दोघे सोबत त्यांच्या घरी गेलो. नव्या आमदाराची आम्ही भेट घेतली आणि ते निवडूण आल्याचा आम्हाला किती आनंद झाला हे सागितलं. आणि आपण निवडूण यावं यासाठी देवाला ११ नारळांचा नवस केला हे सुद्धा सांगितलं. हे ऐकल्या बरोबर आमदार भारावून गेले. आपल्या विजयासाठी गावाची मंडळी सुद्धा प्रयत्न करत होती. याचा त्यांना खूप आनंद झाला आणि मला म्हणाले चल नवस पूर्ण करु. त्यांनी मला त्यांच्यासोबत गाडीत घेतलं. त्यांच्या सहकाऱ्याला नारळ आणायला पाठवले आम्ही मित्र आमदारांसोबत त्यांच्या गाडीत बसलो. गाडी लासलगांव वरुन आमच्या गावाच्या दिशेने निघाली. सोबत दोन्ही बाजूला आमदारांचे अंगरक्षक होते. आम्ही कॉलेजातले मुलं आमदारांच्या गाडीत गावा पर्यंत आलो. आम्हाला गावकऱ्यांनी बघितलं, ही मुलं आमदाराच्या गाडीत यांच सर्वांना आश्चर्य वाटत होतं. सर्व त्या गाडीच्या दिशेने मंदिरा जवळ गोळा झाले. आमदारांचे अभिनंदन करु लागले. आमदारांच्या स्वागताची तयारी सुरु झाली. आमदारांनी गावच्या मंदिरातील देवाचं दर्शन घेतलं. मी केलेला नवस आमदरांनी स्वखर्चाने

पूर्ण केला. आमदारांनी माझ्याशी गप्पा मारत गावच्या परिस्थितीचा आढावा घेतला. सर्वांना भेटून आमदार आपल्या कामासाठी निघून गेले. मी आमदाराला गावात आणलं म्हणून काही जण माझं कौतूक करत होते. तर काही जण मला बघून हाच तो मुलगा ज्याने आमदारासाठी नवस केला म्हणून दाखवत होते, तर काही जण रिकामे उद्योग करणारा मुलगा म्हणून बघत होते.

मला समाधान होतं की आपण जे ठरवू ते पूर्ण होऊ शकतं फक्त करण्याची इच्छा हवी. जी माझ्यात होती. त्यावेळी आमदाराला भेटण्यासाठी केलेले कष्ट आठवले की हसायला येतं. खर पाहता बाळाचे पाय पाळण्यात दिसता तसं काहीसं माझं झालेलं आहे. अस म्हणायला हरकत नाही. आमदारांशी जवळीक साधली गेली. कदाचित हे भविष्याचे संकेत असावे की पूढे जाऊन तुला अशा माणसांमध्ये कार्य करावे लागेल. आज मी अनेक आमदारांना भेटतो, त्याचा माझा चांगला परिचय आहे, ओळख आहे, अनेक कार्यक्रमात आम्ही सोबत असतो. स्वतः वरचा विश्वासच तुम्हाला उच्च स्थानावर पोहचवू शकतो. फक्त प्रयत्नांची साथ हवी. अंधारा कडून प्रकाशाकडे जातांना.

***

# आयुष्याच्या वेगळ्या वाटेवर

काही माणसं बोलून आपला शब्द पाळत नाही, काही माणसं न बोलता ठरवलेलं करुन दाखवता. असेच एक गृहस्थ तात्यांच्या ओळखीचे होते. ओळख होता होता एक नात तयार झालं त्यांनी बाईला आपली बहीण मानलं होतं ते म्हणजे निखाडे मामा. निखाडे मामा (गुरूजी) हे एका शहराच्या शाळेत शिक्षक होते. अधून मधून ते आमच्या गावाला काही कामा निमित्त येत तेव्हा त्यांचा मुक्काम हा आमच्याकडे ठरलेला असायचा. येतांना आमच्यासाठी खाऊ घेऊन यायचे. त्यामुळे आम्ही त्यांची आतुरतेने वाट पाहायचो. बाईने बनवलेली गरीबाची चटनी भाकरी ते मोठ्या चवी चवीने खायचे. घरात पाहूण्याचं स्वागत उठकार बसकार माझ्याकडे असायचा. माझ्या अभ्यासावर, माझ्या मेहनतीवर निखाडे मामा एकदम खूश होते. संध्याकाळी गप्पा मारता मारता ते बाई नानांना अनेक वेळा बोलले होते, बाई माझी एक नात मी प्रकाशला देईल. तीचं आणि प्रकाशचं लग्न लावून देईल. हे वाक्य त्यांनी अनेकदा बोलून दाखवलं होतं त्याच्या शब्द देवाघरी गेल्यानंतर आठ-दहा वर्षानंतर सुद्धा खरा ठरला.एकदा अचानक निखाडे मामी आमच्या घरी आल्या आणि बाईला आणि मला घाई करु लागल्या, “चला आवरा, मुलगी पहायला जायच आहे.” मला काही कळेना काय करावं ते. बाई आणि मामी तयार झाल्या. पुढे निघाल्या जातांना मला म्हणाल्या निट तयारी कर आणि तात्यांसोबत त्यांच्या गाडीवर ये. मी आमच्या परिस्थितीनूसार माझ्याकडे असलेले चांगल्यातले चांगले कपडे घातले आणि तात्यांकडे गेलो. तात्या माझी वाट पहात बसले होते. मला पाहताच तात्यांनी पायात चपला घातल्या आणि त्यांची नजर माझ्या पायाकडे गेली. माझ्या पायात चपला नव्हत्या. मी अनवाणी होतो. त्यांनी विचारलं, “काय रे चपला घातल्या नाही.” मी मान खाली घातली आणि म्हणालो माझ्याकडे चपला नाही! ते म्हणाले ठिक आहे चल उशीर झाला आपल्याला. असं म्हणत त्यांनी आपल्या फटफटीला किक मारली. मला बसायला सांगितलं. मी बसलो, माझ्याशी गप्पा मारत मारत त्यांनी मला लासलगावला नेलं. तिथे एका चपलाच्या दुकाना समोर गाडी थांबवली आणि दुकान दाराला माझ्या  मापाची चप्पल द्यायला लावली. मी नाही नाही म्हणत होतो. मला सुद्धा लाज वाटत होती आपण मुलगी पहायला चाललो आणि पायात साधी चप्पल सुद्धा नाही. तात्यांना माझ्या मनातली ही रुखरुख समजली होती. म्हणून त्यांनी मला चप्पल घेण्याचा आग्रह केला. मी ती नवीन चप्पल घालून त्यांच्यासोबत गाडीवर बसलो. लासलगाव,

मनमाड रस्त्यावर गाडी थांबवत तात्यांनी मला मुलगी पहायला जाताना कसं बोलायचं, विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे कशी द्यायची, काय प्रश्न विचारायचे त्याचं प्रशिक्षण दिलं आणि गाडी मनमाडच्या रस्त्याला लागली.

तात्या आणि मी मुलीच्या घरा जवळ येऊन पोहचलो. मनमाड सारख्या शहराच्या ठिकाणी पक्क बांधकाम असलेलं मोठं घर, मी घरात प्रवेश करण्यासाठी चप्पल काढली तेव्हा त्या घरात असलेल्या लोकांच्या अनेक चप्पला मला दिसल्या. घरात काही फक्त ५, ६ जण असतील असा माझा अंदाज तिथेच खोटा ठरला. ते खटल्याचं मोठं घर होतं. श्रीमंताचं पण मी मात्र सालकऱ्याचा पोरगा, अजून शिक्षण घेत होतो. ह्या घरातील मुलगी करेल आपल्याशी लग्न. तिच्या घरचे तयार होतील का? कशी असेल मुलगी अशा असंख्य प्रश्नांनी मनात घेराव घातला आणि प्रश्नांच्या चक्रात अडकलेला मी त्या घरात प्रवेश केला. घरातील लोखंडी  पलंगावर तात्या आणि मी जाऊन बसलो. मला पाहण्यासाठी घरातील एक एक मंडळी बाहेर येऊ लागली. बघता बघता माझ्या समोर १० ते १२ जण येऊन उभे राहिले. मुलगी बघायला गेल्या नंतर विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांना सुरुवात झाली. त्यांची समाधान कारक उत्तरे मी देत गेलो. हा सगळा प्रसंग जणू माझी कॉलेजची ओरल चालू असल्या सारखा वाटत होता. तेवढ्यात त्या गर्दीतून वाट काढत  हातात चहा घेऊन मुलगी आली. आपण मुलीला असं पाहणं बरं नाही म्हणून मी खाली मान घातली. चहा घेतला. मुलगी आमच्या समोर बसली पण माझी तीला मान वर करुन पाहण्याची हिम्मत होईना. बाजूला बसलेल्या तात्यांनी तीला प्रश्न विचारले. तुझं नाव काय? मुलीनं उत्तर दिलं ज्योती! या सर्व प्रश्न-उत्तराच्या सरबत्तीत त्या मुलीचं नाव तेवढं माझ्या लक्षात राहिलं. कारण मी प्रकाश होतो तर ती ज्योती. नाव ऐकताच मनाला एक विचार स्पर्श करुन गेला. जर ह्या मुलीशी आपलं लग्न झालं तर ही ज्योती माझ्या अंधाऱ्या आयुष्याला प्रकाशमान करेल आणि आयुष्याचे स्वप्न रंगवत होतो. त्या स्वप्नांची तंद्री लागली तेवढ्यात तात्यांनी आवाज दिला प्रकाश! बघितली का मुलगी. तात्यांच्या आवाजाने दिवा स्वप्नातून जागा झालो. खरं पाहता मी मुलीचा चेहरा सुद्धा पाहिला नव्हता, पण आता सांगणार काय मी मानेने होकार दिला. मुलगी उठली, आतल्या खोलीत जायला निघाली मी बघेपर्यंत ती वळली होती. मी आतल्या खोलीत जाणाऱ्या पाठमोऱ्या ज्योतीला पाहिलं, पाठीवर वेणी डुलतडुलत ती नजरे आड गेली.

मला मुलगी पसंत आहे का विचारना झाली. मी हो म्हटलं. पण लग्न एक वर्षानंतर करेल असं सांगितलं. तोपर्यंत माझं शिक्षणही पूर्ण होणार होतं आणि मी नोकरी ही शोधणार होता. माझी अट मुलीकडच्यांनी मान्य केली आणि मी माझ्या पसंतीस उतरलेल्या मुलीच्या भावी स्वप्नातून वास्तवात आलो. साखरपुडा झाल्यानंतर दिडवर्षानंतर माझा विवाह होणार आता आपल्यावर आणखीन एक जबाबदारी येणार आहे. त्यासाठी आपल्याला सज्ज असलं पाहिजे. म्हणून मी अभ्यासावर भर देऊ लागलो. शेवटच्या वर्षाचे पेपर दिले गेले. निकालचा विचार करत मळ्यातील आपलं रोजची कामं चालूच होती. जगण्याचा रहाट गाडी ओढत ओढत आम्ही जगत होतो आणि इंजिनिअरींग निकाल लागला. मी चांगल्या गुणांनी पास झालो. मी माझं इंजिनिअर होण्याचं स्वप्न पूर्ण केलं होत. हट्टाने, कष्टाने, जिद्दीने मी इंजिनिअर झालो होतो.

इंजिनिअर करुन आपल्याला लवकर नोकरी मिळेल या माझ्या अपेक्षेवर निराशेचं पाणी फेरलं गेलं. रोज लासलगाव वरुन सकाळची गाडी पकडून नाशिकला यायचो. नोकरीच्या शोधात कंपनची दारं ठोकायचो पण कुठे नोकरी मिळत नव्हती. कारण नोकरीच्या बाजारात परिक्षेत मिळालेल्या गुणांची किमंत नसून कागदोपत्री गुणपत्रकं होते. वशिल्याचा कागद नव्हता. कधी कधी नाशिकला यायला पैसे नसत. तेव्हा संध्याकाळी घरी जाऊन गवताचे भारे विकून पैसे जमवत आणि पून्हा नाशिकला येऊन नोकरीची शोध मोहीम चालू असायची. दररोज संपूर्ण एमआयडीचा परिसर उपाशी पोटी धुडाळायचो व सरते शेवटी एका कंपनीत नोकरी मिळाली. आनंदाने घरी आलो. दुसऱ्या दिवशी कामावर गेलो. काम समजून घेतलं आणि पहिला दिवस बरा गेला. काम समजून घेतलं आणि दुसऱ्या दिवशी आपण अजून चांगल काम करु आणि जास्त काम करु हा विचारात कामावर गेलो. माझ्याकडे कपॅसिटर चेक करायचं काम होत, मी माझं काम अगदी बरोबर करत होतो. कामाचा वेगही चांगला होता. अधुन मधुन सुपरवायझर येऊन काम बघून जायचा. संध्याकाळ पर्यंत सर्व कपॅसिटर मी तपासून निट बाजूला ठेवले. संध्याकाळी सुपरवायझर आला त्याने माझं काम बघितलं. मला वाटलं तो माझ्यावर खूश होईल पण झालं उलटंच तो माझ्यावर खेकसला. म्हणाला, “मुर्खा हे काय केलं?” मी विचारलं, “काय झालं?” काय झालं सर्व कपॅसिटर चेक केले? हो! मग उद्या काय काम करशील? म्हणजे? तू जर आजच सर्व काम पूर्ण केलं तर उद्या तुला

करायला काम कुठे आहे. तुझ्यामुळे इतरांना ही काम राहणार नाही. उद्या पासून तू यायचं नाही. असं म्हणत त्या नवीन नोकरीच्या कंपनीचं दार माझ्यासाठी बंद झालं.

पून्हा पहिले पंचावन्न पाढे सुरु झाले. पून्हा नोकरीच्या शोध. माझ्या सोबत तात्यांचा मुलगा पण नाशिकला यायचा. पण वशिला काही मिळत नव्हता आणि क्रॉमटन ग्रिव्हस कंपनीत जागा निघाली मग नाशिक मध्ये ओळख काढत वशिला मिळवला. आणि क्रॉमटन ग्रिव्हस सारख्या मोठ्या कंपनीत कामाला लागलो.

खरे पाहता आयुष्य खूप खडतर असतं. माणसाला जे हवं आहे ते त्याल सहज कधीच मिळत नाही. त्यासाठी त्याला झटावं लागतं, त्या झटण्याची मज्जा कुछ और आहे. ह्या सर्व झटण्यात आपली कधीच झीज होत नाही. उलट अधिक भरच पडते आपण अनुभव संपन्न होत जातो. पुढे पुढे जात राहतो.

***

# नोकरी करताना

क्रॉमटन ग्रिव्हस सारख्या मोठ्या कंपनीत कामाला लागलो सुखाचे दिवस आले. पगार ही चांगला होता. सर्व काही सुरळीत चाललं होतं. कंपनीत कामाला असतांना मला खूप शिकायला मिळालं. संपूर्ण देश पहायला मिळाला. एका चांगल्या हुद्यावर काम करत असल्यामुळे लोकांमध्ये मान, सन्मान होता. पैसा भरपूर होता. कष्टाचं कुठे तरी फळ मिळालं होतं आणि आता लग्न ही झालं होतं. क्रॉमटन ग्रिव्हसला असताना बाहेर गावी जावे लागे. त्या निमित्ताने माझं संपूर्ण भारत फिरण झालं. त्याचा भौगोलिक अभ्यास करता आला. नाण्याला जशा दोन बाजू असतात तशी चांगल्याला सुद्धा वाईट बाजू आहे. या संपूर्ण भ्रमंतीत मला चांगले वाईट अनुभव आले. अनेक माणसे मला भेटली व त्यांचा अभ्यासही करता आला.

दक्षिणेकडे झालेला माझा अपघात. प्राण जाता जाता वाचलो. त्याचे असे झाले. तामिळनाडू कडून एक मोठी ऑर्डर क्रॉमटन ग्रिव्हसला मिळाली होती. ती ऑर्डर डिलीव्हर करायची होती. त्यासाठी एक जबाबदार व्यक्ती म्हणून ऑर्डर डिलीव्हर करण्यासाठी माझी नेमणूक झाली होती. सहा मोठ्या गाड्या भरल्या गेल्या. आणि प्रवासाला सुरूवात झाली. ही ऑर्डर वेळेवर पोहचणे गरेजेचे होते. त्यामुळे कुठेही जास्त न थांबता कुठेही मुक्काम न करता आमचा प्रवास चालू होता. मी पहिल्या गाडीत बसलो. प्रवास करता करता मध्यरात्री होऊ गेली. दिवस रात्र बसून प्रवास करून अंग दुखू लागलं होतं डोळेही जड झाले. पापण्या आपोआप मिटायला लागल्या म्हणून ड्रायव्हरच्या वर असलेला किन्नर कॅबीनमध्ये जाऊन मी झोपलो. अर्धा एक तास डोळा लागला. पहाटेची वेळ होती गाडी आपल्या गतीने पूढे जात होती. एक उंच टेकडावर गाडी पोहचली. तेथून गाडी उताराला लागली. उतारावर खाली एक चहाची टपरी होती. तिथे काही मंडळी चहा पित बसली होती. गाडी हळू हळू उतारावरून खाली येत होती. गाडीतील वजनाने गाडीचा वेग वाढला. ब्रेक लागता लागे ना ड्रायव्हला गाडी सावरता येई ना गाडीने आपली दिशा बदली. बघता बघता गाडी त्या टपरीच्या दिशेने वळाली आणि त्या टपरीत घुसली. टपरीचे मोठे नूकसान झाले. पण सुदैवाने कोणतीही जीवीत हानी झाली नाही. ड्रायव्हरने जेव्हा ब्रेक दाबला तेव्हा मी वरच्या कॅबीन मधून सरळ पूढच्या काचेवर आदळून बोनटवर पडलो. मारही लागला. पण तरी सुद्धा घेतलेली जबाबदारी न झटकता मी ती ऑर्डर योग्य ठिकाणी आणि योग्य वेळेत पोहचवली. एकदा बिहारमध्ये जात होतो. रेल्वेत बसलो. मला

पटनाला उतरायचं होतं माझ्या हातात कंपनीचे महत्त्वाचे कागदपत्र आणि पैशांची बॅग होती. मी गाडीत माझ्या सीटवर बसलो होतो. अचानक माझ्या अवती भोवती गर्दी वाढायला लागली. अचानक ही माणसे कुठून आली, याचा विचार करु लागलो. काही दिसांपूर्वी पेपरला बातमी होती की, एका इंजिनिअरला या भागात किडनॅप केल्याची ती बातमी आठवली या तसं काही प्रकार माझ्या सोबत घडणार असल्याचं मला जाणवू लागलं. काय करावं सुचेना. पटना स्टेशन कधी येतं असं झालं होतं. पण यांच्या तावडीतून कसं सुटायचं याचा विचार करु लागलो. स्टेशन जवळ आलं म्हणून दारा जवळ गेलो तर दारात तीघे जण. काय करावं सुचेना. हातात बॅग होती. स्टेशन जवळ आलं, मी त्यांच्या दोन्ही पायांच्यामधून बॅग स्टेशनवर ढकलून दिली. आणि मी ही एका माणसाच्या दोन्ही पायाच्या मधून वाट काढून स्वतःला ती बॅग पकडण्यासाठी स्टेशनवर झेपावले, पडलो, खरचटलं, लागलं, कपडे फाटले पण बॅग छाती जवळ धरत पळत सुटलो. ते गुंडही माझ्या मागे स्टेशनवर उतरले. मी पळत पळत बाहेर आलो रिक्षा पकडली आणि या सर्व प्रकारातून माझी सुटका करुन घेतली. असे जीवावर बेतणारे प्रसंग ह्या कामात घडत होते. काश्मिरला जाण्याची संधी सुद्धा आली होती. पण मी ती स्वतः नाकारली कारण तीथलं दहशतीचं वातावरण मला भिती घालत होतं. या सर्व कामासाठी पैसा मिळत होता पण समाधान मात्र नव्हतं. नवीन लग्न झालेलं, घरच्यांना द्यायला वेळ नाही. जीव नको नकोसा व्हायचा. पण करणार काय नोकरी होती. करावी तर लागणारच. त्यात आंनदाचा प्रसंग घडला होता. आमच्या संसाराच्या वेलीवर आता प्रज्वल नामक एक फुल उमललं होतं.

एकदा तिरुपतीला जाण्याची संधी मिळाली तेंव्हा ह्या दौऱ्यावर मी माझा मित्र गोकूळ आणि भाऊ अनिलला सोबत न्यायचं ठरवलं. मनमाड वरुन गाडी होती. म्हणून आम्ही मनमाडला आलो. गाडीला अवकाश होता म्हणून माझ्या सासुरवाडीचा पाहूणचार झोडण्यासाठी ज्योतीच्या घरी गेलो. आमच्या सासऱ्यांना पाहूणचार करण्याची आवडही होती. त्यात जावई आले म्हटलं की मग काय विचारायला नको. चिकन, मासे, अंडे, यांचा वास घरात घुमू लागला. खरं पाहता बाई नाना सात्वीक विचारांचे त्यांना हे असले प्रकार कधीच आवडले नाही. मी घरात एकटाच मांसहार करत होतो. लहान होतो तेव्हा मला मळ्यातील शेजारचे व गावातील काही लोक प्रेमाने मला हे जेवण खाऊ घालत होते. मांसाहार आमच्या घरी कधीच बनला नाही. बाई

बोलायची, तुला काय करायचं ते बाहेर, घरात नाही! त्यामुळे हे सर्व प्रकार मी सगळे बाहेर खायचो. बनवलेल्या त्या मेजवाणी वर आम्ही तीघांनी ताव मारला आणि पाहूणचार आटपून आम्ही प्रवासाला लागलो. तिरुपतीला आम्ही दुसऱ्या दिवशी उतरलो. आणि इथे तीथे थांबण्यापेक्षा तिरुपतीचं दर्शन घ्यावं म्हणून सरळ मंदिराकडे गेलो. दर्शनाच्या रांगेत उभा होतो. रांग पूढे सरकत होती. मला तिरुपतीचं मुखदर्शन झालं आणि अचानक मनात आपण मांसाहार करुन मंदिरात आलो याची आठवण आली. जेव्हा मी देवाच्या मूर्तीसमोर उभा होतो. तेव्हा एक मोठा प्रसंग घडला मला विजेचा झटका बसवा असा झटका बसल्याची जाणीव झाली. मी पूर्ण सुद्धीवर येऊन माझ्या कृत्याची मलाच लाज वाटू लागली. देवाला माफी मागितली आणि इथून पूढे मांसाहार करणार नाही अशी शपथ घेतली पण मला चांगली स्थिर नोकरी दे ही मागणी देवाकडे केली.

माणसाजवळ पैसा आली की, त्याच्या आवडी, निवडी सारच बदलतं. त्याला कळत नाही आपण जे करतो आहे ते योग्य आहे का. पैसा हा गरज पूर्ण करतो पण गरजाही वाढवतो. असं माझंही होत होतं. कदाचित पैशाने मला अनेक शौक लागले असते मला ते सर्व टाळायचं होतं. बाई-नानांचे संस्कार जपायचे होते. अंधाराकडून प्रकाशाकडे जाताना मला त्यांच्या संस्काराचा यथा योग्य उपयोग होणार होता. त्यांच नाव खराब होऊ नये त्यांना जगण्यातला आनंद द्यायचा होता म्हणून मी ही नोकरी नाकारण्याचे धाडस केलं व माझ्या आवडत्या शैक्षणिक क्षेत्राकडे पाऊले टाकले.

***

# संसाराचा नवा प्रवास

कोणतीही गोष्ट तुम्ही श्रद्धेने करता तेव्हा तुम्हाला त्याचं फळ नक्की मिळतं. माझ्या कडून झालेल्या चुकीची मी भगवान तिरुपतीकडे अगदी नम्र आणि मनोभावे क्षमा मागितली. चुकतो तो माणूस असतो. मीही माणुसच आहे. माझ्याही हातून चुका झाल्या असतील पण त्या क्षमा करण्यासारख्याच होत्या. कारण त्याने कुणाचं नूकसान झालेल नाही. तिरुपती वरुन नाशिकला आलो. मनात घडलेल्या प्रकाराबद्दल रुखरुख होतीच. पण सांगणार कुणाला दुसऱ्या दिवशीही कंपनीत दाखल झालो. हातात गावकरी पेपर घेतला आणि नजर नोकरीच्या जाहिरातीवर गेली. के.के. वाघ शिक्षण संस्थेमध्ये भरती चालू होती. एक चांगली संधी चालून आली होती. किंबहूना तिरुपती बालाजीने ही संधी आपल्यासाठी दिली असं वाटलं आणि के.के. वाघ शिक्षण संस्थेमध्ये मुलाखतीसाठी गेलो. बघतोतर एक जागेसाठी ८३ जण आले होते. यात आपला नंबर कसा लागेल. अशी शंका मनात आली. पण प्रयत्न करायला काय हरकत आहे. प्रयत्नांती परमेश्वर म्हणून मी मुलाखत दिली. कोणताही वशिला न लावता के.के. वाघ शिक्षण संस्थेत त्या रिक्त पदासाठी माझी निवड झाली. ८३ जणांमधून मी एकटा त्या पदासाठी निवडला गेलो. मला वाटतं हे सगळं करण्यामागे देवाचा काहीतरी उद्देश असावा. कारण मी तिरुपतीला मागणी करतो काय? आणि मला ८३ जणांन मधून नोकरी मिळते काय? हा योगायोग म्हणावं की संचित. बाई नानांच्या पुण्याईचं फळ! समजत नव्हतं. खूप आनंद झाला. मिळणारा पगार हा क्रॉम्पटन ग्रिव्हस कंपनी पेक्षा कमी होता पण स्थिरता होती. जीवावर बेतणारा प्रवास नव्हता की ना कसली धावपळ सगळं एका ठिकाणी होत आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, जे काम मला अगदी लहानपणा पासून आवडायचं तेच काम करण्याची संधी पून्हा स्वतःहुन चालून आली होती. शाळेत असताना पूढच्या वर्गाच्या मुलांना शिकवायचो अगदी लहानपणापासून मला अध्ययनाची आवड होती. प्राथमिक वर्गात शिकवलं आता इंजिनिअरींगच्या मुलांना शिकवणार होतो. आवडणारं काम जर मिळालं तर माणूस मन लावून काम करतो. ते कामही चांगल्या प्रकारे होतं. काळाचं चक्र मोठं विचित्र असतं. भविष्याचे संकेत अगोदरच देत असतो. मलाही संकेत मिळेल की नाही या बाबात मात्र पूर्णतः अनभिज्ञ होतो. आता ही नोकरी मिळाली. आपल्याला हवी तशी, शिवाय इंजिनिअरींग कॉलेज मध्ये कामाला म्हटल्यावर लोकांचा आपल्याकडे बघण्याचा दृष्टीकोनही बदलेल.

क्रॉम्पटन कंपनी सुद्धा काही वाईट नव्हती पण सतत प्रवास

घरच्यांपासून लांब राहणे, बाहेर कशाची शास्वती नाही. क्रॉम्पटनपेक्षा आपल्याला पगार कमी मिळणार पण शांती तर मिळेल घरी जाऊन. प्रज्वलला वेळ तर देता येईल, गावात चारचौघांशी संवाद साधता येईल. मन मोकळं करता येईल आणि शिवाय इंजिनिअरींग कॉलेज असल्यामुळे येणाऱ्या नवीन तंत्रांची माहिती मिळेल, अपडेट राहता येईल. म्हणून पैसा हा दुय्यम ठेवला. गरजा कमी कराव्या लागतील. करु की, "कुछ पाने के लिए कुछ खोना भी पडता है।" ह्या प्रमाणे क्रॉम्टनला राजीनामा दिला आणि के.के. वाघ मध्ये हजर झालो. लासलगांव वरुन सकाळी सहाची गाडी पकडावी लागे आणि संध्याकाळी पून्हा नाशिक ते लासलगाव हा प्रवास होऊ लागला. माझी धावपळ व्हायची त्या गोष्टीला मी कधीच घाबरलो नाही. बाई-नाना यांची काळजी वाढत होती. आपला मुलगा एवढी धावपळ करत कामाला जातो, रोजचा प्रवास, त्यातून प्रवासात काय झालं म्हणजे? आईचं काळीज हे आपल्या मुलासाठी सश्यासारखं असतं ती माझी धावपळ पाहून हळहळायची. कसे बसे एक त दोने महिने कामाला लागून झाले असतील. बाई नाना माझ्याशी गप्पा मारत बसले होते. प्रज्वल तीन महिन्यांचा होता. नानांच्या मांडीवर लोळत होता. बाई ने मनावर काळीज ठेवून विषय काढला. दादा काम कसं चाललयं? जाण्यायेण्याची धावपळ होत असेलं. मी मानेने होकर भरला आणि पूढे म्हणालो ती तर थोडसे तर होणारच! आता सवय झाली या धावपळीची. एक काम कर तु नाशिकला का राहत नाही? आता तुझी काळजी करायल ज्योती आहे. तु नाशिकला तुला परवडेल अशा ठिकाणी घर भाड्याने घे आणि तुझा संसार कर.

मला कळेना बाई अचानक असं का बोलते आहे आणि नानांनी त्याला संमती दिली. बघ दादा तुझी होत असलेली धावपळ नाही बघवत रे! त्यामुळे मी तुला हा सल्ला दिला आणि गाव सोडलं तर काहीतरी वेगळं करता येईल. हे बघ कुणालाही आपली मुलं आपल्यापासून लांब रहावी असं वाटत नाही. मग त्याची होत असलेली ओढातान पाहून काळीज फाटतं त्यापेक्षा तु आपला वेगळा नाशिकला रहा. हे बोलत असताना बाईचा कंठ दाटून आला होता. बाईने स्वतःला सावरलं होतं. नाना प्रज्वलला थापटत होते.

निःश्वास टाकत बघतो काय करायचं ते असं म्हणत मी बैठक मोडली आणि घरात जाऊन अंथरुणावर पडलो. सकाळी उठून कामावर जायची धावपळ होती. घरात सगळेच शांत होते. ज्योती घरची कामं आवरत होती. ती ही शांतच होती. वेगळं रहायची कल्पना तीला ही आवडली नव्हती पण

काय करणार नाईलाज होता. बाई नानांच्या पूढे ती बोलू शकत नव्हती. शेवटी निघतांना बाईला म्हणालो, "तु सांगितलं ना तस्सच होणार, आज पासून मी घर शोधायला लागतो!" अस्सं म्हणत कामावर निघून गेलो. कामावर सहकाऱ्याला घराविषयी चौकशी केली जेल रोड परिसरात घर मिळालं. पसंत पडलं, घरभाडं ठरलं, बाई नानांना घरी जाऊन सांगितलं आणि आमच्या वेगळ्या संसाराची बांधा बांध सुरु झाली. सामान लासलगाव वरुन नाशिकला आणण्यासाठी गाडी ठरवली गेली. सामान गाडीत भरलं गेलं आणि त्याच गाडीत मी, ज्योती, प्रज्वल, बाई नाना आणि एकनाथ अनिल बसले. बाई नाना माझा संसार लावनू पून्हा लासलगाव परत येणार होते. प्रज्वल अवघ्या तीनच महिन्याचा होता. गाडी नाशिकला जीथे राहणार त्या ठिकाणी पोहचली. सामान उतरविले गेले. त्या वन रुम किचनच्या घरात सामानाची आवरा सावरी झाली आणि बाई नाना लासलगावला जाण्यासाठी निघाले. त्यांना लासलगावला जाण्यासाठी गाडी संध्याकाळी होती. त्यांना गाडीत बसवून देण्यासाठी मी स्टेशनवर गेलो. बाई नाना गप्प गप्प होते. काय बोलावं कुणालाही कळत नव्हतं. गाडी येण्याची अनांसमेंट झाली. बाईने माझा हात घट्ट धरला आणि म्हणाली, "नोकरी ही लक्ष्मी असते तीला लाथ मारायची नाही." हे सांगताना तीच्या अश्रूंचा बांध फुटला. मलाही भावना अनावर झाल्या होत्या. मी बाईला म्हणत होतो तु माझ्या सोबतच रहा. बाई म्हणाली गावाला खूप कामं आहेत जी माझ्यामुळे होणार नाही. अनिल, एकनाथ माझ्यासोबत नाशिकला होते. मी एखाद्या नांदायला सासरी जाणाऱ्या नववधू सारखा त्यादिवशी पडून होतो. डोळ्यातून अश्रू घळाघळा वाहत होते. रस्त्याने येणारे जाणारे माझ्याकडे पाहत होते. मला कशाची पर्वा नव्हती. मला फक्त माझी आई हवी होती. कारण माझ्या सर्व सुखाचा आधार ती होती. ती माझी होती आणि मी तीचा होतो. तीचं सुख दुःख तीने मला सांगितल होतं. मी इथे आणि ती तीथे गावाला हा मायलेकांचा विरह मला असह्य झाला होता. मी हमसून हमसून रडत होतो. माझ्या प्रत्येक दुःखात कष्टात ती समान वाटेकरी होती. माझे ओघळणारे अश्रू आपल्या हाताने पुसत मला शब्दांचा आधार देत बोलली, दादा आतापर्यंत मोठ्या कष्टाने हे सर्वकाही मिळवलं, आता तुला तुझं वेगळं आभाळ तयार करायचं आहे. आरे मोठ्या झाडाच्या सावलीत छोटी रोपं टिकत नाही. त्यांना जर मोठ वहायच असेल तर त्यांना उन्हातच उभ रहावं लागते. परिस्थिती, संकटाचे चटके सोसूनच माणूस मोठा होतो. जर तुला दुसऱ्याला सावली द्यायची असेल तर तुलाही उन्हात उभं राहवं लागेल. मायेचा पदर विसर

अस म्हणणार नाही, पण स्वतःच्या अस्तीत्वासाठी मायेची सावली सोड असं नक्की सांगेल. अस्स म्हणत बाईने मला मिठी मारली. बाईच्या त्या मिठीत आधार होता. आणि माझ्या बद्दल असलेला विश्वास होता. गाडी प्लॅटफॉर्मवर लागली. स्टेशनवरची माणसं गाडीत बसायची घाई करत होते. मी बाई नानांच्या पाया पडलो. मला मनभरुन आशिर्वाद देत गाडीत चढले. गाडी स्टेशनवरुन निघाली. बाई मला गाडीच्या खिडकीतून डोकावून पहात होती. आपले अश्रूंना पदराला पूसत ती म्हणाली, काळजी घेरे स्वतःची आणि सगळ्यांची. आई गाडीत बसून माझ्या पासून लांब चालली होती. पण ती फक्त शरीराने, मनाने मात्र ती कायम जवळ होती. त्या लांब जाणाऱ्या गाडीला मी नजरेआड होईपर्यंत पाहत होतो. गाडी नजरेआड गेली पण बाई मात्र मनानं कायमची जवळच माझ्या हृदयात तशीच राहिली.

***

# वेध शैक्षणिक कार्याचा

एखादी जबाबदारी जेंव्हा पूर्णपणे आपल्यावर पडत नाही तोपर्यंत आपण त्याकडे गांभिर्याने बघत नाही. आपण घेतलेल्या निर्णयाचे सर्वस्वी आपणच जबाबदार असतो. त्यातून मिळणाऱ्या फलप्राप्तीचे आपणच मालक असतो. आता संपूर्ण संसाराची जबाबदारी माझ्यावर येऊन पडली होती. त्यावेळेस मिळणारा पगार आणि घरखर्च याचा ताळमेळ बसवतांना नाके नऊ यायचे अर्धा पगार घर भाड्यात निघून जायचा. मग मुलाच दूध, भाजीपाला, किराणा, या सारख्या वस्तू आल्या आणि रोजच जाणं येणं यात मात्र तारेवरची कसरत व्हायची. यावर उपाय म्हणून आम्ही घरी ट्यूशन चालू करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी माझ्या मावस सासू नाशिकरोडला शाळेत शिक्षिका होत्या. त्यांच्या मदतीने एका शाळेत जाऊन ट्यूशन विषयी माहिती दिली. त्यातून ३ जण ट्यूशनला आली. ट्यूशन फी महिना २० रु. ठरविला गेला. मी मुलांना गणित, विज्ञान हे विषय शिकवायचो. तर ज्योती, भाषा विषयक विषय शिकवायची. त्या ट्यूशनचा संसाराला  हातभार लागला. बघता बघता ३ चे ३० मुलं झाले. मी कामावर जाण्या अगोदर आणि कामावरुन घरी आल्यावर ट्यूशन घ्यायचो. आता जरा संसाराला आधार मिळाला होता. रेणूका क्लासेसची कोणतीही पाटी न लावता क्लासमध्ये विद्यार्थी येत होती. याच दरम्यान एकनाथ आणि अनिल काही दिवसांसाठी नाशिकलाच होते. अनिलला पुढंचं शिक्षण घ्यायचे होतं आणि एकनाथा कामानिमित्त आला होता. अनिल कॉलेज सुटल्यानंतर बाजारात कांदे विकायचा आणि एकनाथ एका किराणा दुकानात कामाला लागला होता. दोघांचीही मला मदत व्हायची. मी ही अनिल सोबत वेळ मिळाल्यावर बाजारात कांदे विकायला जायचो. शिक्षक असून बाजारात कांदे विकण्यात मला कोणतीही लाज वाटत नव्हती. कारण कामाची मी कधीही लाज बाळगली नाही. मी मिळेल ते काम करत गेलो. के.के. वाघ ला सुद्धा मी कधी कामाची लाज बाळगली नाही. पडेल ते काम केलं. वरिष्ठांनी सांगितलेलं प्रत्येक काम मी केलं. अगदी निष्ठेने केलं. त्यामुळे वरिष्ठांचा विश्वास संपादन करता आला. माझ्या या १८ वर्षाच्या सेवेत मला सांगितलेलं काम मी कधी पूर्ण केले नाही असं कधीच झालं नाही. मला मिळालेलं काम मी अत्यंत प्रामाणिकपणे आणि निष्ठेने केलं. या संपूर्ण सेवेतील एकच काम असं केलं की ती पूर्ण झाल्यानंतर माझंच मला वाईट वाटलं. त्याचं असं झाल की आमच्या लॅबच्या बाहेरील बाजूवर मधमाश्यांनी पोळं केलं होतं. अनेक दिवस ते तसच होतं. बघता बघता ते मधमाशांचं पोळ मोठं

झालं आणि एके दिवशी एक मधमाशी लॅब मध्ये अभ्यासाला आलेल्या एका विद्यार्थीनीच्या कानात घुसली. आमची सगळ्यांची धावपळ झाली. त्या मुलीला घेवून दवाखान्यात गेलो. त्यावर इलाज केला सगळं काही व्यवस्थित झालं. दुसऱ्या दिवशी आमचे वरिष्ठ लॅबच्या दिशेने आले. लॅबची पाहणी करत असता त्यांचं लक्ष त्या मधमाशांच्या पोळाकडे गेलं आणि जाता जाता मला सांगितलं कोल्हे सर त्या मधमाशांचं पोळं आपल्याला काढावं लागेल. आजच्या आज त्यावर कार्यवाही करा. मी सांगितल्या नूसार मधमाशांच पोळं कसं काढाव याचा विचार करू लागलो. पेस्ट कंट्रोल वाले काढतात कळल्या बरोबर. त्यांच्याशी संपर्क साधला आणि आज रात्री ९ वा. पोळं काढायचं असं ठरलं. कारण रात्री काढल्यावर कुणालाही त्रास होणार नाही म्हणून सगळी तयारी करण्यात आली. रात्री कामावर असणाऱ्या सिक्यूरीटी वाल्यांशी सुद्धा बोलणं झालं आणि घरी जावून संध्याकाळी पून्हा कॉलेजला त्या मधमाशांच्या पोळं काढण्याचा कामासाठी पेस्ट कंट्रोल वाल्यांसोबत हजर झालो. पेस्ट कंट्रोल वाल्यांनी त्यांच्या औषध फवारणीच काम केल. मधमाशांचं पोळं काढलं गेलं. कामगिरी फत्ते झाली आणि मी माझ्या घरी निघून गेलो. दुसऱ्या दिवशी कामावर रुजू झालो. लॅब खोली बघतोतर हजारोंच्या संख्येने मधमाशा मरुन पडल्या होत्या. आपला जीव वाचवत काही मधमाश्या उडत उडत इमारतीतमध्ये आल्या होत्या. त्या काही वाचल्या नाही. मृत मधमाशांचा सडा सर्वत्र पडलेला होता ते दृश्य पाहून स्वतःची लाज वाटायला लागली. आपण अनेक मुक्या मधमाशाच्या मरणाला कारणीभूत ठरलो. हा विचार डोक्यात आला अन् वाईट वाटलं. मी ह्या सर्वांच्या मृत्यूला कारणीभूत होतो. कदाचित मी ते काम केलं नसतं तरी चाललं असतं पण हा काम करताना जे काही घडलं ते खूप वाईट घडलं होतं.

शैक्षणिक क्षेत्र म्हटलं म्हणजे कामाचा बोजा हा आला. मी १८ वर्ष पडेल ते काम स्विकारलं. कामात कधी हाईगई केली नाही. हात राखून कधी काम केलं नाही. प्रत्येक वेळी मला नवीन अनुभव यायचा. खरं पाहता मला शैक्षणिक क्षेत्राची आवड होतीच अगदी ३ रीच्या वर्गात असतांना. ४ थीच्या मुलांना गणित शिकवलं, पेपर तपासने ट्यूशन घेणे हे सर्व माझ्या भविष्याचे संकेत होते. हे मला आता कळतयं. आपल्या समोर घडत असलेली घटना आपल्याला भविष्याचे संकेत देत असते. अशा एका घटनेने मला संस्थापक होण्यास प्रेरीत केले. के.के.वाघ म्हणजे नावाजलेली संस्था आहे. इंजिनिअरींग क्षेत्रात तिचं स्वतःच वेगळं स्थान आहे. अशा संस्थेत विविध

कार्यक्रम वारंवार घडत असतात. एकदा असाच एक कार्यक्रम संस्थेच्या वतीने घेण्यात आला होता. कॉलेजच्या सेमीनार हॉलला हा कार्यक्रम होणार होता. हॉल सज्ज झाला सर्व विद्यार्थी शिक्षक, कर्मचारी, यांनी हॉल तुडूंब भरला होता. मान्यवरांच आगमन झालं, स्वागत सत्कार झाला. मीही त्या कार्यक्रमाला उपस्थित होतो. त्या गर्दीतून वाट काढत मी थोडा पुढे सरकलो. एक प्यूनला सांगून मला बसण्यासाठी स्टूल मागविला. व्यासपिठाच्या अगदी समोरील बाजूच परंतू शेवटच्या रांगेत मी बसलो होतो. व्यासपिठ माझ्यासमोर अगदी सरळ रेषेत के.के.वाघ संस्थेचे अध्यक्ष बसलेले होते. आम्ही दोघं एका सरळ रेषेत होतो. मी भाऊंना (संस्थापकांना) एक टक बघत होतो आणि विचार करत होतो. माझ्या समोर बसणारी ही व्यक्ती अगदी साधी होती. माझ्या सारखी दोन पायाची, दोन हाताची, एक डोक्याची, नाक, डोळे, सारखी असणारी तरी सुद्धा ह्या व्यक्तीला एवढा मानसन्मान कसा मिळतो. आलेली मान्यवर मंडळी ही सुद्धा मोठ्या पदावर काम करतात. त्या माणसाशी बोलतांना किती आदबीनं बोलतात का? कारण ते संस्थेचे अध्यक्ष आहेत. त्यांनी स्वतःच्या कार्याने त्या संस्थेत स्वतःच अढळं स्थान निर्माण केलं आहे. मग मी का नाही स्वतःच अढळ स्थान निर्माण करु शकत ? आपणही असंच एक अढळ स्थान मिळवू शकतो का? ध्रुव ताऱ्याला जसं स्वतःच अढळ स्थान आहे तसं अढळ स्थान मलाही हवं होतं. आणि बस्स त्या दिवशी मनात निश्चय केला कितीही काही झालं तर आपणही स्वतःच अढळ स्थान निर्माण करायचं आणि मानसन्मानाने आयुष्य घालवायचं. आणि त्यावेळेस घेतलेल्या निर्णयाने आज मानवधन संस्थेत मी स्वतःच अढळ स्थान निर्माण केलं आहे. 'हाती घ्याल ते तडीस न्या ह्या' तत्त्वानूसार मी मी हाती घेतलेलं काम पूर्ण करत आलो.

मन, विचार, ही माणसाची खूप मोठी ताकद आहे. विचार करण्याची शक्ती देऊन परमेश्वराने इतर प्राण्यांमध्ये माणसाला श्रेष्ठत्व बहाल केलं आहे. नूसता विचार करुन आपण काहीही साध्य करु शकत नाही. त्यासाठी त्याला कृतीची जोड हवी. प्रयत्नांची पराकाष्ठा हवी. प्रयत्न केला तर आपणही आपल्यला जे हवं ते मिळवू शकतो आणि अंधाऱ्या आयुष्याला प्रकाशित करण्यासाठी स्वतःचा प्रकाश निर्माण करु शकतो.

***

# मानवधन संस्थेचा जन्म

आपलं भविष्य आपणच घडवायचं असतं, 'दे हरी खाटल्यावरी' असं म्हणून आपण कोणतच कार्य करु शकत नाही. आपल्या हातावरच्या रेषा आपलं भविष्य सांगत नाही तर हातातील काम करण्याची ताकद आपलं भविष्य घडवित असते. स्वतःत जर आत्मविश्वास असेल तर आपण सुद्धा स्वतःच भविष्य स्वतः चं लिहू शकतो. मी ही स्वतःचं भविष्य स्वतःच लिहिल आहे. एकदा माझ्या सहकाऱ्याला मी म्हणालो होतो, 'वयाच्या २९ व्या वर्षी मी स्वतःच घर घेणार' त्यावेळेस ते मला हसले होते आणि झालंही तसचं मी २९ व्यावर्षी स्वतःचं घर घेतलं. घर घेताना खिशात साधी दमडीही नसताना मी घर घेण्याचं ठरवलं होतं. पटेल बिल्डरने चंपा नगरीतील बांधलेला रो-हाऊस मला पसंत पडला होता. त्याच्याशी बोलणी करण्यासाठी मी व माझा मित्र गेलो. बोलणी झाली घराचा भाव ठरला २.४५ लाखाला ते घर मिळत होतं. बोलणी झाली पण टोकन द्यायला पैसे नव्हते. मित्राने त्या वेळेस टोकणचे पैसे दिले आणि थोडे थोडे जमा करुन मी पैसे देत गेलो. ट्यूशनही चालूच होती. घर घेतल्यामुळे आर्थिक चणचण अधिक भासू लागली. आम्ही दर शनिवार, रविवार लासलगावी बाई नानां कडे जात असू. एकवेळेस बाई नानांकडे लासलगाव जायचं होतं. पण गाडी भाड्याला पैसे नव्हते. मला गावी जाण्याची ओढ लागली होती. काय करावं ते सुचत नवहतं तेवढ्या दारावरती एक महीला आली. ट्यूशनच्या विद्यार्थ्यांची पालक होती. तीने मला तीच्या दोन मुलांची ट्यूशन फी दिली आणि माझी गावी जाण्याची इच्छा पूर्ण झाली. अगदी अंर्तमनापासून जर तुम्ही तुमच्या ध्येयाच्या दिशेने जात असाल तर देव सुद्धा तुमचा  तुमच्या प्रवासातील साथीदार होतो.

अनेक परिस्थितीवर मात करत स्वतःला सिद्ध करण्याचा मी प्रयत्न करत होतो. मिळेल ते काम करुन स्वतःची आर्थिक गरज भागवत होतो. ट्यूशन चालू होती. गोरगरीब घरातील मूलं येत होती. त्यात अनेक जाती धर्माची विविध पंथांची, विविध स्तरातील मुलं येत होती. पण त्यांच्यात कधीच भेदभाव केला नाही. ती सर्व मुले समान होती. तो मुलगा गरीब आहे, हा मुलगा श्रीमंत असं म्हणून त्यांना शिकवण्यात कधीच कोणता भेद केला नाही. उलटपक्षी जी मुलं गरीब आहेत त्यांना फी न घेता शिकवलं. पण मनात नेहेमी काही तरी धग धगत होतं. आपण समाजाच काहीतरी देणं लागतो पण ते समाज हिताचं कार्य आपल्या हातून कसं घडावं, काय करावं, मोठी संस्था आज हवं ते करु शकते, असं काय आहे त्यांच्याकडे वेगळं

आहे? याचा शोध घेत होतो. मलाही संस्थापक व्हायचं होतं हे मनोमन ठरवून मोकळा झालो होतो. पण कोणती संस्था, ज्याचा मी संस्थापक होईल. काय काम करेल ही संस्था, नाव काय असेल संस्थेचं, अशा अनेक प्रश्नांच्या गर्गतेत मी होतो. ट्यूशन चालू होत्या. ज्योती भाषा विषय शिकवायची पण भाषेतील काही धडे मला खूप आवडायचे. ते धडे मी मुलांना शिकवत असे. असाच एक पाठ इ. नववीच्या भाषा पुस्तकात होता जो मला खूप खूप आवडायचा. तो शिकवण्याची मज्जा कुछ औरच होती. तो पाठ होता मानवधन. मानवी नितीमुल्यांवर आधारित. असा तो पाठ होता. मानव आयुष्य जगताना त्यांनी कोणकोणत्या मुल्यांची गुणाची जोपासना करावी म्हणजे यशस्वीरित्या आयुष्य जगाता येत. मानवाना सुसंस्कारक्षम करणारा तो पाठ मानवी गुणांची जोपासना करणारा होता. हा पाठ शिकवताना मी अंर्तमुख व्हायचो. नकळत मुखातनू तो पाठ आंतर्मनात जायचा आपण ह्या नितीमुल्यांचा स्विकार करावा आयुष्यात एक यशस्वी मार्ग स्विकारावा त्यापाठाचं नाव हे सुद्धा त्या पाठाला साजेस होतं मानवधन. भौतिक धनापेक्षा माणसाने नितीमुल्यांचा व गुणांचा आंगिकार करु ते हे त्यांच खरं धन होय. भौतिक धन हे नश्वर असतं. ते कधी ना कधी संपणार. नितीमुल्यांच तसेच मानवी गुणांचं धन हे मानवा सोबत कायम असतं. अगदी अंतापर्यंत ते त्याला साथ करतं. मानवधनात त्याग, निष्ठा, कर्तृत्व, वक्तृत्व, बुद्धीमत्ता व्यवहार चातुर्य, विवेक, ध्येय, दूरदृष्टी इत्यादी मुल्य मानवाने अंगिकारले की तो यशस्वी होणारच.

असा हा मानवधन पाठ मला शिकवायला खूप आवडायचा. हा पाठ शिकवत असताना के.के. वाघ चे संस्थेचे अध्यक्ष डोळ्यासमोर येवू लागले. खरचं हे सर्व गुण त्यांच्यात होते ते म्हणूनच मोठ होते मान्यवर त्यांच्या परिचयाचे, त्यांच्या अनेक ओळखी आहेत. त्यांनी अनेक माणसांशी संवाद साधत हे मानवाचे मानवधन संपादन केलं आहे आणि अचानक डोक्यात विचार आला. असचं मानवानं प्रग्लभ करणारी माणसाला माणसाशी जोडणारी संस्था आपण स्वतः स्थापन करु जी खऱ्या अर्थाने मानवधनाचे विचार सर्वसामान्यापर्यंत पोहचवेले आणि असंख्य लोकांना कार्य करण्यास प्रेरित करेल. बस्सं ठरवलं आपण संस्था स्थापन करायची तीचं नाव असेल 'मानवधन' माझा स्वभावच मुळात जिद्दी. मला जे हवं असतं ते मी मिळवतो. त्यासाठी वाट्टेल ते करण्याची माझी तयारी असते. मी ठरवल्या नूसार संस्था रजिस्ट्रेशनच्या कामाला लागलो. त्याच बरोबर ट्यूशन आणि सामाजिक

कार्य चालूच होतं. मानवधन संस्था जर मोठी करायची असेल तीचे विचार जर घराघरा पर्यंत पोहचवायचे असतील तर सर्वप्रथम मी आजूबाजूची माणसं गोळा केली. मी राहात असलेल्या परिसरात विविध सांस्कृतीक कार्यक्रम घेऊ लागलो. सण, उत्सव, साजरे केले, वयोवृद्धांच्या सहली काढल्या. त्याच्यांसाठी विविध उपक्रम व कार्यक्रम घेतले. समाज प्रबोधनासाठी व्याख्याने आयोजित केले. या सारखी अनेक कामं चालू होती. काही दिवसात संस्था रजिस्टर झाली. आता संस्थेला कायदेशीर रित्या मान्यता मिळाली होती. याचा आनंद म्हणून संस्था उद्‌घाटनाचा एक मोठा कार्यक्रम करावा अशी इच्छा मनात आली. त्यानूसार मी उद्‌घाटनाचा कार्यक्रम आयोजित केला. त्यावेळेस घरातील काही मंडळींनी त्याला विरोधही केला. अरे संस्था चालवनं आपलं काम नाही. ते मोठ्या माणसांचं काम आहे. तुला जर काही त्रास झाला तर? न जाणे एखादे संकट निर्माण झाले तर? त्या वेळेस आम्ही मात्र तुला कोणतीही मदत करणार नाही. असं जवळच्या नातेवाईक मंडळींनी स्पष्टपणे सांगितलं. नाराजी त्यांच्या बोलण्यातून स्पष्टपणे जाणवत होती. मी त्याकडे दुर्लक्ष केलं. कारण संस्था स्थापन करण्याचा निर्णय माझा एकट्याचा होता. म्हणजे त्याच्या परिणामाला मी एकटाच सामोरं जाणार होतो हे निश्चित. आपण घेतलेल्या निर्णयाच्या चांगल्या अथवा वाईट परिणामास जो निधड्या छातीने सामोरं जातो. तो खरा विजेता असतो. याचदरम्यान मी विजेता होणार हे पुस्तक वाचलं व एक ऊर्जा घेऊन कामाला लागलो. कारण चांगल्या परिणामाचा स्विकार करायला कुणीही घाबरत नाही. त्यावेळेस संस्थेच्या उद्‌घाटन कार्यक्रमाला ३ IS अधिकारी, तीनधर्मगुरु, तीन नगरसेवक, अशा तीन वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना एकत्र बोलवून संस्थेचे उद्‌घाटन केले. डिसेंबर महिन्यात हा उद्‌घाटनाचा कार्यक्रम झाला आणि जानेवारीत २६ तारखेला म्हणजे प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी मला कन्यारत्न प्राप्त झाले होते. संसाराच्या वेलीवरली हे दुसरं फुलं माझा संसार अधिक सुगंधीत करण्यासाठी उमलले होते. ही त्या माझ्या फुलाचं नाव प्रांजल...! यावर्षाची सुरुवात व शेवटही गोड होता.

आयुष्यातल्या प्रवासात आनंदाचे क्षण राहतात पण त्या आनंदाच्या क्षणात जे गुरफटून जातात जे अंधाराकडून प्रकाशाकडचा प्रवास पूर्ण कधीच करु शकत नाही.

***

# शाळा सुरू झाली

चांगल्या कार्याला जर आपण पुढे घेऊन जात असू तर नकळत अनेक हात येऊन आपल्याला मदत करत असतात. सकारात्मक विचार आणि विश्वास ह्या गोष्टीने जर कार्यास आरंभ झाला तर त्याचा शेवट गोड होतो. मी ही सकारात्मक विचार घेऊन संस्था स्थापन केली आणि आत्मविश्वासाच्या बळावर काम करत राहिलो. माझ्या कामाने अनेक लोक प्रेरित झाले. घरी माझं ट्यूशन चालू होती. तेंव्हा गौतम पवार नावाचे एका पालकाची आणि माझी भेट झाली. त्यांनी कार्य जवळून जाणून घेतलं आणि मला शाळा उघडण्याचा सल्ला दिला. तुम्ही एवढं चांगल काम मुलांसाठी कार्य करता व संस्थेच्या माध्यमातून करत आहात तेव्हा संस्थेच्या अंतर्गत शाळा का चालू करत नाही? तुम्हांला त्याबाबत लागणारे सर्व कार्यालयीन बाबतीत मी पूर्ण मदत करेल, मी जिल्हा परिषद मध्येच कामाला आहे. तेव्हा त्यांच्या या प्रस्तावाचा विचार केला आणि म्हणालो, हे बघा मला शाळा सुरु करायला नक्कीच आवडेल शैक्षणिक क्षेत्र हे माझ्या आवडीच क्षेत्र आहे. त्यात काम करायला मी कशाला नाही म्हणेल आणि त्या माध्यमांत मला अनेक सामाजिक कार्यही करता येईल. पण आर्थिक बाबींच काय त्या मी कशा पूर्ण करणार शाळेसाठी. पैसा कसा उभा करणार? सगळी सोंग आणता येतात पण पैशाचं सोंग नाही आणता येत.

यावर ते गृहस्थही थोड्यावेळ शांत बसले आणि पून्हा सकारात्मक पवित्रा घेत ते म्हणाले प्रयत्न करायला काय हरकत आहे. प्रयत्न हा शब्द मला खूप आवडणारा आहे. कारण प्रयत्नांची सुरुवात यातच आपला अर्धा विजय असतो. प्रयत्न म्हणजे कार्याला सुरुवात. ते गृहस्थ म्हंटले होते ते खरं आहे. आपण प्रयत्न करायला काय हरकत आहे. पण शाळा सुरु करणार कुठे? आपल्या आजूबाजूला अनेक शाळा आहेत. त्यात आपला निभाव कसा लागेल? असे अनेक प्रश्न डोक्यात घेर घालत हाते. एकदिवशी पाथर्डी फाट्याकडे पाहुणा म्हणून आलो होतो. पाथर्डी परिसरात राहणाऱ्या एक मित्राने काही कामा निमित्त मला त्याच्या घरी बोलावलं होतं. मी त्याच्या घरी गेलो आमच्या कामाच्या विषयी गप्पा चालू होत्या. गप्पा मारता मारता तो मित्र सारखा घड्याळ्याकडे पाहायचा आणि आपल्या पत्नीला म्हणायचा, अजून नाही आले? असं एकदा दोनदा केलं. न राहून मी त्यांना विचारलं कुणी पाहूणे येणार आहेत का? अरे मुलं अजून शाळेतून आले नाही.

त्यांची वाट बघतो आहे. ५:०० ला शाळा सुटते. एव्हाना यायला हवे होते! मी त्याला धिर देत म्हणालो अरे मग येतील आताशी ५:३० वाजले आहे! त्यावर त्यांची पत्नी आमच्या संभाषणात सामील झाली. माझ्या हातात चहाचा कप देत त्या वहिनी म्हणाल्या, त्याचं काय भाऊजी ह्या परिसरात जवळपास शाळा नाही. चांगल्या शाळा सर्व लांब लांब हायवेच्या पलिकडे आणि सध्याच वातावरण (सामाजिक) तुम्हाला माहितच आहे. किती खराब आहे ते. अशा या सर्व कारणामुळे आमची मुलं असुरक्षीत आहेत. म्हणून जो पर्यंत मुलं घरी येत नाही तो पर्यंत आमचा जीवात जीव नसतो. थोडा जरी उशीर झाला की भलते सलते विचार मनात येतो. काय करावं काही सूचत नाही. तो गरम चहा मला अधिक गरम जाणवला. मी अनेकदा जेलरोडला राहत असतांना मी अनेकादा जेलरोडला राहत असताना या परिसरात रस्ता ओलांडताना शालेय विद्यार्थ्यांचे अपघात झाल्याचे मी वृत्तपत्रातून वाचत होतो अनेक मुले देवाघरी गेले होते. अस्वस्थ मन विचार करू लागलं. या परिसरात शाळा हवी. मुलांच्या सुरक्षेचा विचार करता आपण जर शाळा इथे सुरु केली तर? अनेक पालकांचे मुलांच्या सुरक्षिततेचं ओझं हलकं होईल. बस्स मनोमन निश्चय केला आपण पाथर्डी परिसरात शाळा सुरु करु आणि त्यासाठी मी प्रयत्न करु लागलो. शाळा सुरु करायची म्हणजे सर्व प्रथम शिक्षक हवे. म्हणून पेपरला जाहिरात दिली. पण त्या जाहिरातीत फक्त माझा फोन नंबर होता. शाळेचा पत्ताच नव्हता. कारण शाळेसाठी अजून जागा भाड्याने घ्यायची बाकी होती. मग जाहिरातीत पत्ता कुठला टाकणार. जाहिरात दिली खरी पण मुलाखत घ्यायची कुठे हा विचार चालू असताना फोन वाजला. फोन उचलून मी हॅलो म्हटलं पलीकडून एका मुलीचा आवाज आला. ती म्हणाली, "पेपरला जाहिरात वाचली आणि तुम्हाला फोन केला आपली शाळा कुठे आहे. सांगाल का? मला मुलाखतीसाठी यायचे आहे. कधी येऊ" झालं का? आता काय कराव कुठे बोलवाव काही सांगता येत नव्हतं. तुम्ही थोड्या वेळात फोन करा कुठे आणि कधी यायचं ते सांगतो. असं म्हणून फोन ठेवला. ज्योतीची मावशी इंदिरा नगर भागात राहत असे. त्यांची परवानगी घेऊन त्यांच्या इंदिरानगरच्या घरात मुलाखत घ्यायचं ठरवल. मुलाखत वेळ ही ठरली. ठरल्याप्रमाणे ती मुलगी मुलाखतीला आली. तेव्हा त्यांच्या फ्लॅटच रंगरंगोटीच काम चालू होतं. बसायला जागाही नव्हती आणि बसण्यासाठी काही साधनही नव्हतं थोडी शोधाशोध केली तेव्हा एक मोठा डब्बा नजरेस पडला. मुलाखती आलेल्या त्या मुलीला

म्हणजे त्या शिक्षिकेला बसायची व्यवस्था केली. मुलाखतीला सुरुवात करताना सर्वप्रथम तीने माझ्या हातात तिच्या कागद पत्रांची फाईल दिली त्या कागद पत्रावर नजर फिरवत मी तिला तीचं नाव विचारलं. अत्यंत विनम्रपणे नाव सांगत मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं दिली. मलाही वाटलं शिक्षकात नम्रपणा हा असावा. हा गुण त्या मुली ठासून भरलेला होता. मला विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी अशीच शिक्षिका हवी होती. उभ्या नसलेल्या शाळेतील ती पहिली शिक्षिका होती. पूनम जाधव तिच नाव. आता प्रश्न आला पगाराचा. तेव्हा मी तीला माझी सर्व हकिकत सांगितली आणि तीला म्हणालो मला तुमच्या कडून फक्त दोनच गोष्टी पाहिजेत. एक म्हणजे प्रामाणिकपणा आणि दुसरी म्हणजे कष्टाळू वृत्ती. आपल्या कामाशी आपण जर प्रामाणिक असलो तर काम अगदी व्यवस्थित होतं. कष्टकरण्याची जर वृत्ती असेल तर आपण वाळवंट सुद्धा हिरवंगार करु शकतो. तुमच्या ह्या दोन अपेक्षा मी नक्कीच पूर्ण करेलं असं सकारात्मक उत्तर मिळाल्यानंतर जुजबी पगारात ती कामाला तयार झाली आणि माझ्या दुसऱ्या शिक्षिका ज्योतीची बहीण होती. तीच ही नूकतच ग्रॅज्यूशन पूर्ण झालं होतं. ह्या दोन शिक्षिकेच्या जोरावर मी शाळा सुरु करणार होतो. सर्वप्रथम ह्या दोघींना पाथर्डी परिसरातील प्रत्येक घरांचा सर्वे करायला लावला. घरात एकूण किती मुले आहेत. घरातील व्यक्ती काय करतात वगैरे वगैरे आणि आपल्या शाळेची माहिती द्यायला लावली. पण प्रत्येक जण त्या दोघींना एकच प्रश्न विचारायचा तुमची शाळा कुठे? लवकरात लवकर शाळेच्या जागेचा प्रश्न सोडवायला हवा होता. शाळेसाठी घर भाड्याने घ्यायचे, त्याचे भाडे, त्याचे डिपॉझिट हे सगळं आलं व मग पैसा कसा उभा करायचा? विचार करता कामला माझा पी.एफ. आठवला. मुलांच्या भविष्यासाठी जो पैसा माझ्या पगारातून जमा होतो तो पैसा माझ्या दोन मुलांसाठी न वापरता शाळेत प्रवेश घेणाऱ्या मुलांसाठी वापरणार होतो. पी.एफ. मोडला हाती काही रक्कम आली आणि पाथर्डी फाटा येथे एक वनरुम किचनचे घर शाळेसाठी भाड्याने घेतलं.

के.के. वाघ मध्ये नोकरी सुद्धा चालूच होती. कामावरुन सुटल्यावर शाळेच्या कामात लक्ष्य घालत होतो. शाळेचा जागेचा प्रश्न सुटला होता. आता फक्त शाळेत विद्यार्थी येण्याची वाट पहात होतो. शाळेच्या नावाची पाटी सुद्धा अजून लावली नव्हती. आम्ही रोज पालक व शाळेत प्रवेश घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची आतुरतेने चातका सारखी वाट पाहत असू. अनेक

लोक शाळेच्या दिशेने येताना दिसत. प्रवेश घेण्यासाठी येत आहे असे वाटे पण जवळ येताच त्यांचा मार्ग बदलायचा. निराशा व्हायचो पण हार कधी मानली नाही. एके दिवशी कामावरुन मी शाळेत आलो शाळेच्या बाहेरच मला एक जोडपं भेटलं. आणि मला शाळेचा पत्ता विचारु लागले मी त्यांना आत बोलवलं पण त्यांना बसवणार कुठे. बाजूच्यांकडून तीन खूर्च्या मागून आणल्या दोन त्या दोघांना दिल्या आणि एका खुर्चीवर मी बसलो. ते माझ्या हालचाली अत्यंत बारकाईने टिपत होते. प्रश्नांकित नजरे ने माझ्याकडे पाहत होते. त्यांना शंका वाटू लागली. इथे खरंच शाळा भरणार आहे की हा माणूस आपल्याला फसवतो. अशा विचाराने ते अवघडून बसले होते. त्यांच्या मनातील चलबिचल माझ्या लक्षात आली. मीच विषयाला हात घालत संवादाला आरंभ केला नवीनच शाळा सुरु करतो अजून सामान आणायचा वगैरे वगैरे गोष्टी त्यांना सांगत गेलो. त्यांना माझं म्हणन पटवून देत गेलो. त्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं देत गेलो. हळूहळू त्यांचा विश्वास संपादन करत गेलो. त्यांच्या पासून मी काहीही लपवून ठेवलं नाही. जे सत्य आहे ते सर्व सांगितलं. त्यांचा माझ्यावर विश्वास बसत होता. मानवधन संस्था मुलांना कशा स्वरुपाने घडवेल हे आदर्श भारत उभा करण्यासाठी मुलांमध्ये कोणत्या गुणांची जोपासना केली जाईल हे सर्व त्यांना समजवून सांगत होतो. हे सांगत असताना केवळ सांगायचं म्हणून सांगत नव्हतो. तर ते मला सत्यात उतरावयांच होतं. त्यासाठी मला अधिक परिश्रम घ्यावे लागणार होते. परिश्रमाला मी कधीच घाबरलो नाही. कारण समजायला लागलं तसे परिश्रम, कष्ट, संकटे माझ्या सोबत होते. मित्रांपेक्षा मला सोबत लाभली ती परिश्रमाची. मी खेळ खेळलो ते परिस्थितीशी संकटांशी. त्यामुळे मी कोणतेही कष्टाचे काम अगदी सहज करु शकतो. त्या पालकांचा माझ्यावर विश्वास बसला ते आपल्या मुलीचा प्रवेश घेण्यास तयार झाले. अशा प्रकारे माझी पहिली विद्यार्थीनी जयश्री ही माझ्यासाठी खऱ्या अर्थाने विजयश्री ठरली. बघता शाळेत प्रवेश घेणाऱ्यांची संख्या वाढली. १ वरुन ती संख्या १३९ वर गेली. ते वन रुम किचनचं घर कमी पडू लागलं. पून्हा दुसरं मोठ घर शोधाव लागलं. तेव्हा ५ रुमचा एक बंगला भाड्याने घेतला. त्याला शाळेची पाटी लावली. “धनलक्ष्मी बालविद्यामंदिर” ही पाटी लावताना सुरुवातीच्या दिवसांची आठवण झाली. ही शाळा सुरु करताना शाळेच्या नावाची पाटी सुद्धा नव्हती तरी सुद्धा केवळ आपल्यावर विश्वास म्हणून लोकांनी आपल्या मुलांचा प्रवेश आपल्या

शाळेत घेतला. ह्या सर्व गोष्टींचा आनंद होताच त्याच बरोबर एक जबाबदारी सुद्धा होती. ह्या मुलांच मी स्वतःहून स्विकारलेलं पालकत्व होतं आणि त्यांच्या पालकांना दिलेला शब्द होता. त्यासाठी मला झटायचं होतं. काम करायचं होतं केवळ स्वार्थासाठी बोलघेवडे पणा न ठेवता आपण जे बालू ते खरं करुन दाखवण्यात खरा पुरुषार्थ असतो. म्हणून विद्यार्थ्यांसाठी मी विविध उपक्रम आणले. नावीन्य पूर्ण उपक्रमांद्वारे त्यांना अभ्यासात गोडी निर्माण केली. केवळ विद्यार्थ्यांन पूरताच मर्यादित न राहता पालकांसाठी सुद्धा प्रबोधनात्मक कार्यक्रम घेतले. त्यांना सुद्धा शैक्षणिक कार्याचा एक भाग करुन घेतलं. शाळा हळूहळू मोठी होत गेली. शाळेचं काम वाढत गेलं. शाळा मोठी करायची म्हणजे मला अधिककाम करावं लागणार हे तेवढच सत्य होतं. मी के.के. वाघ शिक्षण संस्थेतही काम करतच होतो. सकाळी ९:३० ला कामावर हजर होण्याआधी मी शाळेत यायचो. शिक्षकांना त्यांची काम सांगायचो. आज विद्यार्थ्यांना काय नवीन देणार? या विषयी चर्चा करु लागलो. शैक्षणिक कार्यात काम करणाऱ्यांशी संवाद साधत होतो. नवीन गोष्टी शिकायला मिळत होत्या. स्वतःच्या शिक्षणाचा उपयोगही मी माझ्या कार्यात करत होतो. हाती मोजकाच पैसा होता आणि भरपूर होतं याचा ताळमेळ बसवत कामकाज चालू घेतो. मी स्वतःच्या इंजिनिअरिंगचा वापर करत कमी खर्चात बाकी डिझाईन केले. मीही माझ्या कौशल्याचा वापर करत शाळा चालवत होतो. विद्यार्थी संख्या वाढत होती. आणि ५ रुमचा बंगलाही कमी पडू लागला. मग पून्हा दुसऱ्या जागेचा शोध सुरु झाला.

शोध म्हणजे गरज. गरज ही शोधाची जननी असते. आपली गरज भागवण्यासाठी त्या गरजा पूर्ण करण्यासाठी माणुस काम करत असतो. आपल्या जर आपल्या अंधाऱ्या आयुष्यातून बाहेर पडायच असेल तर प्रकाशाची गरज ओळख आली पाहिजे. आणि आपल्या आयुष्यातील अंधार कोणत्या प्रकाशाने मिटेल तो प्रकाश आपल्याला कसा मिळेल याचा शोध हाच तुम्हाला अंधाराकडून प्रकाशाकडे घेवून जाईल.

***

# शाळेची जागा उभी केली

लहानपणी मनावर कोरलेल्या गोष्टी कधीच नष्ट होत नाही. तसं माझ्याही बाबतीत होतं. मी ज्या शाळेत शिकलो त्या शाळेच्या प्रवेश द्वारावर सुविचार कायम लिहिलेला होता. "हाती घ्याल ते तडीस न्या...!" मी शैक्षणिक कार्य हाती घेतलं होतं. मला ते पूर्णत्वास घेऊन जायचं होतं. कस्तुरीचा सुगंध कितीही दाबून धरायचा म्हटला तरी तो अडवता येत नाही. तो सुगंध दरवळणारच. तसं तुमच्या चांगल्या कार्याच असतं. तुमचं कार्य जर चांगल असेल तर लोक आपोआप तुम्हाला येऊन भेटतात. मीही शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत संस्कार, नितीमुल्य, जीवन कौशल्य, इत्यादींचे धडे दिले. मी कधी शाळेची जाहिरात केली नाही. तरीसुध्दा लोकं येत होते. चांगली शाळा म्हणून नाव लौकिक वाढत होते. मला शाळेची जाहिरात कधीच करावी लागली नाही. लोकांनीच माझी मौखिक जाहिरात केली. त्याचा परिणाम विद्यार्थी वाढत गेले. पाच खोल्यांचा बंगलाही कमी पडू लागला. पून्हा जागेसाठी शोध सुरु झाला. आता एक संपूर्ण इमारत भाड्याने हवी होती. त्यानूसार शोध सुरु झाला आणि पाथर्डीच्या मुख्य रस्त्यालगत लागून एक जूनी पडकी इमारत नजरेस पडली. त्या मालकाचा शोध, गाठी, भेटी, झाल्या इमारत भाडेतत्त्वावर हवी. भाडे ठरल्या गेले. इमारत भाडे हे न परवडणारे होते. तरी सुध्दा जुनाट इमारत भाड्याने घेतली. वर्षानू वर्ष बंद असलेली इमारत खिडकी, दरवाजे मोडकळीस आलेले. कुत्र्या मांजरांनी तीही केलेली घाण, भिंतीला पडलेले तडे अशा स्थितीतली इमारत मी संपूर्ण स्वच्छ आणि निटनेटकी केली. मुलांना पाण्याची, स्वच्छता गृहाची सुविधा केली आणि त्या जुन्या इमारतीत शाळा सुरू केली. तिथे वर्ग भरु लागले. मुले ज्ञानार्जन करु लागली. वर्ग पूढे पूढे जाऊ लागले. विद्यार्थी संख्या वाढू लागली. आता भाडेतत्त्वावर जागा शोधण्यापेक्षा संस्थेला स्वतःच्या जागेची गरज होती. स्वतःच्या इमारतीची गरज होती. आता खूप फिरा फिर झाली होती. आता भाड्याने जागा बघण्यापेक्षा स्वतःच जागा विकत घ्यावी असा निर्णय झाला आणि त्यादिशेने जागेचा शोध सुरु झाला. जुन्या इमारती पासून जवळच एक जागा होती. त्याची किंमत ही न परवडणारी होती. जागा तर गरजेची होती आणि तिही त्याच परिसरात होती. जागा बघायला गेलो. जागा पसंत पडली. जागेविषयी बोलणी सुरु झाली. किंमत कमी जास्त करण्याचा प्रयत्न झाला. अखेर ४२ लाखाला ह्या जागेचा सौदा ठरवला गेला. संस्थेच्या बँकेच्या अकाऊंट मध्ये केवळ १५००० रुपये असताना ४२ लाखाची जागा घेण्याचा निर्णय हा खरच योग्य होता का? हातात

पैसे नसताना हा निर्णय त्यावेळेस मुर्खपणाचा वाटला असता. पण जागा घेणं तितकेच महत्त्वाचं होतं. कारण विद्यार्थ्यांची गैरसोय ही माझ्या दृष्टिने अत्यंत वाईट गोष्ट होती. मी निश्चय केल्या. काही रोख रक्कम व चेक देऊन हा व्यवहार पूर्ण होईल असं सगळं ठरलं गेलं. टोकन २१००० रूपये देऊन खरेदी खताला सुरुवात झाली. खरेदीखताच्या दिवशी सायंकाळी ६ ते ७ वाजता गुरुजींना बोलवून बाई-नानांन व संस्थेच्या कार्यास मानवसेवक म्हणून कार्य करणाऱ्या सर्वांना सोबत घेऊन त्या जागेवर त्याच दिवशी भूमीपुजन केलं. ही आता संस्थेची जागा होती. हक्काची जागा झाली होती. अशी जागा होती की तिथून आम्हाला कुठेही स्थलांतर करायच नव्हतं. एक स्थिरता, शाश्वती मिळणार होती. शाश्वती मिळाली की व्यक्ती स्थिरावतो, सुखाने आणि अधिक जोमाने कार्याला लागतो. ज्या जागेसाठी ज्या स्थिरतेसाठी मी धावपळ करत होतो मी स्थिर होण्याची जागा आता माझी झाली होती आणि त्या जागेचे पूजन मला जन्म देणाऱ्या माझ्या बाई-नानांच्या हातून झाले होते. गुरुजींचे मंत्र पठन चालू होते आणि माझ्या मनात उद्याच्या माझ्या शाळेची स्वप्न रंगत होती. पूजा पूर्ण झाली. गुरुजी बाई-नाना पूजन करताना पूजेविषयी सूचना देत होते. बाई-नाना तसे करत होते. ज्या बाईने मी लहान असताना मला हाताला धरुन शाळेत नेले. पहिलं अक्षर घर शिकवलं, काबाड कष्ट केले त्याच बाईच्या हाताने आज शाळेच्या जागेची पुजा चालू होती. मला जागेवाल्याला ४२ लाख कसे देणार याचा यावेळी विचार ही नव्हता. विचार होता तो फक्त त्या बाईचा-नानांचा. डोक्यावर छत नसताना आम्हा भावंडांच्या डोक्यावर छत निर्माण करणारे ते दोघं होते आणि आता या सर्व मुलांना शिक्षणासाठी एका छता खाली आणतांनाही हे दोघं आहेत. बाई नानांच्या हस्ते भूमीपुजन संपन्न झालं. सगळ्यांच तोंड गोड केलं गेलं. मी बाई नानांच्या हाता पेढा दिला आणि त्यांच्या पाया पडलो. बाईने माझ्या पाठीवरुन हात फिरवला. तो स्पर्श मायेचा होता. पण उबदार होता. त्यात एक वेगळेपणा होता मी बाईचा हात हातात घेतला. बाईचं शरीर गरम लागलं. बाईला ताप होता. हल्ली बाई सारखी आजारी पडायची. तीला दवाखाना केला. गोळ्या औषध सगळं चालू होतं. बाईला म्हणालो, “बाई अंग गरम आहे” हो थोडा ताप आहे पण घरी जाऊन गोळ्या घेतल्या की वाटेल बरं. दादा आज मला खूप आनंद झाला आहे. पोरा आज जर कुणाला विचारलं ना तुला काय व्हायचं तर सगळे बोलतील मला डॉक्टर, इंजिनिअर, वकील व्हायचं असं म्हणतील. पण मुलाला शिकवायचं असं कुणीच बोलत नाही, जे इतरानां अवघड वाटलं ते तू सोपं केलं. याचा मला खूप खूप आनंद आहे. दादा माझं मनभरुन आलं. आई

बापाला आपल्या जगण्याच सार्थक केंव्हा वाटतं माहिती हे, जेव्हा त्यांच्या मुलाने त्यांच्या कार्यांतून चांगला आदर्श लोकांपुढे उभा केला तेव्हाच. आज मला खूप आनंद झाला. हे वाक्य बाईच्या तोंडून ऐकूण मलाही भरून आले आनंद आश्रू वाहू लागले एक वेगळेच समाधान वाटेल.

आईचे आशिर्वाद काय कार्य करु शकतात ते मला नंतर कळलं. म्हणा अथवा त्याची प्रचितीच असं म्हणा... जागा घेतली पुजन झालं, मग पाण्याचा प्रश्न पुढे आला. बोर लावली गेली, बोर जमीनीत जात होती पण पाणी काही लागलं नाही. पून्हा दुसऱ्या ठिकाणी बोर लावली गेली. तिथे पदरी निराशाच आली. शेवटी आनखिन एका ठिकाणी बोर खोदून पाहू म्हणून जागा पाहू लागलो. एक जागा नजरेस पडली. चला तीथे बोर लावून पाहू. म्हणून खोदकाम सुरु झालं. बोर खाली खाली जात होती. कारण हा शेवटचा प्रयत्न होता आणि अचानक पाणीवर येऊ लागलं. बोरला पाणी लागलं. याचा खूप आनंद झाला. मी त्या जागेवर निरिक्षण केले इथू अवघ्या ७ ते ८ मिटर अंतरावर पाणी लागलं नव्हतं. पण इथे कसं लागलं? विचार करता करता आठवलं हि तीच जागा जीथे बाईने आपल्या हाताने भूमिपूजनच्या वेळी जल अपर्ण केलं होतं. बाईचा आशिर्वाद होता जो अशा प्रकारे फळाला आला होता. आजही पाण्याच्या माध्यमातून सर्वांचे मन तृप्त करते आहे. नव्हे तर मी माझ्यासोबत आहे.

अंधाऱ्या वाटेवर जाताना आपण प्रकाशा पेक्षा अंधाराचा विचार जास्त करतो. या जगात जर काही शाश्वत असेल तर प्रकाश आहे. आणि शाश्वत प्रकाशाच्या वाटेवर चालताना कधी कधी धाडसी निर्णय घ्यावे लागतात. निर्णय क्षमता वाढवावी लागते. निर्णय घेण्याची आणि निर्णयाच्या जबाबदारी स्विकारण्याची ताकद जर तुमच्यात असेल तर तुम्ही सहज जग बदलू शकता.

***

# न संपणारं दुःख

काळ हा कधी कुणासाठी थांबत नाही. तो सतत पुढे जात असतो. त्याला थांबण हे माहित नसतं. काळ फक्त प्रवाही असतो. मलाही त्याचा अनुभव आला आहे. मी शाळेच्या जागेसाठी पैशांची जमवा जमव करत होतो. तो मोठा विचित्र काळ होता. विद्यार्थी संख्या वाढली होती. त्यांना शिकवण्यासाठी शिक्षकांची संख्या सुद्धा वाढली होती. शिक्षकांचे पगार इतर खर्च भागवावे की शाळेच्या जागेसाठी पैसा जमा करावा हे एक मोठं संकट माझ्या समोर असताना एक नवीन संकट माझ्या समोर येऊन ठाकलं. बाईची तब्येत खराब असल्या कारणाने तिला दवाखान्यात घेऊन गेलो. डॉक्टरांनी सांगितलेल्या सर्व टेस्ट केल्या आणि त्यात कळलं की बाईला पोटात कॅन्सर झाला आहे. माझ्या पायाखालची जमीन सरकली. हा कॅन्सर थर्ड स्टेजला गेला होता. तिला आम्हाला अधिक त्रास द्यायचा नव्हता. म्हणून तिने तिचं दुखनं आमच्या पासून लपवून ठेवलं होतं. तीचं आजारपण वाढत होतं आणि माझीही धावपळ वाढली होती. माझी दुविधा मनस्थिती होतं होती. मला बाईंच्या औषधपाणी करावं, तीला दवाखान्यात न्याव त्यालाही पैसे लागत होते. आणि जागेसाठी सुद्धा पैसे हवे होते. मला जिथं -तिथे मदत मागता येईल तिथे मी मागत होतो. आईच ऑपरेशन करावं असाही विचार आला पण डॉक्टर म्हणाले शेवटच्या स्टेजचा कॅन्सर आहे काही एक उपयोग होणार नाही ते सारं अवघड झालं आहे. मग काय करावं काही कळत नव्हतं. जागेचे पैसे देण्यासाठी बाई-नानां यांनी कष्टाने विकत घेतलेल्या जमिनीचा तुकडा तोही मी विकला होता. बाईचं आजारपण वाढत होतं एकदा जागेवाल्याला मला पैसे द्यायचे होते. आणि बाईला सुद्धा दवाखान्यात घेऊन जायचं होते या दोन्ही गोष्टी एकाच वेळेस आल्या. या दोघांसाठी पैसे नव्हते जीथे मदत मागता येईल तिथे मी प्रयत्न केला होता. नोकरी मधून मिळणारा पगार सुद्धा मी संस्थेच्या कामासाठी वापरत होतो. स्वतःची जमा अशी काहीच रक्कम शिल्लक नव्हती. डोक्यात आईच आजारपण आणि शाळेची जागा यांचे विचार घेर घालत होते. डोकं भंगवून गेलं होतं. माझे कामावरचे सहकारी माझी ही अवस्था पाहत होते. त्या दिवशी मात्र माझ्या समोर सर्व रस्ते बंद झाले आणि आता करावं काय या विचाराने मी कशीतरी दुपार काढली. आणि दाहीदिशाचे दरवाजे बंद झाले होते. न राहून माझ्या मनात आत्महत्येचा विचार आला. आता हा त्रास हे बौद्धिक श्रम, पैशाची चिंता त्या क्षणाला सर्व नको नको वाटत होतं. आपला जीवन प्रवास आता थांबवावा बस्सं! अजून किती काळ नियतीच्या हातचं

खेळणं होवून जगायचं. पुरे झालं लहानपणा पासून प्रत्येक गोष्टीसाठी मला झगडावं लागलं. ४ थी पासून डोक्यावर गवाताचे भारे वाहीले, आता पर्यंत जगत असलेला प्रत्येक दिवस हा संकटाना सामोरे जात जगत आलो पण आता सहनच होत नाही. असह्य झाले जगणं असे विचार सारखे मनात येत होते. आज आपला शेवटचा दिवस इथून पूढे आपण कुणाला दिसणार नाही. आईला आपण वाचवू शकत नाही तीचं आजारपण आपण निट करु शकत नाही तर मग जगून तरी काय उपयोग. असा विचार करत घराच्या दिशेने निघालो होतो. आज आपण आत्महत्या करायची हा निर्णय पक्का झाला होता. तेवढ्यात फोन वाजला. माझ्या सहकारी अनघा कुलकर्णिच्या मातोश्रींचा फोन होता. त्यांनी मला परशुराम सायखेडकर येथे आयोजित एका व्याख्यानाच्या कार्यक्रमाला बोलवलं होतं. नाही जमणार असं म्हणालो. पण त्यांनी शपथ घातली ते आग्रह करत होते. त्यांना माझं सगळं दुःख माहिती आहे. पण शपथ घातली आणि ज्योतीला सोबत घेऊन मी ५:३० वाजता तीथे कार्यक्रमाला यावं अशी अट घातली. मी नाही म्हणत होतो पण शपथ घातल्यामुळे मी त्या कार्यक्रमाला जाऊन येऊ अस्सं ठरवंल. प.सा. नाट्यगृहावर बोलवलं पण मनात आत्महत्येचा विचार तसाच होता. मी नाट्यगृहात पोहचलो. ज्योती आली आम्ही दोघं त्या कार्यक्रमाला बसलो. कार्यक्रम संदीप भानसो यांचा गरुड झेप नावाचा होता. ते व्याख्यान करत होते. माझा आज आपला शेवटचा दिवस हा विचार सारखा सारखा येत होता. व्याख्यात्याने एक व्हिडीओ क्लीप दाखवायला सुरुवात केली. एक हा नसलेला मनुष्य काही तरी काम करतो आहे, दुसरे छायाचित्र समोर आलं दोन हात नसलेला मनुष्य सुद्धा कष्टाने जगतो आहे. चित्र पूढे सरकलं पाय नसलेला मनुष्य आला. असे अवयव नसलेले तरीसुद्धा आपलं आयुष्य कस काय जगत असलेले अनेक जणांचे छायाचित्र समोरुन जात होती. ज्याला एक हात नाही तोही जगतोच आहे, ज्याला दोन्ही हात नाही तोही जगतोच आहे, पण मग आपल्याकडे सर्व आहे यांच्या पेक्षा आपण उत्तम जीवन जगतो तरी सुद्धा संकटांना घाबरुन आपण माघारी का जातो? आपणही संकटांवर मात करत जगू शकतो. संकटे नाही तर जगण्याला अर्थ नाही. व्यक्ती जे सांगत होता ते पटलं होतं.

कार्यक्रम संपला. नाट्यगृहातल्या लाईट लागल्या माझ्या डोळ्यातून मी घेतलेल्या निर्णया विषयीच्या पश्चातापाचे अश्रू ओघळत होते. कुलकर्णी मॅडमांना गाठलं त्यांच्या पाया पडलो, त्यांचे आभार मानले आणि माझ्या मनातील व्यथा आणि आज मी घरी जावून काय करणार होतो ते सांगितलं. मी आत्महत्या करणार होतो ऐकताच ज्योतीला धक्काच बसला. मग मी

म्हणालो पण मी आता मरणार नाही. जगणार या जगात माझ्यापेक्षा मोठ्या संकटांशी सामना करत अपंग मनुष्य जगतोच ना! तो जर जगत असेल तर मी ही जगणार. डोळ्यातून गंगा जमूना वाहत होत्या. स्वतःच्या या असल्या विचारांची चित्र येत होती. घरी गेलो जेवायची इच्छा नव्हती. कसे तरी दोन घास खाल्ले ज्योती सुद्धा माझी ही अवस्था पाहून चिंतातूर झाली होती. रात्रभर मला झोप लागली नाही. माझ्या सोबत ज्योतीही जागी होती. मी कुस जरी बदलली तरी ज्योती उठून बसायची. माझ्यामुळे मी घरच्यांनाही त्रास देत होतो. सकाळ झाली आणि मी ज्या घरात राहत होतो जे कष्टाने उभं केलं होतं ते माझं स्वतःच घर विकण्याचा धाडसी निर्णय घेतला. माझा निर्णय ज्योतीला बोलवनू दाखवला. त्यावर तीने सकारात्मक उत्तर दिलं. कारण शाळेचा कारभार आणि माझी होणारी धावपळ शाळेची मुख्याध्यापिका आणि माझी पत्नी म्हणून ती खूप जवळून पाहत होती. तीने कसलाही विलंब न लावता स्वतःपूरता विचार न करता तीने माझ्या घर विकायच्या निर्णयाला संमती दिली. घर विक्रीची प्रक्रिया सुरु झाली. गिऱ्हाईक लागलं घर विकलं गेलं आणि जागा खरेदीचा प्रश्न काही काळासाठी मार्गी लागला. आईला दवाखान्यात घेऊन जाण्यासाठी माझ्याकडे पाचशे रूपयेही खिशात शिल्लक नव्हते. अवस्था बघून आईच्या दवाखान्यासाठी नितीन कुलकर्णी यांच्या आईने पाच हजार रूपये आणून दिले.

आईची तब्येत जास्त खालावली. चांगल्या हॉस्पिटलमध्ये उपचार घ्यावा एवढा पैसा माझ्याकडे नव्हता. म्हणून बाईला मी शासकीय संदर्भ रुग्णालयात दाखल केलं. तीला दाखल केल्यानंतर तीथलं डॉक्टर माझ्याकडे कुत्सीत नजरेने पाहत होते. त्यांना वाटलं चांगली नोकरी करणारा, पगार व्यवस्थित असणाऱ्या माणसाने आईला इथे आणावं याचा त्याला राग आला असावा. बाईला दवाखान्यात दाखल केलं मी चादर आणण्यासाठी बाहेर गेलो तीथून आल्यानंतर त्या डॉक्टरांचं माझ्याप्रती वागणं अचानक बदलून गेलं. त्यांच्या नजरेत कुत्सीतपणा जावून तीथे आता माझ्या प्रती आदर दिसत होता. डॉक्टर माझ्या जवळ आले माझ्या खांद्यावर हात ठेवत मला म्हणाले, मीस्टर कोल्हे काहीही काळजी करु नका तुमच्या आईची सेवा मी माझ्या आईसारखी करेल. तुम्ही पिढी घडवण्याच मोठं काम हाती घेतलं याचा मला अभिमान वाटतो. तुम्ही असंच चांगल काम करत रहा असं म्हणून डॉक्टर निघून गेले. मला कळून चूकलं बाईने माझ्याविषयी डॉक्टरांना सर्व सांगितलं होतं. जीला शब्दांवाचून मनातलं सर्व समजतं ती आई असते.

माझ्या मनातलं बाईला न बालेता सर्व समजत होतं. बाईला सखा भाऊ, बहीण, मामा, वगैरे कुणी नव्हते. ती एकटीच होती. ती मला नेहमी बोलायची एकतरी मुलगी हवी होती मला माझ्या मनातलं बोलण्यासाठी त्यावेळेस मी म्हणालो बाई मी आहे ना मला सांगत जा! बाई मला तीचं सर्व दुःख सांगायची. एकनाथने असं केलं, अनिल असा वागला, तु इथे चुकला वगैरे वगैरे, मीही ते ऐकत होतो. तिची मुलगी म्हणून सेवा केली, भाऊ म्हणून काळजी घेतली, आणि मुलगा म्हणून जे जे कर्तव्य पार पाडता येईल ते केले. काही दिवसांनी बाईला जरा बरं वाटलं. तीला लासलगावच्या घराची ओढ लागली होती. तीने लासलगावला जाण्याचा आग्रह धरला. डॉक्टरांच्या सल्ल्याने तीला घरी पाठवलं. आम्ही शनिवार, रविवार तीथे जात होतो. एके रविवारी मी तीथे तीला भेटायला गेलो. जाताना तिच्यासाठी नारळपाणी नेलं होतं. बाईची तब्येत खालावली होती. तीने खाणं, पिणं सोडलं होतं. मी लासलगाव गेलो. घरी गेलो बाईच्या खोलीत कुंद अंधार दाटून होता. सर्व खाली माना घालून बसले होते, कुणी कुणाशी बोलत नवहतं सर्वत्र शांतता होती. बाई अंथरुणावर पडून होती. मी बाईला आवाज दिला बाईने अलगद डोळे उघडले. मला पाहून तीच्या डोळ्यात एक प्रकारचे तेज आले. तीने थरथरत माझा हात घट्ट धरला हसण्यासाठी ओठ विलग झाले. काहीखात नसल्याने तिला उठून बसण्याची ताकद नव्हती. मी तिच्या कपाळावर हात ठेवला आणि म्हणालो, बाई हे नारळपाणी पिऊन घे. चमच्याने नारळपाणी पाजू लागलो. बाई माझ्याकडे एकटक बघत होती. माझा कंठ भरुन आला होता. मी ही फक्त बाईकडे बघत होतो, बाई माझ्याकडे बघत होती. डोळ्यातून पाणी ओघळत होतं. पण ती माझ्याशी बोलत नव्हती. मी चमचा तोंडाजवळ नेला की पाणी पिण्यासाठी आऽऽ करत होती. मीही शांत होतो. तीला पाहून रडत होतो. बाईने तिचा उजवा हात माझ्या उजव्या हातात दिला होता कायम सोबत राहावा म्हणून हा आमच्यातला आई लेकांचा शब्द संवाद होता. एकमेकांच्या सुख दुःख समजून घेण्याचा. मला उद्या सकाळी संडे असल्या कारणाने कामावर जाण्यासाठी परत नाशिकला येण भाग होतं. म्हणून जड मनाने बाईचा निरोप घेतला, नाशिकला आलो आणि सकाळी कामावर सुजू झालो. दुपारी अचानक फोन वाजला, उचलला आणि ज्या गोष्टीची भिती हाती तेच झालं बाई मला सोडून गेली होती. मला आभाळ कोसळल्यासारखं झालं. मला बाई नावाचा हंबरडा फोडायचा होता पण सर्व असल्याकारणाने मी माझं रडण दाबून ठेवलं. घरी लासलगाव पोहचलो

बाईला खाली ठेवण्यात आलं होतं. तीच्या उश्याला उदबत्या पेटत होत्या हे सर्व मी कधी स्वप्नात सुद्धा विचार केला नव्हता. बाई म्हणून हंबरडा फोडला, बाईला उठवायचा खूप प्रयत्न केला पण माझी बाई उठली नाही, माझ्याशी बोलली नाही. बाई मी तुझा खूप मोठा गुन्हेगार आहे. असं माझं मन बोलत होतं. काल न बोलता साधलेला संवाद बाई तुझ्या आणि माझ्यातच राहिला. आज जर मी शाळा सुरु केली नसती तुझं ऑपरेशन करुन तुला अजून काही दिवस जगवता अलं असतं मी माझ्या बाईचा खूप मोठा गुन्हेगार होतो. बाई माझ्या समोर पडून होती. लोकांनी तीचा देह उचलला त्याला शेवटची आंघोळ घातली, तिरडीवर ठेवलं आणि स्मशानभूमी गाठली. चितारचली गेली. बाईचा देह ठेवला गेला, अग्नीडाग दिला गेला. बाई नेहमी म्हणायची मला जर मुलगी असती ना तर मी गेल्या नंतर ढसाढसा रडली असती. रडण्या गाण्यासाठी मुलगी पाहिजे होती प्रकाश. मी म्हणायचो मी आहे ना तुझी मुलगी... त्या बाईचा मुलगी, मुलगी, भाऊ आज पोरके झाले होते. बाई गेली होती आणि बाईच्या जाण्याच्या दुःखात मी रडूनतीच्या मुलीची जागा भरली होती.

अंधाराकडून प्रकाशाकडे जाणाऱ्या प्रवासात तुम्हाला अनेक ठिकाणी बलिदान, आहुती द्यावी लागते त्यासाठी काळजावर दगड ठेवावा लागतो.

***

# आईसाठी

"स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी" ही कविता आम्हाला अभ्यासाला होती. याचा अर्थ असा मला जाणवायला लागला आहे. आपण या जगात खूप श्रीमंत झालो, या सगळं सुख मिळवलं तरी आईची माया मिळवू शकत नाही. मी आई विना पोरका झालो होतो. आई माझी खूप मोठी ताकद होती. पण आज बाई दिसत नव्हती बाईने आयुष्य भर कष्ट केले, परिश्रम केले आणि आता त्याच माझ्या बाईला परिश्रमातच आता मला माझी बाई दिसू लागली. शाळ हळू हळू मोठी होत होती. जागेसाठी निधी उभा राहत होता, जागेचा प्रश्न आता बऱ्यापैकी मार्गी लागला होता. विद्यार्थ्यांना आनंददायी जीवन शिक्षणाअंतर्गत विविध उपक्रम राबविले जात होते. स्वतःचा Q.B.E. पॅटर्न नूसार मुलांना शिक्षणासाठी सुरुवात झाली. बालविद्यासाहित्य संगम सुरु केलं, मानवधन शालेय वृत्तपत्र सुरु केलं. या सारखे विविध सामाजिक क्षेत्रात उपक्रम राबवले. शाळेत विद्यार्थी संख्या वाढत होती. म्हणून शालेय इमारत बांधकामाला सुरुवात करावी लागणार होती. म्हटलं सगळी सोंग आणता येतात पैशाचं सोंग आणता येत नाही. पैसा उभा करणार आणि या सर्व कार्यात सहकार्य करणाऱ्या बिल्डरचा शोध सुरु झाला. वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेता आणि पालकांची मागणी पाहता परिसरात इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करावी याचा विचार सुरु झाला आणि त्यातून एक मार्ग सापडला. ज्या इमारतीत मराठी शाळा भरते त्याच इमारतीत इंग्रजी माध्यम सत्रानूसार सुरु करता येवू शकते. तेव्हा इमारतीचे मालक यांना मध्यस्ती घेवून प्रोगसिव्ह इंग्लिश मिडीअम स्कुल सुरु करण्यात आली. दोन्ही शाळेची विद्यार्थी संख्या हळूहळू वाढतच होती. आता बांधकामाला जोर धरायला हावा होता. पण पैशामुळे अडून होतो. बाईच्या आठवणीत काहीतरी करावं असं सारखं वाटत होतं. तिला कार्यातून शोधण्यासाठी बालकाश्रम आणि वृध्दाश्रम एकाच ठिकाणी सुरु करावा म्हणजे वृध्दांना, नातवंडं आणि अनाथा बालगोपाला आजी आजोबा हे दोघं मिळतील. या विचाराने चक्र सुरु झाले. आपण ज्या समाजात राहतो त्याचं सुध्दा देणं लागतो म्हणून सामाजिकता लक्षात घेत हे वृध्दाश्रम सुरु करण्याचा मानस आखला त्यासाठी जागा हवी होती तेव्हा संजूभाऊ शेजोळे यांनी केवळ नावा पूरते भाडे घेवून मला एका चांगल्या कार्यासाठी त्यांच्या शेतातील एक जागा देवू केली. मिळालेल्या जागेत आश्रमाचे बांधकामाचा पायाभरला. श्रमदानाच्या माध्यमातून अनेकांनी तिथे मदत केली आणि पहाता पहाता फक्त एका महिन्यातच अथक कामातून आश्रम उभा राहीला.

या आश्रमाच्या उद्‌घाटनाला कुणाला बोलवावं तेव्हाअनाथांची आई सिंधूताई सपकाळ माई यांना बोलवावं असं ठरवलं गेंल. कार्यक्रम ५ जून संस्थेच्या वर्धापनाच्या दिवशी ठेवण्यात आला. माईला कार्यक्रमात बोलविण्यासाठी दोन तीन लोकांनी प्रयत्न केला पण व्यर्थ झाला. त्यांनी अनेकदा माईला फोन केला. कार्यक्रम सांगितला, तारीख, वार, वेळ, सांगितली माई म्हणाली मी त्या दिवशी अगोदरच कार्यक्रम घेतला. मला नाही जमणार मी पून्हा दोन तीन दिवसांनी संपर्क करून प्रत्यक्ष त्यांना भेटण्याची वेळ घेतली. तेव्हा मी ज्योती दोघं तीथ माईची वेळ घेवून त्यांना भेटायला गेलो. माझ्या सोबत असलेल्या माईना संस्थेची आणि या आश्रमाची माहिती सांगितली. माई पून्हा म्हणाल्या मला सर्व मान्य पण मी अगोदरच एका ठिकाणी कार्यक्रम घेतला आहे मला तीथे जावं लागेलं. मी बोलायला सुरूवात केली. माईला एकच वाक्य म्हणालो माई ५ जून संस्थेचा वर्धापन दिन त्या दिवशी मी माझ्या आईच्या नावानं आश्रम सुरु केला आहे आणि माई आई नूकतीच देवाघरी गेली आहे. तिनं मला याच दिवशी जन्माला घालून सूर्य दाखिवला आहे. आणि ती मला ५ तारखेलाच १२.०५ मिटांनी भेटायला येणार आहे. हे बोलताच माईने मला मुलाप्रमाणे जवळ धरलं मी आईच्या कुशीत असल्याचं जाणवलं एक नातं मायलेकरासारखं तयार झालं आणि त्याचक्षणी माईनी स्वीकारलेला कार्यक्रम रद्द केला आणि सांगितले मी येणार. नव्हे तर तुझ्याकडे मुक्कामी येणार खरचं तसचं झालं आणि आदल्यादिवशी माईला नाशिकला आल्या. त्यामुळे माईला हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था केली. दुसऱ्यादिवशी घरी घेऊन गेलो घरच्या उंबरठा ओलांडताना समोर असलेल्या घडाळ्याकडे लक्ष केले. बरोबर १२.०५ वाजले होते. माईने मला विचारलं हे कसं शक्य झालं मी देवला साकडं घातलं देवही माझं म्हणणं मान्य करतो कारण मी देवाइतकेच माझ्या आईवर प्रेम करतो. माई व मी रडत अश्रू पूसत कार्यक्रमस्थळी कधी पोहचलो कळलेच नाही. आणि माईच्या हस्ते सुखद सहवास व बालकआश्रमाचं कार्य सुरू झाले.

***

# एका दिवसात शाळा

“हाती घ्याल ते तडीस न्या!” हे मी लहनपणा पासून वाचत आलो आणि त्याच तत्त्वानूसार मी काम करत राहिलो. मी हाती घेतलेल्या काम कधी अर्धवट सोडलं नाही. शाळेचं कामही अगदी तसचं होतं. काम हे कधीच संपत नाही. ते चालूच असतं. मीही न थकता कोणतीही विश्रांती न घेता काम करत होतो. कुणाला वाटणार नाही आपली संस्था मोठी व्हावी. तीच नावलौकिक व्हावं. विद्यार्थी सर्वगुण संपन्न असावे. एकाच्या दोन, दोनाच तीन शाखा व्हाव्या असं मलाही वाटत होतं आणि तशी संधीही मिळत गेली. संस्थेच्या मराठी धनलक्ष्मी शाळा आणि प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मिडीअम शाळा सुरु होत्या. वाडीवऱ्हे वगैरे इगपुरी तालूक्यातून विद्यार्थी येत. एकदा असाच वाडीवऱ्हे येथे गेलो असता लोकांनी वाडीवऱ्हे येथे शाळा सुरु करा अशी त्यांनी मागणी केली. मीही विचर करु लागलो लोकांची मागणी होतीच मग मी पून्हा जागेच्या शोधात लागलो. वाडीवऱ्हे येथे जागा मिळाली. पण शाळा मान्यतेच्या अटी नूसार दोन एकर जागा संस्थेच्या नावे अथवा भाडेतत्त्वावर हवी असते मग जागा भाड्याने कोण देणार याचा शोध घेतला. कानोटे यांच्या जागेत शाळा सुरु करायची म्हणजे वर्ग खोल्या हव्या होत्या. त्याचही काम सुरु झालं. भाडेतत्त्वावर जागा देणारा एक जण ळिाला. भाडे वगैरे करार ठरला आणि ३ लाख रुपये द्यायचे ठरले. अशा जागेचे ज्या ज्या जागेत मी पाय सुद्धा ठेवला नव्हता. आणि बघता बघता शाळा सुरु झाली. ब्राईट इंग्लिश मिडीअम स्कुल नावाने शाळा भरु लागली. आपल्याला मिळणारी संधी ओळखता आली पाहिजे. अशी संधी अंबड येथील जाधव संकुल येथे मिळाली. एके दिवशी कामानिमित्त मी जाधव संकुल येथे गेलो होतो. तीथे एक विद्यार्थी राहत होता. त्याचे पालक मला भेटले त्यांनी मला पून्हा मागणी केली मला म्हणाले येथील कामगार वसाहतीच्या मुलांना एक चांगली शाळा हवी तेव्हा येथे शाळा सुरु करा. त्यांची मागणी होती त्यानूसार दुसऱ्या दिवशी रात्री आम्ही शाळेसाठी जागा शोधायला सुरुवात केली. रात्री ११ वा. शाळेसाठी जागा मिळाली. भाडे तत्त्वावर एक घर भाड्याने घेतलं. दुसऱ्या दिवशी संस्थेचे सर्व शिक्षक वगैरे आम्ही तीथे पोहचलो. त्या जागेची साफ सफाई केली. वर्ग खोल्या तयार केल्या आणि एक दिवसात शाळा सुरु केली. फक्त एक दिवसात शाळा सुरू करण्याचे सौभाग्य मी माझ्या जीवनात स्वतःच  निर्माण केलं एक इतिहास घडविण्यासाठी.

जेव्हा तुम्ही अंधाऱ्या वाटेवरुन प्रकाशाच्या दिशेने प्रवास करता तेव्हा अशा अनेक संधी तुम्हाला मिळत जातील. पण त्या संधी तुम्हाला ओळखता यायला हवी. संधीची ही गाडी सुटली की पून्हा लवकर मिळत नाही. ती पकडा आणि अंधाराकडून प्रकाशाकडचा हा प्रवास करा.

***

# संकटातही आनंदच

या सगळ्या प्रवासात मराठी माध्यमाच्या शाळेच्या इमारतीचा प्रश्न होताच त्यांसाठी प्रयत्नही चालू होता. आपल्याला समजून घेणारा बिल्डर हवा होता. जो सहकार्याने काम करेल असा बिल्डर मी शोधत होतो. बँकेकडे लोनची मागणी करत होता. चॅरेटी कमिशनर यांना भेटा त्यांना विनंती करणे, अर्ज करेल पण कोणतीही बँक लोन देण्यासाठी तयार नव्हती. मी प्रत्येक बँकेच्या पायऱ्या झिजवल्या. प्रत्येकाला विनवणी केली. पण कुठूनही सकारात्मक उत्तर मिळताल नाही. अखेर देव हा एक मेव मार्ग उरला होता. ज्योतीने तुळजापुरच्या देवीला नवस केला होता. शाळेची इमारत झाली की ५ वर्षे मी दर्शनाला येईल. मी ही ब्रम्हगिरीला गेलो होतो. तेथील मंदीराच्या बाहेर मी माझी इच्छा व्यक्त करुन लाल कपडा बांधला होता. ते करुन मी घरी येत होतो. तेवढ्यात फोन वाजला. डेरे साहेबांचा फोन होता. त्यांनी मला एक आनंदायी बातमी दिली. म्हणाले कोल्हे साहेब तुम्हाला जसा अपेक्षीत बिल्डर हवा होता तो मिळाला. मी ही घरी न जाता लगेच त्यांना जाऊन भेटलो. सरळ डेरे साहेबाकडे गेलो. तीथे भेट झाली. ते कामाला तयार झाले. आणि संस्थेच्या अकाऊंटला एकही पैसा नसताना इमारतीच्या कामाला सुरुवात झाली. पैसा कसा जमा करावा याचाही प्रयत्न जोर धरत होता. दोन्ही शाळांची विद्यार्थी संख्या वाढत होती. त्यासाठी लवकरात लवकर इमारत बांधणी गरजेची होती. मी लोकांकडे मदत मागत होतो. काहींनी देऊ केली, काहींनी नाकरलं एके दिवशी संजू भाऊ सकाळी माझ्याकडे एक कपड्यात काहीतरी बांधलेले घेऊन आले. माझ्या समोर ते गाठोडं ठेवलं ते म्हणालं हे माझ्या आईने पाठवलं आहे तुमच्यासाठी. मी ते गाठोडं घेतलं खोललं तर त्यात त्यांच्या संपूर्ण घरातील स्त्रीयांचे दागिणे होते. ते पाहताच मला धक्काच बसला. मी संजू भाऊंना हा प्रकार काय आहे? हे विचारलं. त्यावर ते म्हणाले, आईने दिल ते घ्या मोडा विका,काय मिळतील ते पैसे घ्या आणि शाळेची गरज पूर्ण करा. ते जेव्हा परत देता येतील तेंव्हा द्या. जे शिपाई पदावर नोकरी होते अशांनाही नव्हे तर स्वतः च्या नावे अनेकांनी कर्ज काढून मला या कार्यात मदत केली. मदत करणारे हे त्याचं मुले या शाळेत शिकणारी नव्हती किंवा त्यांच्या घरातील माणसं नोकरी करणारही नव्हती. अशा माणसांची देव माणसांची सुद्धा मला साथ लाभली. अशा अनेक देव माणसांच्या साथीने कामाला सुरुवात केली. अगदी कमी पैसे दिले असता २३ लाखस काम पहिल्या टप्प्यात पूर्ण झालं होतं. शाळा इमारत मला लवकरात लवकर पूर्ण

करणे गरजेचं होतं. मी ही जेवढा पैसा जमा करता येईल तेवढा जमा करत होतो. पैसे वेळेवर देता येत नव्हते. पण बिल्डर चेतन जगताप यांनी कधी उलट उत्तर दिलं नाही किंवा कधी कोणत्या कामाला दिरंगाई केली नाही. कामाचा जोर वाढला होता. उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर शाळा सुरु होणार होती. शाळेचा पहिला दिवस ह्या इमारतीत होणार होता. काम घाईने पूर्ण होत होतं. बघता बघता शाळेची इमारमत पूर्णत्वास येत होती. आकार घेत होती. ७५ लाखाच काम झालं होतं. पण केवळ १२ लाख रुपये मी आतापर्यंत देवू केले होते. काम रांत्रंदिवस चालू होतं. नवीन इमारतीच्या वर्ग खोल्यांसाठी मुलांना बसायला बाक हवे होते म्हणून बाकाचे लोखंडी सांगाडे तयार केलेले होते. त्याला लागणाऱ्या फळ्या सुद्धा मागवायच्या होत्या. त्या यायला उशीर झाला होता. इमारतीचं संपूर्ण काम १२ जूनला सकाळी पूर्ण झालं. १३ जूनला शाळा भरणार पण मुलांना बसायला बाक नव्हते. अलताफ शेठ यांच्याकडून मागवलेली लाकडी फळ्या १२ तारखेला रात्री उशिराने आल्या. मी त्या उतरवून घेतल्या अलताफ शेठच्या माणसांना रात्रभर फळ्या जोडायच्या कामाला लावले. रात्रभर त्यांच्या सोबत त्यांच्या मदतीला थांबलो आणि पहाटे ६ वाजता मुलांना बसायला बाक तयार झाले. ६ वा. घरी गेलो आणि पून्हा १३ जूनला सकाळी ६:३० वा.शाळेत हजर झालो. उन्हाळ्याच्या सुट्टी नंतर शाळेतला पहिला दिवस शाळा इमारत नवीन, बसायला बाक नवीन फळा सर्व कसं नवीन होतं. शाळेच्या ह्या नवीन इमारतीत ह्या प्रांगणात आणि विशेष म्हणजे स्वतःच्या हक्काच्या इमारतीत प्रवेश करणाऱ्या मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद मी टिपत होतो. त्या आनंदासाठी मी झटत आलो. त्या आनंदात मला माझ्या बाईचा चेहेरा दिसला. मुलांमध्ये शाळेच्या इमारतीच्या कामात तिचाच आशिर्वाद होता. कष्ट परिश्रम आणि कौशल्य ह्यांच्या जोरावर आपण आपल्या अंधाऱ्या जीवनाला प्रकाश देऊ शकतो. हे यातून स्पष्ट झालं होतं. फक्त दुसऱ्याला आनंद देण्याची वृत्ती असली पाहिजे. मी आयुष्यभर परिश्रम केलं केवळ शारिरीक नव्हे तर मानसिक सुद्धा आणि अजूनही करत आहे. आपण घेतलेले परिश्रम हे कधीच वाया जाणारे नसतात. त्यातून आपल्याला काहीना काही मिळतचं मिळतं. पण ते ओळखण्याची आणि स्विकारण्याची फक्त ताकद हवी इयत्ता ४ थीच्या वर्गापासून गवताचे भारे विकून स्वतःच्या शिक्षणाचा आणि घरचा खर्च भागवत मी प्राथमिक शिक्षण पूर्ण केलं. अगदी लहान वयातच मला परिस्थितीची जाणीव झाली होती. परिस्थिती माणसाला घडवते अथवा बिघवत असते आणि मी मात्र परिस्थितीमुळेच घडत गेलो. माध्यमिक शिक्षण घेत असताना अनेक अडचणीवर मात करत गेलो. स्वतः

इंजिनिअर होणारच ठरवलं होतं आणि तेही जिद्दीने पूर्ण केलं. आत्मविश्वासाने जगात वावरलो. आईच्या जाण्याने अर्धाअधिक खचलो पण स्वतःला सावरलं आणि कामात बाईचा शोध घेत गेलो. बाई म्हणायची, "सुई आणि तलवार मध्ये सर्वात जास्त जर कोणी ताकदवान असेल तर सुई आहे. कारण ती तोडत नाही तर जोडत जाते तोडणं सोपं असतं पण जोडणं अवघड असतं. माणसं जोडायला शिक पोरा..." मी बाई ने जे सांगितलं तेच केलं मी माणसं जोडत गेलो आणि मानवधन वाढत गेले. कुठे घरात ट्युशन घेणारा मी आता स्वतःच्या चार शाळा व ज्युनिअर कॉलेज सुरु केले. बोटावर मोजता येईल एवढ्या मुलांच्या शिकवणी देणारा मी आता ३००० विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे कार्य करत आहे. एक शिक्षिकेच्या जोरावर शाळा सुरु केली. आज माझ्याकडे १५० जण शिक्षक आणि मानवसेवक म्हणून काम करत आहेत. स्वतःच घर विकून मुलांच्या भविष्यासाठी साठवलेला पैसा खर्च करुन, स्वतःचा पगार संस्थेसाठी देऊन संस्थेचा व्याप वाढवला... चालवला... कालांतराने संस्थेच्या वाढत्या व्यापामुळे मला माझी नोकरी सोडावी लागली. पण ज्याने स्वतःचं संपूर्ण जीवन ज्या कार्यासाठी खर्च केले. तिथे नोकरी हा विषय गौण होता. मी जर संकूचित वृत्तीने, स्वार्थी भावनेने मला जे मिळतं त्यात समाधानी झालो असतो तर आज मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्थचा संस्थापक म्हणून कार्य पाहिलं नसतं. मानवधनाला मला मदत करणारे व्यक्ती सुद्धा माझ्यावर व माझ्या कार्यावर अगदी मनापासून प्रेम करत. जेव्हा गरज होती तेव्हा डॉ. सुनिल कुटे, डॉ.यशवंत बर्वे, अनघा कुलकर्णी यांनी केलेली आर्थिक मदत ही अगदी निस्वार्थी होती. त्यांनी केलेली आर्थिक मदत रक्कम मी जेव्हा त्यांना परत द्यायला गेलो तर त्याचा स्विकार कुणीच केला नाही. हे सगळं कशामुळे घडलं तर कामातील प्रामाणिकपणा यामुळेच. चांगलं काम करण्याची धडपड, सातत्य असल्यामुळे मी अनेक कामं केली पण आपल्या समोर केवळ शाळा हाच मुद्दा मांडत गेलो कारण शाळा हा माझा आत्मा आहे. शाळेसाठी काम करता करता मी अनेक सामाजिक कार्य केले. केवळ शहरापूर्ता मार्यादित न राहता आदीवासी भागासाठी मी काम करत आहे. इगतपुरी तालुक्यातील मोडाळे गाव दत्तक घेऊन विकासाच्या दृष्टीने तिथे पाऊल उचलले आहेत. अनेक विविध संस्थांमध्ये, वेगवेगळ्या पदाचा भार मी उचलत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवून त्यांना सध्याच्या स्पर्धात्मक युगात आपले स्थान निर्माण करण्यासाठी कौशल्य गुणांचा विकास वाढवण्याचे काम सुरु आहे.

या माझ्या प्रवासात मी अनेक थोरा मोठ्यांच्या मार्गदर्शनाचा अवलंब करुन हा अंधाराकडून प्रकाशाकडचा प्रवास पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहे. यात जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ मार्शेलकर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ शंकरराव गोवारीकर, डॉ.यशवंत बर्वे, डॉ. सुनिल कुटे, निला सत्यनारायण, सिंधूताई सपकाळ, अपर्णाताई रामतिर्थे कर, माधुरी माटे, मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, डॉ. अश्विनकुमार भारद्वाज अशा थोरामोठ्यांच्या आशिर्वादाने व मार्गदर्शनाने मी अंधाराकडून प्रकाशाचा प्रवास करत आहे.

माझे हे काम अथांग समुद्राच्या एका थेंबा सारखे असून पुढे खूप काम करायचे बाकी आहे आणि त्यासाठी मला अधिक परिश्रम, कष्ट घ्यावे लागतील. ते घेण्यासाठी मी सदैव तयार आहे. माझ्या जीवन प्रवासाचा प्रकाशाकडे जाण्याचा प्रवास अजून संपला नाही. तो चालूच आहे आणि तो चालूच राहणार अगदी शेवटच्या श्वासापर्यंत....

***

# देवही माझ्या सोबत

ह्या जगाच्या पाठीवर ह्या आयुष्याचा पसारा सावरणारा कुणीतरी असलाच पाहिजे. जेथे विज्ञान संपते तेथून पुढे अध्यात्म सुरु होते. तसं माझं शिक्षण इंजिनिअरींगचं जरी असलं तरी मी मात्र देवावर नितांत श्रद्धा असणारा माणूस आहे. मी मोठ्या कष्टाने मी सारं मिळविलं. परिस्थितीवर मात करत यश मिळवत गेलो त्यासाठी स्वतःवर आत्मविश्वास हवा होता. काम करण्याची जिद्द हवी होती. पण हे सगळं मला कुणाकडून मिळालं? माझ्या जीवन प्रवासाच्या या वळणावर जेंव्हा मागे वळून पाहिल्यावर विचार येतो की आपण हे सगळं कमवलं खरचं हे माझ्या एकट्याकडून शक्य होत का? हा प्रश्न निर्माण होतो आणि मग लक्षात येतं की एक अदृश्य शक्ती आपल्या सोबत होती ती म्हणजे माझं श्रद्धास्थान असलेलं दैवत!

माझ्या आजोबांनी त्यांच्या पोलिस पाटीलकीच्या नादात कधी देव धर्म केलं नाही, कधी देवपूजा केली नाही. मग परिणाम म्हणून कदाचित अक्काबाईच्या फेऱ्यात आजोबांनी सर्व काही गमावलं. हा फेरा त्यांना धडा शिकवण्यासाठी होता पण त्या मागचं कारण त्यांना समजलं नसावं. कालांतराने माझा जन्म झाला. लहानाचां मोठा होत होतो.पण पोटाच्या वरील छातीचा भाग महादेवाच्या पिंडीच्या आकारासारखा होता. याची मला त्यावेळेस खूप लाज वाटत असे. शारिरीक व्यंग म्हणून माझ्यात त्याविषयी न्यूनगंड निर्माण झाला होता. मी झोपल्यानंतरही महादेवाच्या पिंडीच्या आकारासारखा तो वाटत असे.ही अशी शारिरीक रचना असण्यामागे नक्की माझ्या देवाचा काही तरी हेतू असला पाहिजे. हे मला खूप उशीराने कळलं. कदाचित माझं आराध्य दैवत मला हे सांगू इच्छीत असावं की मी तुझ्या सोबत आहे. किंबहुना तुझ्यात आहे. तो होता म्हणून निधड्या छातीने मी संकटांवर मात करु शकलो. मी विज्ञाना बरोबर अध्यात्माची कास धरणारा माणूस आहे. मी जसा देवभोळा आहे तसे माझे वडील नानांची सुद्धा देवावर नितांत श्रद्धा व भक्ती आहे. मी माझ्या देवाला नेहेमी प्रथम स्थान दिलं. मी कोणत्याही मंदिरात जावो, कोणत्याही देवाच्या दर्शनाला जावो तेथे सर्वप्रथम मी माझ्याच देवाचं नाव घेतो. मी वयाच्या ११ व्या वर्षापासून शुक्रवारचा उपवास करतो पण त्यादिवशी मी कोणताही फराळ घेत नाही तरी सुद्धा तो दिवस मी न थकता अधिक ऊर्जेने काम करत असतो. ती ताकद येते कुठून?

माझं श्रद्धास्थान हे नवनाथांपैकी एक वडसिंग नागनाथ हे आहे. या माझ्या देवाच्या नावातच नाग हा शब्द आहे. त्यामुळे नाग,साप हे सरपटणारे भितीदायक जरी असले तरी माझ्यासाठी ते देवच आहेत. मी सदैव म्हणत असतो देव माझ्या सोबत आहे. म्हणून मला पुढील प्रसंग आवर्जून सांगावासे वाटतात. एकदा नागपंचमीच्या दिवशी का कुणास ठाऊक मला सारखं वाटायचं आज देव घरी येईल म्हणून मी बाईला अनेक वेळा सांगितलं होतं. बाई आज देव येणार त्याला नैवेद्य बनव! पण नागपंचमी असल्या कारणाने आणि घरात काही पाकायच नसल्या कारणाने बाइने नैवेद्य केला नाही पण आम्ही रात्रीची आमची जेवणं आटपून आम्ही झोपण्याची तयारी केली. बाई, नाना, अनिल हे बाहेर ओट्यावर झोपले आणि मी, एकनाथ, आणि आजी घरात झोपलो होतो. रात्री काही कारणास्तव मी घराचं दार उघडलं बाहेर पडणार तोच आम्ही पाळलेला कुत्रा खंड्या माझ्यावर भुंकायला लागला. दाराच्या उजव्या बाजूला बांधलेला खंड्या मला दाराच्या बाहेर येवु देईना आणि डाव्या बाजूला बघून मोठ मोठ्याने भुंकायचा. खंड्या असं काय करतो म्हणून मी दारातून डाव्या बाजूला डोकावलो बघतो तर दाराच्या चौकटी लगत एक भला मोठा नाग वेटोळे घालून फणा काढून बसलेला. मी दारातून आंगणात ओरडत उडी मारली सगळे जागे झाले. मळ्याच्या आजू बाजूला असलेली मंडळी सुद्धा धावत आले. एवढे गदारोळ झाली तरी नाग काही हलायला तयार नाही. कुणी म्हणायचं नागपंचमीच्या दिवशी देवाने दर्शन दिलं. त्याला नैवेद्य दिला गेला. तो काही केल्या जागेवरुन हलायला तयार नाही. शेवटी एका इसमाने शंकराचे नाव घेत आपल्या हातातील काठी गरगर फिरवली आणि काठीचा रट्टा हाणला. एखादी निर्जिव वस्तू पडावी अथवा कलंडावी अशा स्वरुपात तो नाग फक्त कलंडला. त्याचं वेटोळे, फणा तसाच राहिला. साप मरून पडला मग आम्ही द्राक्षांच्या काड्यांचा ढिग केला आणि त्याला अग्नी डाग दिला. पण तरी सुद्धा तो संपूर्ण नष्ट झाला नाही. दूसऱ्या दिवशी त्याला नमस्कार करुन पुरलं गेलं.

असाच नागाचा एक प्रसंग मी शेवटच्या वर्षाला शिकत होतो आणि वार्षिक परिक्षेचा पहिला पेपर होता. मी मळ्यातले काम सकाळी पटापटा आवरली आणि द्राक्षांच्या बागेत अभ्यासाला बसलो. उन्हाळ्यामुळे द्राक्षांच्या पानांची गळती झाली होती. सर्व वाळलेला पाला पाचोळा पडलेला होता. माझा अभ्यास त्या बागेत एका द्राक्षाच्या झाडाच्या बुंध्याला टेकून चालू होता. तेवढ्यात काहीतरी सळसळ आवाज आला. मी सावरलो. विजेच्या

गतीने माझ्या जवळ नाग रांगत आला होता वेटोळे न घालत फणा काढून उभा राहिलां. काही क्षण आमची नजरा नजर झाली. मी काहीच करू शकत नव्हतो. आमच्या दोघांमध्ये खूप कमी अंतर होतं. पण मला काहीही न करता आपला फणा काढून घेत आला त्या दिशेने निघून गेला. जणू मला परिक्षेसाठी कृपा आशिर्वाद द्यायला आला असावा. अनेक वेळा अनेक प्रसंगातून नाग रुपात माझ्या देवाने मला सतत दर्शन दिलं.

आजोबांनी देवा धर्माचं अर्ध्यावर सोडलेलं कार्य नाना मनोभावे पूर्ण करत आहेत. नानांनी देवाला कबुल केल्याप्रमाणे मंदिर बांधलं होतं. परंतू २००४ साली पून्हा एक संकल्प आम्ही केला व एक नव्हे तर तब्बल तिन कळसाचं भव्य मंदिर बांधून पूर्ण केले आहेत. तिन्ही कळसाची ऊंची अनुक्रमे ५१ फुट ३१ व २१ फुट अशी आहे. कदाचित हे तिन कळस म्हणजे प्रकाश, एकनाथ, अनिल असेच आहे. प्रत्येक मोठ्या सणाला देवाच्या दर्शनाला आम्ही गावी जात असतो. पण आपल्याबरोबर इतरही भक्तांनी देवाच्या दर्शनाला यावे. देवाची भक्ती भावाने सेवा अर्चा करावी यासाठी एक संकल्प केला व यात्रा भरून देवासमोर लोकांच्या माध्यमातून लाखांहून अधिक फुले दिसतील म्हणून महाशिवरात्रीला दरवर्षी महाशिवत्सोव कार्यक्रम सुरू केला. आज परिसरात सर्वात मोठा यात्रोत्सव सुरू आहे. असंख्य भाविक भक्तगण या यात्रेसाठी जमतात. आता प्रत्येक महाशिवरात्रीला तिथे मोठी जत्रा भरते. हे सगळं सांगण्या मागचे कारण की जेथे देव आहे तेथेचं सत्कर्म होत असते. सत्कर्मातून चांगले विचार निर्माण होतात. आणि चांगल्या कार्यासाठी परमेश्वर, देव, तुम्हाला शक्ती प्रदान करत असतो. हीच शक्ती तुम्हाला अंधाराकडून प्रकाशाकडे घेऊन जात असते.

## ऋण निर्देश :

माझ्या अंधाराकडून प्रकाशाकडे जाणाऱ्या या प्रवासात जीवनाला आधार देणारे, दिशा दाखवणारे या जीवन प्रवासाला आपल्या प्रकाशाने मार्गदर्शन करणारे दिपस्तंभ त्यांच्यामुळे बरेच काही मिळवू शकलो. आज मी जे काही आहे ते त्यांच्यामुळेच आहे. असे म्हणतांना सार्थ अभिमान वाटत आहे. तसेच ज्यांच्या कडून मला जीवन जगतांना दुःख मिळाले, ज्यांनी माझ्या जीवन प्रवासात संकटे निर्माण केली अडचणी स्वरुप काटे पसरविले त्यांचे प्रथम मी ऋण व्यक्त करतो त्यांनी जर संकटे अडचणी निर्माण केल्या नसत्या तर मी आज कठीण परिस्थितीला तोंड देत कणखर बनलो नसतो आणि माझ्या या यशस्वीतेला अर्थ उरला नसता. अशा परिस्थितीमुळे मी खूप काही शिकलो. स्वतःला सक्षम करत गेलो. ज्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मला परिस स्पर्श लाभला त्यांच्या ऋणात मी सदैव आहे.

ज्यांनी आपली जमीन विश्वासाने माझ्या वडीलांकडे संपूर्णपणे सालाने करायला दिली त्या किसन महादू गायकर (तात्या) व उषा किसन गायकर (काकू) यांनी माझ्यावर खूप प्रेम केले. तसेच संजू भाऊ व अजु भाऊ या गायकर परिवाराचे व निखाडे आजी व त्यांचा परिवार यांचे ऋण मी कधीही विसरणार नाही.

मला हे सुंदर विश्व दाखवणारे माझे आई वडील, विश्वनिर्मात्याचे म्हणजेच माझे श्रद्धा स्थान असलेल्या देवाचे कृपा आशिर्वाद मिळाल्यामुळेच मला लढण्याची व जगण्याची एक ऊर्जा मिळाली.हे मी या जन्मातच नव्हे तर सात जन्मातही विसरणार नाही. त्यांचे आशिर्वाद, प्रेम हे मला काल, आज आणि उद्या असेच मिळत राहो ही परमेश्वराकडे प्रार्थना करतो.

मला जन्म देणाऱ्या आईची आई माझी आजी हौशाबाई. फिरत्या चाकाला सदैव कणा म्हणून आधार देणारे भाऊ एकनाथ, अनिल, माझ्या जीवन प्रवासात मला प्रेमाची सावली देणारे माझी मुलं प्रज्वल आणि प्रांजल. मला प्रत्येक परिस्थितीत, प्रत्येक संकटात मला धिर देणारी, माझी आधारवाट जी माझ्या प्रत्येक कार्यात अर्धांगिनी म्हणून सहभागी राहिली अशी माझी सहचरणी ज्योती ह्यांच्या ऋणात मी सदैव राहिल. माझ्यावर प्रेम करणाऱ्या सर्व मित्र परिवार व ऋणानुबंधकाच्या ऋणात!

***

# ऋण निर्देश

| | | |
|---|---|---|
| १ डॉ. विजय भटकर | - | जेष्ठ शास्त्रज्ञ |
| २ डॉ. रघुनाथ मार्शेलकर | - | जेष्ठ शास्त्रज्ञ |
| ३ डॉ. शंकरराव गोवारीकर | - | जेष्ठ शास्त्रज्ञ |
| ४ चंद्रशेखर धर्माधिकारी | - | मा. न्यायमुर्ती |
| ५ डॉ. विवेक सावंत | - | M.K.C.L. MD. |
| ६ निला सत्यनारायण | - | मा. निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य |
| ७ डॉ. अविनाश शिरोडे | - | जेष्ठ संशोधक |
| ८ डॉ. ओमप्रकाश कुलकर्णी | - | जेष्ठ संशोधक |
| ९ डॉ. अपूर्वा जाखडी | - | NASA Space Educator |
| १० डॉ. मानिकराव साळूंखे | - | मा. कुलगुरु |
| ११ मा. सुदाम देशमुख | - | मा. न्यायाधिश |
| १२ मा. सिंधूताई सपकाळ | - | जेष्ठ समाज सेविका |
| १३ मा.अपर्णाताई समतिर्थेकर | - | जेष्ठ समाज सेविका |
| १४ मा. दौलतराव रा. वाघ (गुरुजी) | - | एक आदर्श गुरुजी |
| १५ डॉ. सुनिल कुटे | - | BOS- Chairman, Pune University |
| १६ डॉ. संतोष टकले | - | भाभा अणु संशोधन केंद्र शास्त्रज्ञ |
| १७ मा. जेष्ठराज जोशी | - | जेष्ठ शास्त्रज्ञ |
| १८ मा. भिष्मराज बाम | - | मा. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य |
| १९ मा. माधुरी माटे | - | जेष्ठ कवयत्री |
| २० मा. यशवंत बर्वे | - | मा. अध्यक्ष कुसुमाग्रज प्रतिष्ठान |
| २१ मा. मुक्तेश्वर मुनशेट्टीवार | - | जेष्ठ समाज सेवक |
| २२ डॉ. अश्विनकुमार भारद्वाज | - | सचिव भारतीय शिक्षण परिषद |
| २३ मा. मनिष मंजुळ | - | सचिव लिड इंडिया २०२० |



# ग्रेट भेट

भारताच्या प्रथम महिला राष्ट्रपती मा. प्रतिभाताई पाटील यांना मानवधन संस्थेचे कार्य समजावतांना प्रकाश कोल्हे (दादा)

इनोव्हेटिव्ह स्कूल संबंधी सहचर्चा करतांना जेष्ठ संगणक तज्ञ डॉ. विजय भटकर सर व प्रकाश कोल्हे (दादा)





इनोव्हेटिव्ह स्कूल संबंधी सहचर्चा करतांना जेष्ठ संगणक तज्ञ डॉ. विजय भटकर सर व प्रकाश कोल्हे (दादा)

थोर शास्त्रज्ञ डॉ. शंकरराव गोवारीकर सर व प्रकाश कोल्हे (दादा) यांची ग्रेट भेट





न्यायमुर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्याशी सहचर्चा

मानवधन तर्फे नाशिक शहरात प्रथमच घेण्यात आलेल्या डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम 'वैज्ञानिक व्याख्यानमालेत संगणक तज्ञ डॉ. विवेक सावंत यांच्याशी संवाद





मा. निवडणुक आयुक्त निला सत्यनारायण यांच्याशी मानवधना विषयी चर्चा करतांना



जेष्ठ कविवर्य मधुमंगेश कर्णीक यांच्या भेटी प्रसंगी प्रकाश कोल्हे (दादा) व मान्यवर.



मा.न्यायमुर्ती सुदाम देशमुख यांना मानवधना विषयी माहिती सांगतांना प्रकाश कोल्हे (दादा)



मानवधनाला भेटली मायेची ऊब अनाथांची माऊली सिंधुताई सपकाळ यांच्या भेटी प्रसंगी प्रकाश कोल्हे (दादा)



शास्त्रज्ञ डॉ. ओमप्रकाश कुलकर्णी यांना मानवधन संस्थेचे कार्य समजावून सांगतांना.



व्याख्याता व समाजसुधारक अपर्णाताई रामतिर्थेकर यांचा सत्कार करतांना



थोर समाजसेवक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या समवेत प्रकाश कोल्हे (दादा) व मान्यवर



मा. सुधीर पुरंदरे यांच्या भेटी प्रसंगी प्रकाश कोल्हे (दादा) व यशवंत बर्वे (दादा)



मा. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या भेटी प्रसंगी प्रकाश कोल्हे (दादा) समवेत मान्यवर



जेष्ठ कवयित्री उषा सावंत यांच्याशी वाङ्‌मयीन अभिवृद्धी संबंधी सहचर्चा करतांना



सुप्रसिद्ध माजी भारतीय हॉकीपटू मा. धनराज पिल्ले यांच्या भेटी प्रसंगी



सुप्रसिद्ध अभिनेते व नाम संस्थेचे प्रमुख मा. नाना पाटेकर यांच्या समवेत प्रकाश कोल्हे (दादा)





श्री. प्रकाश सुकदेव कोल्हे

ध्येयाच्या वाटेवर प्रवास करताना अनेक अडचणींचे घाट, संकटाची वळणे आणि परिस्थितीचे खाच, खळगे पार करुन ध्येय गाठावे लागते. यशाच्या उंच शिखरावर बंद डोळ्यातील स्वप्नांच्या पंखाने पोहचता येत नाही त्यासाठी उघड्या डोळ्यांनी जिद्द आणि चिकाटीने कष्टाच्या जोरावर तीथे पोहचावं लागते. अशाच एका जिद्दीची, कष्टाच्या परिसीमेची सत्यगाथा असून लेखकाच्या यशस्वीतेचे सत्य सांगणारं हे पुस्तक असून जगण्यासाठी किती यातना भोगाव्या लागतात. या यातना सोसण्यासाठी परमेश्वर आपल्याला जगवत असतो. यातना ह्या यशाच्या शिखराच्या पायऱ्या आहे. हे या पुस्तकात लिहिले आहे. कोणत्याही परिस्थितीत माघार न घेता अंधाराकडून प्रकाशाकडे प्रवास कसा करावा ह्याचे गमक नमूद केले आहे. मानवी नीतीमूल्यांची जोपासना करत यश कसे संपादन करावे हे लेखकाने यात नमूद केले असून यश प्राप्तीसाठी झटणाऱ्या सर्वांना हे पुस्तक नक्कीच उपयोगी पडेल.

विचक्षण प्रकाशन

ISBN 978-81-933309-1-3